# प्रकरण २ — राजकिय विचार आणि संस्था

## वांशिक राजकारण: वैदिक कालखंड

आर्यांचे मूळ वसतिस्थान ही जगाच्या इतिहासातील एक अत्यंत जटील समस्या आहे. त्याची उकल कधी काळी होऊ शकेल किंवा कसे, हे सांगता येत नाही. या समस्येवर आजवर अनेक नामवंत संशोधकांनी आपली मते मांडली आहेत, आंतरराष्ट्रीय परिषदा, परिसंवाद झाले आहेत, तरी अद्याप समाधानकारक उत्तर सापडलेले नाही. एकंदरीत संशोधनाचा विचार करता असे दिसून येते की, विद्वानांचे दोन गट निर्माण झाले आहेत. एका गटाच्या मते आर्य भारतात बाहेरून तीन हजार वर्षांपूर्वी आले. या गटात प्रामुख्याने पाश्चात्त्य आणि काही भारतीय विद्वान आहेत. दुसऱ्या गटातील विद्वानांच्या मते आर्य मूळ भारतातील निवासी असून ते येथून बाहेरच्या देशात गेले. त्यांच्या मते ऋग्वेदाचा काळ पाच हजार वर्षे किंवा त्याहूनही मागे जातो, अशी परस्पर विरोधी भूमिका विद्वानांची घेतल्यामुळे प्रकरण आता हमरीतुमरीवर आले आहे. हा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा होण्याचे कारण असे की, आर्याच्या अस्तित्वाचा पुरावा प्रामुख्याने भाषाशास्त्र आणि पुरातत्त्व या दोन विद्याशाखांतील आहे, आणि कोणीही विद्वान या दोन विषयातील तज्ज्ञ नसल्यामुळे पेचप्रसंग निर्माण झाला आहे. काहींच्या मते तर आर्यांच्या संस्कृतीचे अवशेष मिळणे शक्य नाही, तेव्हा हे सर्व संशोधन विफल आहे. असे जरी असले तरी या विषयाचे आकर्षण जबरदस्त आहे आणि यामुळे त्यावरील संशोधन जगभर चालू आहे. परंतु अलीकडे भारतीय उपखंडात केलेल्या उत्खननात काही महत्त्वाचा पुरावा उपलब्ध झाला आहे. त्याची छाननी केल्यास असे दिसून येते की, आर्याची प्राचीनता सात हजार वर्षे मागे नेता येते, आणि ऋग्वेदाचा काळ इ.पू. २०००-१५०० असा निश्चित करता येतो. आर्याचा प्रश्न निर्माण केला तो एका इटालियन व्यापाऱ्याने. इ.स. १५८४ मध्ये फिलिपो सासेटी नावाचा एक व्यापारी गोव्यात आला आणि व्यापार करता करता थोडेफार संस्कृत शिकला. त्यावरून संस्कृतचे लॅटिन आणि ग्रीक भाषांशी विलक्षण साम्य आहे, असे त्याच्या ध्यानात आले. मायदेशी परत गेल्यावर त्याने लोकांना हे सांगितले, परंतु त्याकडे कोणी फारसे लक्ष दिले नाही. पुढे दोनशे वर्षे या प्रश्नाकडे विद्वानांचे लक्ष गेले नाही. शिवाय भाषाशास्त्राचा अभ्यास बाल्यावस्थेत होता व पुरातत्त्वविद्येचा तर जन्मही झाला नव्हता. एखाद-दुसरे उत्खनन कोणी अमीर- उमरावने केले तर ते त्याच्या बागेच्या पुनर्रचनेसाठी असे. नेपल्सच्या राणीने असे एक उत्खनन केले तेव्हा तिला तेथे आधीच्या काळातले काही पुतळे सापडले. इतरांनीही तसे केले आणि पुतळे सापडू लागले. त्यांचे संग्रह करण्यास सुरुवात झाली.

आर्याच्या मूळ वसतिस्थानाच्या प्रश्नाला खरी चालना पुढे दोनशे वर्षांनी मिळाली. सर विल्यम जोन्स ह्या एका ब्रिटिश पंडिताची १७८२ मध्ये कलकत्त्याच्या उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून नेमणूक झाली. त्याने १७८४ मध्ये कलकत्त्यात एशियाटिक सोसायटीची स्थापना केली. त्याला भारताचा इतिहास, संस्कृती यात विशेष रस होता. ग्रीक, लॅटिन, पर्शियन, अरेबिक ह्या भाषांचाही त्याने अभ्यास केला होता. भारताचा इतिहास आणि संस्कृती या विषयांचा अभ्यास आणि संशोधन हे एशियाटिक सोसायटीचे मुख्य उद्दिष्ट होते. ते प्रसिद्ध करण्यासाठी त्याने 'एशियाटिक रीसर्चेस' नावाचे मुखपत्रही सुरू केले. त्याला संस्कृतची गोडी लागली ती इतकी की, तो भारावून गेला आणि संस्कृत शिकून त्याने कालीदासाच्या 'शाकुंतल' चे इंग्रजी भाषांतर केले. ते युरोपमध्ये खूप गाजले (१७८९). त्यामुळे प्राचीन भारतात एक समृद्ध भाषा प्रचलित होती हे पाश्चात्त्य विद्वानांना पटले आणि युरोपात संस्कृतचा अभ्यास सुरू झाला. संस्कृतच्या अभ्यासामुळे एक गोष्ट जोन्सच्या ध्यानात आल ती ही की, ती ग्रीक आणि लॅटिनपेक्षाही अधिक श्रेष्ठ आहे. तो म्हणतो : "संस्कृत भाषा प्राचीन असून सुबक बांधणीची आहे. ग्रीकहून ती अधिक समृद्ध व लॅटिनपेक्षा प्रवाही आहे. शिवाय ह्या दोन्हीहून ती अधिक संस्कारीत आहे, परंतु त्यांच्याशी तिचे संबंध आहेत. तिची क्रियापदे व व्याकरण यावरून तिचे या भाषांशी असलेले अनुबंध स्पष्ट होतात. हा केवळ अपघात म्हणता येणार नाही. हे ध्यानात घेता कुणाही भाषाशास्त्रज्ञाला हे जाणवेल की, या तिन्ही भाषांचा मूळ स्त्रोत एकच  असावा , मात्र तो आज उपलब्ध नाही.

विल्यम जोन्सचे हे मत युरोपीय विद्वानांना मान्य होते. या भाषा भगिनींना 'इंडो युरोपीयन' असे नाव दिले गेले, त्यामुळे १९ व्या शतकात तौलनिक भाषाशास्त्राच्या अभ्यासास चालना मिळाली. त्यात जर्मन पंडित आघाडीवर होते. त्यामुळे 'इंडो- आर्यन' भाषा बोलणाऱ्या मंडळींच्या मूळ वसतिस्थानाचा शोध मोठ्या प्रमाणावर घेण्यास सुरुवात झाली. पुढे १८०५ साली कोलब्रुकने वेदांवर एक लेख लिहिला.

रोझेन हा पंडित ऋग्वेदाच्या अभ्यासात गुंतला होता, परंतु त्याचे काम पुरे झाले नाही. बर्नोफ हा फ्रेंच विद्वान आणि त्याचा शिष्य रोठ यांचाही ऋग्वेदाचा अभ्यास चालू होता. परंतु हे संशोधन मॅक्स मुल्लरने पूर्णत्वास नेले. तो जन्माने जर्मन असला तरी त्याची सारी हयात इंग्लंडमध्ये गेली. बॉफची ऋग्वेदावरील व्याख्याने ऐकण्यासाठी तो फ्रान्समध्ये गेला. बर्नोफने त्याला ऋग्वेदावर सरे लक्ष केंद्रित करण्यास सांगितले आणि त्याला ऋग्वेदाची हस्तलिखिते पुरवली. ऋग्वेद प्रसिद्ध करण्यासाठी मुल्लर इंग्लंडला आला. आर्थिक साहाय्यासाठी त्याला अनेकांचे उंबरठे झिजवावे लागले. शेवटी ईस्ट इंडिया कंपनीने त्याला मदत केली आणि ऑक्सफर्ड विद्यापीठाने त्याने संपादलेला ऋग्वेद प्रसिद्ध केला. तो स्वतःला पंडित मोक्षमुल्लर म्हणवत असे. ऋग्वेदात आलेल्या 'आर्य' ह्या शब्दावरून त्याने इंडो-आर्यन हे नाव संस्कृत आणि तद्धन्य भारतीय भाषांना दिले. 'आर्य' या भाषावाचक संज्ञेचा उपयोग जर्मन लोकांनी वंशवाचक करून त्याचा राजकारणासाठी वापर केला.

१९ व्या शतकात आर्यांच्या संबंधीचे संशोधन प्रामुख्याने भाषाशास्त्रज्ञांनी केले. त्यापैकी बहुसंख्य जर्मन पंडित होते. विसाव्या शतकात पुरातत्त्वज्ञांनी या विषयात लक्ष घातले. याचे मुख्य कारण असे की, काही पुरातत्त्वीय शोधांमुळे या विषयावर प्रकाश पाडला गेला. १९०६ मध्ये ह्युगो विंकलर या जर्मन पुरातत्त्वज्ञाने तुर्कस्तानात बोधाजकोई येथे उत्खनन केले. तेथे त्याला एक शिलालेख सापडला. तेथे हिटाईट आणि मिटानी या दोन टोळ्यांमध्ये नेहमी लढाया होत. इ.पू. १३६० च्या सुमारास त्यांनी तह केला व त्याच्या अटी ह्या शिलालेखात नमूद केल्या. ते करताना त्यांनी त्यांच्या देवतांना आवाहन केले आहे. हे देव म्हणजे इंद्र, वरुण, मित्र आणि नासत्य. हे वैदिक आर्यांचे देव. या लेखावरून आर्य भारतात बाहेरून आले आणि त्यांपैकी एक टोळी तुर्कस्तानात गेली असा निष्कर्ष काढण्यात आला.

पुढे १९२१-२२ साली हडप्पा आणि मोहेंजोदारो येथील उत्खननात सिंधू संस्कृतीचा शोध लागला. ती दास/दस्यू यांची असावी असा निष्कर्ष काढला गेला. दासांची मोठाली नगरे/पुरे होती. त्यांचा नाश इंद्राने केला असे ऋग्वेदात वर्णन आहे. त्यामुळे इंद्राला पुरंदर हे नामाभिधान प्राप्त झाले. शिवाय त्यांच्याजवळ घोडा नव्हता त्यामुळे सिंधू संस्कृती अनार्यांची ठरवली गेली.

आयांच्या वसतिस्थानासंबंधी विद्वानांत पराकोटीचा वाद आहे. त्यापैकी काही महत्त्वाच्या पंडितांचे मत जाणून घेणे आवश्यक आहे. सर्वांत श्रेष्ठ पुरातत्त्वज्ञ गॉर्डन चाईल्ड, त्यांनी १९२६ मध्ये आर्यांवर एक ग्रंथ लिहिला. त्यांच्या मते आर्य अत्यंत बुद्धिमान होते. हिंदूंनी आणि ग्रीकांनी प्राचीन काळी केलेल्या प्रगतीवरून हे सिद्ध होते. चाईल्ड हे मार्क्सवादी असल्यामुळे त्यांनी सुरुवातीस आर्यांचे वसतिस्थान रशियात होते असे प्रतिपादन केले, परंतु नंतर ते मध्य आशियात होते असे त्यांचे मत बनले. अखेरीस ह्या प्रश्नाची उकल करण्यास पुरातत्त्वीय पुरावा पुरेसा नाही असे ते म्हणत असत.

मारीया गिंबुटास ह्यांनी पूर्व युरोपात उत्खनने केली. तेथील कुरगान संस्कृती (इ.पू. ४०००) आर्यांची असावी असे त्यांनी दाखवून दिले. तेथे मानवाबरोबर रथ, घोडेही पुरले जात. ते आर्यांचे पूर्वज होते असे त्यांचे मत होते. केंब्रिज विद्यापीठातील कोलीन रेनफ्यू हे प्रसिद्ध पुरातत्वज्ञ, तुर्कस्तान हे आयांचे मूळ वसतिस्थान होते असे त्यांना वाटते.

कै. रामशरण शर्मा हे अत्यंत प्रगत विचाराचे इतिहासकार होते. त्यांनी आर्य बाहेरून भारतात आले असे दाखवून दिले, घोडा व आऱ्याच्या चाकाच्या पुराव्यावरून ते इ.पू. १५०० च्या सुमारास भारतात आले असावेत. हल्लीची घग्गर नदी ही वेदातील सरस्वती नव्हे, असे त्यांचे ठाम मत होते. आर्यांचे मूळ वसतिस्थान कॉकेशस पर्वताच्या परिसरात होते, हे रशियन इतिहासकारांचे मतं त्यांना मान्य होते. यदू, कुरू, तुर्वश आणि उत्तर मद्र ह्या जनजाती हिमालयापलीकडून

आल्याचा उल्लेख आहे. तसेच पुरुखस ऐल हा वेदातील अतिप्राचीन राजा बॅक्ट्रिया (अफगाणिस्तान) मधून आला होता, असे ते सांगतात.

आर्य मूळ भारतातीलच असे अनेक भारतीय पंडितांचे मत आहे, इतकेच नव्हे, तर ते येथून बाहेर गेले असे त्यांना वाटते. शिवाय ऋग्वेदाचा काळ इ.पू. ५००० किंवा त्याहूनही अधिक असावा. डॉ. ब्रिजवासी लाल हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पुरातत्वज्ञ आहेत. त्यांचा ह्या क्षेत्रातील अधिकार फार मोठा आहे. स्वातंत्र्योत्तर काळात सिंधू संस्कृतीच्या अनेक स्थळांची उत्खनने झाली असल्यामुळे ती वैभवशाली संस्कृती वैदिक आर्याची असावी असे मत आता हिरिरीने मांडण्यात येत आहे. ऋग्वेदात आर्य बाहेरून आल्याचे कोठेही म्हटलेले नाही. याउलट येथील सप्त- सिंधुचा प्रदेश- म्हणजे सिंधू आणि सरस्वती यांच्यामधला प्रदेश- हेच त्यांचे मूळ वसतिस्थान असावे असा समज आहे. अलीकडे प्रा. लाल यांच्या लिखाणात त्यांनी सिंधू संस्कृती हीच वैदिक आर्याची संस्कृती होय असे मत मांडले आहे. दोन्ही संस्कृतींची भौगोलिक व्याप्ती जवळजवळ सारखीच आहे आणि त्यांच्या काळामध्येही फारसा फरक नाही. तेव्हा वैदिक आर्य हेच सिंधू संस्कृतीचे निर्माते असण्याची दाट शक्यता आहे. अर्थात सिंधू लिपी वाचल्यानंतर याचा निर्णायक पुरावा आपल्या हाती येईल हे ते मान्य करतात. आर्याची नागरी संस्कृती होती, त्यांच्याकडे बोटी होत्या, त्यांचा समुद्रांतर्गत व्यापार होता, त्यांच्याकडे घोडा होता आणि ते यज्ञ करीत, असे ते सांगतात. इ.पू. ४००० असा ऋग्वेदाचा काळ त्यांनी निश्चित केला आहे. कै.एस.आर. राव यांचेही मत असेच आहे." बहुतेक युरोपीय विद्वान आर्याचे मूलस्थान युरोपमध्ये असल्याचे प्रतिपादन करतात.

**लोकमान्य टिळक :**

लोकमान्य टिळक हे थोर राजकीय पुढारी होतें, परंतु ते उच्च कोटीतले विद्वानही होते. गणित आणि संस्कृत या विषयात त्यांना विशेष रस होता आणि खगोलशास्वातही त्यांना गती होती. एकदा भगवत् गीतेतील श्लोक म्हणत असताना 'महिन्यांमध्ये जसा मार्गशीर्ष, तसा कृष्ण असा उल्लेख आला' (मासानां मार्गशीषर्ोऽहम्). त्याचा वेदवाङ्मयाचा कालक्रम ठरवण्यास उपयोग होईल असे त्यांना वाटले. त्यांनी तो खालीलप्रमाणे ठरवला.

१. ओरायनपूर्व काळ (इ.पू. ६०००-४०००)

२. ओरायन काळ (इ.पू. ४०००-२५००) हा आर्य संस्कृतीचा सर्वात महत्त्वाचा काळ होता.

३. कृत्तिका काळ (इ.पू. २५०० - १४००).

४. बुद्धपूर्व काळ (इ.पू. १४०० - ५००)

हा कालक्रम अनेक विद्वानांना मान्य नव्हता. 'ओरायन' या ग्रंथात टिळकांनी वरील कालक्रम दिला आहे. त्यानंतर त्यांनी 'आर्क्टिक होम इन द बेदाज हा ग्रंथ लिहिला." त्यासाठी त्यांनी ऋग्वेदातील काही विधानांचा आधार घेतला. एका ऋचेत 'तानि इत् अहानि बहुलानि आसन्' (VII 33) म्हणजे 'सूर्योदयापूर्वी दीर्घकाळ लोटला आहे, असा उल्लेख आहे. याचा अर्थ जेथे दीर्घ काळ दिवस आणि दीर्घकाळ रात्र असते अशा प्रदेशात आर्यांची वस्ती होती, असा होतो, त्यावरून उत्तर ध्रुवाजवळच्या प्रदेशात आर्याचे मूलस्थान होते असा निष्कर्ष लोकमान्य टिळकांनी काढला. तसेच इ.पू. ४५०० ५००० च्या सुमारास आर्य भारतात आले असावेत असे त्यांचे मत होते.

मायकेल विट्झेल हे हारवर्ड विद्यापीठात संस्कृतचे प्राध्यापक आहेत आणि त्यांचे संशोधन जगन्मान्य आहे. त्यांच्या एकंदर लिखाणावरून आर्याची मूळ वस्ती तुर्कमेनिस्तान बॅक्ट्रिया या प्रदेशात होती, परंतु त्यांचे मूळ वसतिस्थान मध्य आशियात होते असा समज होता, आर्याच्या टोळ्या भारतात दोनदा आल्या आणि ऋग्वेदाचा काळ त्यांनी इ.पू. १९०० १४०० असा निश्चित केला आहे. अनेक विद्वानांनी या वादात भाग घेतला आहे आणि त्यांच्यात दोन तट पडले

आहेत. हा प्रश्नाची समाधानकारक उकल कधी होऊ शकेल हे सांगता येत नाही. कदाचित सिंधू लिपी वाचता आल्यावर काही प्रकाश पडू शकेल अशी आशा करूया.

**पर्यावरण :**

इ.पू. २००० पासून पर्यावरण हळूहळू प्रतिकूल होऊ लागले होते. याचा पुरावा पराग-विश्लेषणावरून मिळतो, पुढे जवळजवळ दीड हजार वर्षे ते अधिकाधिक शुष्क होत गेले. युरोपात त्या वेळी हिमयुगासारखी बंडी होती आणि आपल्याकडे दुष्काळी परिस्थिती होती. बहरात आलेल्या सिंधू संस्कृतीच्या हासाचे हेही एक कारण होते. समुद्राची पातळी खाली गेल्यामुळे अनेक बंदरे निकामी झाली होती. त्याचा व्यापारावर परिणाम झाला. सिंधू संस्कृतीची सुबत्ता परदेशी व्यापारावर अवलंबून असल्यामुळे तिचे वैभव नाहीसे होण्यास फारसा काळ लागला नाही. हा प्रकार भारतापुरता मर्यादित नव्हता. मेसोपोटेमिया, इजिप्त, ग्रीस येथील नागरी संस्कृतींचा देखील या काळात हास सुरू झाला. इ.पू. २००० पासून आर्यांची स्थलांतरे सुरू झाली आणि ते सरस्वतीच्या खोऱ्यातून वरच्या भागात गेले. तेथे त्यांना वस्त्या उजाड झाल्याचे आढळून आले. त्यांचा वैदिक वाङ्मयात अर्म/अर्मक असा उल्लेख येतो. त्या वाल्हिक देशातही (चाल्ख बक्ट्रिया) होत्या. हरयाणामध्ये अनेक ठिकाणी पूर्व सिंधू आणि उत्तर सिंधू वसाहतींचा पुरावा आहे. त्याचा अर्थ नागरी सिंधुच्या लोकांनी तेथून स्थलांतर केले असावे.

**पुरातत्त्वीय पुरावा :**

वैदिक आर्य आणि पुरातत्वीय पुरावा यांची सांगड घालण्याचा आपण प्रयत्न केला. त्यावरून असे म्हणता येईल की, बहुधा उत्तर सिंधूचे लोक आणि वैदिक आर्य हे एकच असावेत. त्याला आणखी पुराव्याची भक्कम जोड आपण देऊ शकतो. दोहोंचा आधिवास (habitat) एकच होता. ते दोघेही सप्तसिंधूच्या प्रदेशात - म्हणजे पश्चिमेकडे सिंधू आणि पूर्वेकडे सरस्वती ह्या दोन नद्यांनी सीमित केलेल्या प्रदेशात राहत होते. दोन्ही संस्कृतींचा काळ मिळताजुळता (इ.पू. २०००-१४००) आहे. दोघेही गोपजन (pastoral) असले तरी थोडी फार शेती करीत, गहू, बार्लो पिकवत, गायीगुरांची खिल्लारे पाळत. त्यांच्या दैनंदिन जीवनातील इतर वापराच्या वस्तू जवळजवळ समान होत्या. त्यांच्या धार्मिक जीवनात अग्निपूजा महत्त्वाची होती. यापेक्षाही अधिक पुरावा आपल्याला वैदिक वाङ्मयात मिळू शकतो. उदा., ह्या काळात पर्यावरण फारसे अनुकूल नसावे असे वाटते, कारण आर्यांच्यात आणि दासांत पाण्याकरिता भांडणे होत असत. याचा अर्थ पाण्याचा तुटवडा होता, वृत्राने आर्यांचे पाणी अडवले आणि म्हणून इंद्राने त्याचा वध केला व पाणी मोकळे करून दिले. याशिवाय इ.पू. दुसऱ्या सहस्रकात जुन्या जगात (Old World) सर्वत्र पर्यावरण शुष्क झाले होते. त्यामुळे लोकांचा शेतीपेक्षा पशुपालनावर अधिक भर होता. परंतु आणखी खोलात आपण गेलो तर आपल्याला खूप मोलाची माहिती मिळू शकते.

**सप्तसिंधूचा प्रदेश :**

ऋग्वेदात वर्णन केल्याप्रमाणे आर्यांची वस्ती सप्तसिंधूच्या प्रदेशात होती. त्याला ते 'देवनिर्मित देश' म्हणत असत. सप्तसिंधूचा प्रदेश म्हणजे पश्चिमेकडे सिंधू आणि पूर्वेकडे सरस्वती ह्यांच्यामधील प्रदेश. त्यात खालील सात नया वाहतात.

१. सरस्वती (भारतातील घग्गर म्हणजेच पाकिस्तानातील हाक्रा). २. सिंधू, ३. परुष्णी (रावी), ४. असिक्नि (चिनाब), ५. शतुद्री (सतलज), ६. वितस्ता (झेलम), ७. विपाशा (बियास).

'नदी स्तुती' ह्या १० व्या मंडलात जो नद्यांची नावे दिली आहेत, त्यांचा पूर्वेकडून पश्चिमेकडे असा क्रम आहे. हे वर्णन इतके अचूक आहे की, नकाशा समोर ठेवून ते केले असावे असे वाटते, एखाद्या प्रदेशात सतत फिरणारे व्यापारीच असे अचूक वर्णन करू शकतात. या वर्णनावरून आर्य हे भारतात पूर्वेकडून पश्चिमेकडे आले आणि भारताबाहेर गेले असे काही विद्वानांचे मत आहे. परंतु ते कोठून आले यासंबंधी एकही उल्लेख आढळत नाही.

याउलट आर्य इराणमध्ये जाऊन स्थायिक झाले असा अवेस्तामध्ये स्पष्ट उल्लेख आहे. सप्तसिंधूच्या प्रदेशात वसलेल्या आर्यांच्या दोन शाखा होत्या : १. सूर्यवंशी इक्ष्वाकू आणि २. चांद्रवंशीय ऐल. ह्या ऐलांच्या पाच जमाती होत्या. त्यांना पंचजन म्हणून ओळखले जाते. पंच-कृष्टयः आणि पंच-कार्षणः म्हणजे शेतकरी असा त्यांचा उल्लेख आढळतो. ह्या पाच जमाती पूरू, अनु, यदू, द्रा आणि तुर्वश ह्या होत. याशिवाय इतरही छोट्या टोळ्या होत्या. त्या भारतात येण्यापूर्वी येथे अनु- द्रच्ह्यू आणि यदू-तुर्वश येऊन पोचले होते.

दास, दस्यू आणि पणी हे अनार्य असून, त्यांचे वायव्य सरहद्द प्रांतात वास्तव्य होते. त्यांचे आणि आर्यांचे वैर र फार पुरातन काळापासून होते. त्यामुळे आर्य त्यांचा द्वेष करीत, अश्रद्ध, यज्ञ न करणारे, लिंगपूजक, इंद्रपूजेला विरोध करणारे, जादूटोणा करणारे, असे त्यांचे वर्णन आढळते. काही वेळा भेसर असाही त्यांचा उल्लेख येतो. त्यांची भाषाही चमत्कारिक होती, परंतु त्यांची नावे इण्डो-आर्यन आहेत. ते दास म्हणून ओळखले जात. ते विश्वामित्राचे वंशज असल्याचे सांगितले आहे. यदू व तुर्वश यांचाही काही वेळा दास म्हणून केलेला आढळतो. सुदास, दिवोदास ही आर्यांची नावे लक्षणीय आहेत. दास हे स्थिर जीवन जगणारे शेतकरी होते. त्यांची 'पुरे' तटबंदीयुक्त होती. तो लोखंडी (अयसी) होती. त्यांची घरे लाकडाची, कुडाची होती. दासांचा प्रमुख शंबर याची डोंगराळ भागात ९९ तटबंदीयुक्त पुरे होती. ती 'शारदीय परे' म्हणजे मोसमात राहण्यासाठी होती. इंद्राने ती फोडली म्हणून त्याला 'पुरंदर' हे बिरुद लाभले. ही लढाई बॅक्ट्रियामध्ये (अफगाणिस्तान) झाली असावी.

आर्य आणि दास यांच्यातील संबंध कसे होते हे स्पष्ट होत नाही. ते एकमेकांचे शत्रू होते. परंतु काही वेळा दास आर्यांच्या देवता पूजत असत. इंद्र हा आर्यांचा आणि दासांचाही देव होता असे दिसते. दास श्रीमंत होते आणि प्रबळ होते, इतके की, त्यांनी आर्यांचे पाणी अडवले होते. इराणमध्ये त्यांचा 'दाह' असा उल्लेख येतो.

**वसाहती :**

आर्यांची वस्ती सप्तसिंधूच्या प्रदेशात झालेली असली तरी पूर्वेकडे शरयू आणि पश्चिमेकडे सुवास्तू (स्वात) या नद्यांपर्यंत त्यांच्या वसाहती होत्या. दक्षिणेत कच्छपर्यंत आणि उत्तरेत ऑक्सस पर्यंत (आता अमृदर्या) ते पोचले होते. या सर्व प्रदेशात त्यांची लहान खेडी होती. नगरांचा उल्लेख ऋग्वेदात आढळत नाही. परंतु काही विद्वानांचे मते त्यांची शहरे होती. पुर हा शब्द ऋग्वेदात येतो. ही पुरे दासांची म्हणजे त्यांच्या शत्रूची होती. 'पुर' म्हणजे 'तटबंदीयुक्त नगर' असा अर्थ लावला गेला आहे. इंद्राने ती उद्ध्वस्त केली आणि त्याला 'पुरंदर' हे बिरुद लाभले. ही पुरे वायव्य सरहद्द प्रांताच्या डोंगराळ भागात होती. ती शहरे नसावीत. त्यांचा शारदीय पुरे म्हणज शिशिर ऋतूत (ऑटम) राहण्यासाठी असलेली वस्ती असा उल्लेख आहे. ती बहुधा भटक्या गोपजनांची होती.

आर्यांची घरे विटा-मातीची आणि कुडाची असत. त्यावर गवताचे छप्पर असे, सर्वत्र लहान खेडी होती. एका खेड्यात २५-३० कुटुंबे राहत, म्हणजे खेडबाची बस्ती १५०-२०० पेक्षा अधिक नसावी. खेड्याचा विस्तार दोन-तीन हेक्टरपेक्षा अधिक नसावा. 'विश' म्हणजे खेड्यांचा समूह, त्यावर राजा राज्य करत असे. ऋग्वेदात 'ग्राम' शब्दाचा अर्थ जेथे वर्षातून काही दिवस वस्ती असते, ते. यावरून लोकांचे जीवन भटके असावे. शेती तुटपुंजी, मुख्य व्यवसाय पशुपालन, गावागावात भांडणे होत असत. त्यावरून 'संग्राम' शब्द तयार आला.

दास श्रीमंत असल्यामुळे त्यांची घरे दगडाची असत. ती दुमजलीही असावीत असे 'हर्म्य' ह्या शब्दावरून वाटते. द्विपक्षी म्हणजे दोन पाख्याचे घर, ते मोठे असावे, असे एक घर भगवानपुरा (पंजाब) येथील उत्खननात सापडले. (आ. ५.२) ते उत्तर सिंधू संस्कृतीचे आहे. त्यात तेरा खोल्या होत्या. मोठ्या घरात अर्थातच धान्य साठवण्याची सोय असणार, शिवाय गुरांसाठी गोठाही. एका जमातीच्या म्होरक्याकडे दोनशे गायी होत्या. तेथे शेकडो तटबंदीयुक्त बस्त्या होत्या. आर्य आणि दास यांच्यातील चकमकी जमीन, पाणी, कुरणे यासाठी होत. पणि श्रीमंत होते. त्यामुळे आर्य त्यांचा द्वेष करत. दास आणि दस्यू गुलामाचे जीवन जगत होते.

**आर्याचे मूळ वसतीस्थान, मेरुपर्वत (अल्ताई दाग)**

मेरु पर्वताचा उल्लेख ऋग्वेदामध्ये नाही मात्र ७ ते ८ हजार वर्षापूर्वी आर्य भारतात आले आणि त्यानंतमर ३ ते ४ हजार वर्षानंतर ऋग्वेदाची रचना झाली. तेव्हा त्यांना त्याची विस्मृती झाली असणे स्वाभाविक आहे. परंतु पुराणात त्याचा उल्लेख आहे, याचे कारण पुराणात वेदाहून प्राचीन परंपरा आढळतात. पुराणातील मेरू म्हणजे उत्तरेकडे असणाऱ्या हेमकूट आणि विषाद यांच्यातील पर्वतराजी, जिला सध्या कुनलुन आणि तिएन-शान अशी नावे आहेत, ती असावी असे वाटते. त्यांच्या उत्तरेला अल्ताई पर्वत आहे. पुराणातील परंपरेनुसार तिबेटच्या सरहद्दीवरून हिमालयाच्या उत्तरेस हेमकूट पर्वत आहे, त्याच्या उत्तरेस निषाद आहे. तेव्हा 'अल्ताई दाग' हा मेरू पर्वत असण्याची दाट शक्यता आहे. शिवाय मंगोलियन भाषेत त्याचे नाव 'सोन्याचा पर्वत' असेच आहे. तेथे दीर्घकाळ रात्र आणि दिवस असतात.

या सर्व पुरातत्त्वीय आणि वाङ्मयीन प्राव्याचा विचार केल्यास अशी कल्पना करता येईल की, दहा हजार वर्षांपूर्वी 'अल्ताई दाग' पर्वताच्या परिसरात इण्डो- आर्यन भाषा बोलणाऱ्या टोळ्या राहत होत्या. मध्याश्मयुगात पर्यावरण अतिशय अनुकूल असल्यामुळे अन्नाची रेलचेल होती, परंतु १०-१२ हजार वर्षांपूर्वी पर्यावरण रतिकूल होऊ लागले आणि मानवाला शेतीचा शोध लावणे १ भाग पडले. त्या वेळी त्या टोळ्यांची अन्नासाठी भटकंती सुरू झाली. दुष्काळ पडू लागले, थंडीचे प्रमाण बाढले, त्यामुळे ह्या मध्य आशियातील टोळ्यांना आपले घरदार सोडणे भाग पडले, दीर्घकाळ भटकल्यानंतर आर्याच्या टोळ्या अफगाणिस्तानात आल्या. तेथे त्या थोड्याफार स्थिरावल्या, त्यांच्या मूलस्थानाचे 'आर्यानाम वेजों' हे नाव त्यांनी त्या प्रदेशाला (हल्लीचे अरियाना) दिले. तेथे त्यांनी पशुपालन आणि थोडीफार शेती सुरू केली. अक-कुशुक आणि घर-इ-मार येथे त्याचा पुरावा मिळतो. वाङ्मयीन पुरावाही त्याला पुष्टी देतो. महाभारतात सांगितल्याप्रमाणे पुरुरवस-ऐल - ज्याचा उल्लेख वैदिक वाङ्मयातही आहे हा वाल्हिक देशातून आलेला होता. वाल्हिक म्हणजे हल्लीचा बाल्ख, जो घोड्यांसाठी प्रसिद्ध आहे. अनु-द्रह्यू आणि यदू-तुर्कश हे सुद्धा अतिप्राचीन काळी अफगाणिस्तानच्या डोंगराळ प्रदेशातून भारतात आले होते. अफगाणिस्तानातून ही मंडळी पुढे भारतात सरकली, आणि सिंधूच्या खोऱ्यात स्थिरावली (इ.पू. ५००० - ४०००). त्यांच्या वसाहतींचे अवशेष हरयाणामध्ये सरस्वतीच्या खोऱ्यात काही ठिकाणी सापडले आहेत. परंतु रेडिओकार्बन पद्धतीने त्यांचा काळ इ.पू. ६००० पर्यंत मागे जातो, तेव्हा आता नवीन प्रश्न उभे राहिले आहेत. तेथे सिंधू संस्कृती उगम पावली. सध्याचे हरयाणा हे नाव अरियानापासून झाले असावे.

आर्य ज्याप्रमाणे भारतात आले, तसेच इराणमध्येही गेले. ऋग्वेद आणि अवेस्ता यांच्या भाषेत विलक्षण साम्य आहे. पूर्वी अवेस्ताचा काळ इ.पू. १००० असा निश्चित केला होता, परंतु आता तो इ.पू. १४०० पर्यंत मागे नेता येतो. त्यातील वेदिदादच्या (फरगर्द) पहिल्या भागात आर्य भारतातून इराणमध्ये गेल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. त्यात इण्डो-इराणी लोकांची त्यांच्या मूळ स्थानापासून इतरत्र कोठे स्थलांतरे झाली हे सांगितले आहे. त्यांचा पुढारी आहूर माझदा आपल्या लोकांबरोबर ऐर्यानाम वेजोमध्ये सुखाने राहत होता. परंतु पुढे पर्यावरणात बदल होऊन ते प्रतिकूल झाले, त्यामुळे त्यांनी तेथून स्थलांतर केले. प्रत्येक ठिकाणी काही ना काही अडचणीमुळे त्यांना भटकंती करावी लागली, ते एकूण सोळा ठिकाणी फिरले. त्यातील बहुतेक स्थळे अफगाणिस्तानातील आहेत व पंधरावे सप्तसिंधू (हप्त हिंदू) म्हणजे भारतात ते आले. तेथून पुढे ते इराणमध्ये गेले आणि तेथे स्थायिक झाले. जे भारतात राहिले त्यांनी प्रामुख्याने सरस्वतीच्या खोऱ्यात वस्ती केली आणि त्या प्रदेशाला अरियाना (हरयाणा) नाव दिले असावे. 'रावी संस्कृती' ही बहुधा आर्यांची असावी. तिच्यातून सिंधू संस्कृती उत्क्रांत झाली. पुढे परिस्थिती इ.पू. २००० पासून प्रतिकूल झाली. पामुळे उत्तर सिंधू ही ग्रामीण संस्कृती झाली. ती बहुधा वैदिक आर्याची असावी. गॉर्डन चाईल्ड म्हणतात त्याप्रमाणे, "ऋग्वेदाची रचना करण्यापूर्वी खूप आधी आर्य भारतात येऊन राहिलेले होते, त्यामुळे त्यांना आपल्या मूलस्थानाची आठवण राहिली नव्हती."

**आर्यांचे स्थलांतर :**

उत्तर सिंधू काळात प्रतिकूल पर्यावरणामुळे आणि सरस्वती नदी आटू लागल्यामुळे आणि आर्यांना उदरनिर्वाहासाठी इतरत्र स्थलांतर करणे भाग पडले, भारतात त्यांना चारही दिशांना जावे लागले, इत्तकेच नव्हे, तर भारताबाहेरही ते गेल्याचा पुरातत्त्वीय पुरावा आहे. काहींच्या नशिबी पशुपालन करून भटके जीवन आले. प्रतिकूल पर्यावरणाची तीव्रता जशी वाढत गेली, तसे त्यांचे जीवन अधिकाधिक खडतर झाले. गुणु लोकांना म्लेंच्छ देशात जावे लागले, असे पुराणात सांगितले आहे. वैदिक वाङ्मयातही त्याचा सूर उमटलेला दिसतो. अग्नीने हाकलून दिल्यामुळे काही मंडळींनी परदेशात वास्तव्य केले, असे तैत्तिरीय ब्राह्मणात (२.४.६.८) सांगितले आहे. पश्चिम आशियात नुझी, अल्लालख, तुर्कस्थानात बोधाजकुई, इजिप्तमध्ये अमार्ना इत्यादी स्थळांच्या उत्खननात त्याचा पुरावा उपलब्ध झाला आहे. जेथे इण्डो-आर्यन भाषा बोलणारे लोक येऊन राहिले हे त्यांच्या नावावरून सिद्ध होते. मॅलरी यांचे या संबंधातील भाष चिंतनीय आहे.

> "पश्चिम आशियातील इण्डो-आर्यन आणि भारतातील इण्डो-आर्यन यांचे एकमेकांशी कशा प्रकारचे संबंध होते याचा विचार करणे आवश्यक आहे. मिटानी साम्राज्याच्या हासानंतर पश्चिम आशियातील इण्डो-आर्यन भारतात गेले, असे म्हणावे तर त्याला कोणताही पुरावा नाही. या उलट भारतातील इण्डो-आर्यन पश्चिम आशियात गेले असे म्हणावे, तर त्यालाही पुरावा नाही."

खरे म्हणजे मॅलरी यांच्या दुसऱ्या विधानाला दुजोरा देणारा भक्कन पुरावा आहे. पण पाश्चात्त्य विद्वानांनी एकदा ढापणे लावून पाहावयाचे ठरवल्यानंतर स्वच्छ पुरावासुद्धा त्यांच्या नजरेस येणार नाही. दाशराज्ञ युद्धात पराभव झाल्यानंतर द्रुह्यू हे त्यांच्या मायभूमीतून (राजस्थानातून) म्लेच्छ देशात गेले, याचा पुराणात उल्लेख आहे. अनूंनीसुद्धा तेच केले. दाशराज्ञ युद्धानंतर काही जमातींनी भारताबाहेर जाऊन वसाहती केल्या, कदाचित हा पुरावा पाश्चात्त्य पंडितांना मान्य नसावा. परंतु वैदिक वाङ्मयातही त्यांचे उल्लेख आहेत, ते खालीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १. पृथू (पार्थव) (ऋ. ७.८३.१), पर्शियन | २. पार्सस (पार्च) (७.८३.१), पर्शियन |
| ३. पख्त, (७.१८.७) पख्तून | ४. भालाणस (७.१८.७) चलुची |
| ५ . शिव (७.१८.७), शिबि | ६. विषाणिन् (७.१८.७) |
| ७. खिव (७.१८.७) कोरास्मियन | ८. भृगू, ब्राको फ्रिगियन |

या सर्व जमाती अफगाणिस्तानात आणि इराण यांच्या सीमावर्ती प्रदेशात राहत होत्या, परंतु दाशराज्ञ युद्धात पराभव झाल्यामुळे त्यांना तेथून स्थलांतर करणे भाग पडले. याशिवाय आणखी दोन जमाती होत्या. सिम्यू (७.१८.५) बहुधा अल्वानियातील सिमिओस असावेत आणि आलिन (७.१८.५) हे बहुधा प्राचीन ग्रीसमधील हेलेना असावेत, असा विद्वानांचा कयास आहे. विख्यात पंडित मायकेल विट्झेल यांनी इराण, अफगाणिस्तान, मध्य आशिया या प्रदेशात राहणाऱ्या जमातीची ग्रीक आणि लॅटिन वाङ्मयात उल्लेखलेल्या माहितीची जंत्री दिली आहे. त्यात पणि (पारनोई), दास (इराणी दाहे आणि ग्रीक दाई), सिंधू (ग्रीक सिंदोई), परसु (पर्शियन), पख्त (पख्तून), दृभिक (पर्शियन देमिकिस) इत्यादी नावे आहेत. परंतु या पुराव्याचा विट्झेल यांनी कसा उपयोग करून घेतला हे पाहणे महत्त्वाचे आहे. एकदा आर्य भारतात बाहेरून आले हे मनात पक्के ठरवल्यावर वर दिलेल्या सर्व जमाती इ.पू. दुसऱ्या सहस्त्रकात भारताबाहेर पश्चिम आशियात राहत होत्या आणि नंतर तेथून भारतात आल्या, असे ते सांगतात. उलटे तर्कशास्व कसे असते हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. या उलट इ.पू. २००० मध्ये किंवा त्याहूनही आधी त्या भारतात होत्या, हे सिद्ध झाल्यानंतर त्या जमाती भारतातून इतर देशात गेल्या, हे तर्कशुद्ध होईल. या संदर्भात अग्नीने दस्यूंना हाकलून दिल्याचे ऋग्वेदात (७.६.३) सांगितले आहे, हे ध्यानात ठेवणे आवश्यक आहे. या संदर्भात मॅलरीचा निष्कर्ष त्यांच्याच शब्दांत दिला पाहिजे. 'पश्चिम आशियातील ब्राँझयुगीन कोरीव लेखात इण्डो-आर्यन मधूनमधून डोकावतात. हिटाईटची जागा हड्डीने आणि

असीरीयननांनी घेतली, आर्मेनियन लोकांनी इण्डो- आर्यन लुव्हियन लोकांना आपल्यात सामावून घेतले, इराणी लोक एलाम प्रांतावरआपला अंमल प्रस्थापित करतात... असा इण्डो-आर्यन प्रभाव वाढत जातो. मध्य तुर्कस्तानातसुद्धा आधीची हट्टी भाषा जाऊन तिच्या जागी हिटाईट, नंतर लुवियन,क्रिमियन आणि शेवटी सेल्टिक भाषा बोलल्या जातात.'"

हा इण्डो-आर्यन प्रभाव कोठून व कसा आला? भारतात इण्डो-आर्यन भाषा बोलणारे लोक सात हजार वर्षापासून होते आणि चार हजार वर्षांपूर्वी ते देशोधडीला लागले. त्यातले काही पश्चिम आशियात गेले, असा सरळ निष्कर्ष काढता येतो. बौद्धायन श्रौतसूत्रशत (१८.४४.३९७-९९) याचा उल्लेख आढळतो. त्यात आर्य सप्तसिंधू पार करून पूर्वेकडे गेल्याचे सांगितले आहे. 'आयु पूर्वेकडे गेला. त्याच्याबरोबर कुरू-पांचाल आणि काशी-विदेह हेही होते. दुसरे लोक मात्र न जाता घरीच राहिले.' असे भाषांतर विट्ङ्गेल यांनी केले होते. ते जाणूनबुजून कसे चुकीचे केले, हे 'प्रा. ब्रिजबासी लाल यांनी दाखवून दिले, त्याचा अचूक अर्थ, 'त्यांनी पश्चिमेकडे स्थलांतर केले' असा होतो. त्यांच्याबरोचर गांधार देशातील आणि पार्सस म्हणजे पर्शियन होते."

**इराण :**

झोरोॲस्ट्रीयन लोकांच्या झेंड-अवेस्ता या ग्रंथात त्यांनी त्यांचा पुढारी अहर माझदा याच्याबरोबर त्यांच्या मूळ स्थानापासून स्थलांतर केल्याचे सांगितले आहे. एकूण १६ ठिकाणी ते फिरले. त्यातील १५ वे सप्तसिंधू (भारत) होते आणि येथून ते कॅस्पियन समुद्राकाठच्या प्रदेशात रंधा येथे गेले आणि तेथे स्थायिक झाले." आणखी एक महत्त्वाचा पुरावा अवेस्तात आहे. त्यात भारतीय नद्यांची नावे पूर्वेकडून पश्चिमेकडे, शरयूपासून सिंधुपर्यंत, या क्रमाने दिली आहेत. या मार्गाने ते भारतातून इराणमध्ये गेले असा त्याचा अर्थ लावणे चूक ठरणार नाही. विशेष म्हणजे अवेस्ताच्या रचनाकाराला ऋग्वेदाची माहिती होती असे दिसते. परंतु ऋग्वेदात मात्र कोठेही इराणी परंपरेचा पुसटसुद्धा उल्लेख येत नाही. आर्य भारतातूनच इराणमध्ये गेले, ह्याचा हा विश्वसनीय पुरावा म्हणता येईल.

**मध्य आशिया :**

मध्य आशिया हा आज जरी वैराण, वाळवंटी प्रदेश असला तरी प्राचीन काळी अनुकूल पर्यावरण होते तेव्हा भरभराटीस आला होता. चीनपासून रोमपर्यंतचा रेशीम मार्ग (Silk Route) त्यातून जात होता. भारताशी त्याचे घनिष्ट संबंध होते. तेथे उत्खननात अनेक ठिकाणी भारताशी संपर्क असल्याच्या खुणा आहेत. तुर्कमेनिस्तानात 'अल्टिन डेपे' येथे सिंधुमुद्रा, मणी, हस्तिदंती आणि शंखाच्या वस्तू मिळाल्या. ह्या इ.पू. २२०० २००० ह्या काळातील आहेत. आल्टिन डेपे हे शहर सिंधू शहरांसारखे आखीव होते. तेथे चार विभागात लोक राहत असत. घोलावीरासारखी त्याची रचना होती. ती इ.पू. २१०० च्या सुमारासची आहे. तेव्हा तो सिंधू संस्कृतीचा प्रभाव म्हणता येईल, याशिवाय नमाझगा वगैरे इतर रस्थळांच्या उत्खननातही सिंधू संस्कृतीच्या संपर्काच्या खुणा आढळतात. सिंताश्ता येथील काही दफने ऋग्वेदात वर्णिलेल्या प्रकारची वाटतात. त्यात घोडा बळी दिला जात असे.

**इराक :**

आर्य इराणात भारतातून गेले हे आपण पाहिले. त्यांच्यापैकी काही जण पुढे इराकमध्ये गेले. तेथे इ.पू. १८०० च्या सुमारास कॅसाईट नावाचे नवे लोक आले. त्यांनी १७६० मध्ये बाबिलोन जिंकले आणि इ.पू. ११७० पर्यंत राज्य केले. त्यांच्या काही लोकांची आणि देवतांची नावे इण्डो-आर्यन आहेत. उदा., सुरियास (सूर्य), मरुतम् (मरुत्), सुमालिया (पर्वताची देवता, हिमालय) इत्यादी. एका राजाचे नाव अविरत (अभिरथ) होते. बुग म्हणजे देव (भग, भगवान) इंदबुग (इंद्र भगवान), विशेष म्हणजे कैंसाईट काळात विटांच्या आकाराचे प्रमाण ४ : २ : १ होते. हा निश्चित सिंधू संस्कृतीचा प्रभाव असावा,

कॅसाईट लोक इराक जिंकू शकले याचे मुख्य कारण त्यांच्याजवळ घोडा घोडा होता. त्यापूर्वी तेथे घोडा माहीत नव्हता. बाबिलोनियन आणि असिरीयन भाषेत घोड्यालला 'इसू' असा शब्द आहे, तो संस्कृत 'अन्न' पासून आलेला

आहे. कॅसाईट लोक वैदिक वाङ्मयातील 'केशी' असावेत असे काही विद्वानांचे मत आहे. भूमध्य समुद्राच्या प्रदेशातील फिनिशियन हे ऋग्वेदातील पणि असावेत् असे समजले जाते. सिंधू लिपी आणि फिनिशियन लिपी यात लक्षणीय साम्य आहे, हे या संदर्भात नमूद करणे आवश्यक आहे.

**तुर्कस्तान :**

तुर्कस्तानातील बोधाजकोई या ठिकाणच्या उत्खननात १९०६ मध्ये एक कोरीव लेख सापडला. त्यात हिटाईन आणि मिटानी यांच्यात झालेल्या तहाची कलमे आहेत. त्यात त्यांनी त्यांच्या देवतांना इंद्र, वरुण, मित्र, नासत्य - आवाहन केले आहे. त्या इराणी देवता आहेत, असे पाश्चात्त्य पंडितांचे मत आहे. परंतु त्या शंभर टक्के भारतीय (वैदिक) आहेत यात शंका नाही. कारण अवेस्तामध्ये इंद्र हा दैत्य आहे, आणि नासत्याचे रूप 'नाहत्य' झाले असते. शिवाय वरुण हा इण्डो-इराणी देव नाही. तसेच घोड्याला शिकवून तयार करण्याचे उल्लेखही सापडले आहेत. त्यातही संस्कृत शब्द आहेत.

**इजिप्त :**

इजिप्तमध्ये इ.स.१८ व्या शतकात हिक्सॉस लोकांनी आक्रमण केले आणि तेथे शंभर वर्षे (१७७५ - १६७५) राज्य केले, त्यांच्याजवळ घोडा होता. त्यांची नावेही इण्डो-आर्यन आहेत. उदा., अपच्नन् (अपघ्नन), कॉस (कर्ता) इ. अमार्ना येथील पत्रव्यवहारात काही इण्डो-आर्यन नावे आढळून आली आहेत. उदा., अर्तमन्य (ऋतमन्य म्हणजे सत्यप्रिय), बिरिदश्व (बृहदाश्व), अझवीय (आर्जव, प्रामाणिक), इदरूत (इंद्राचा लाडका), सत्तीय (सत्य), सुबुंद (सुबंदु), सुमित (सुमित्र), सुवरदत (स्वरदत्त), यशदत, सुवर्ण (शक्तिमान), अभिरथ इत्यादी. " ही सर्व नावे भारतीय आहेत यात शंका नाही. हे सर्व लोक इजिप्तच्या शासनातील उच्च अधिकारी होते. राज्यपाल, सेनानी अशा मोठ्या पदावर ते होते. याशिवाय आणखी चार जमातीची नावे आहेत. शेकेलेश, एकवेश, तेरेश आणि वेशेश. या जमाती ऋग्वेदातील अनुक्रमे सिप्रू (ग्रीक सिकेलेस), एकवेश (ग्रीक अकेअन्स) आणि तेरेश-वेशेश म्हणजे म्हणजे तुर्वश तुर्वश हे हे लोक असावेत. असे विद्वानांचे मत आहे. या जमाती मूळ भारतातील असून दाशराज्ञ युद्धात पराभव झाल्यामुळे परागंदा झाल्या आणि त्यांनी भारताबाहेर स्थलांतर केले. इ.पू. १२०० च्या सुमारास त्या इजिप्त आणि ग्रीसमध्ये पोचल्या,

याशिवाय आणखीही काही जमाती आहेत. त्या इ.पू. १२२९ मध्ये इजिप्तचा फरोहा दूसरा रामसेस याच्याबरोबर लिबियात लढल्या आणि त्याचा पराभव केला. अखवयस, मदक, तुरुश, सेकेश आणि सदैन अशी त्यांची नावे आहेत. डॉ. सुनीतीकुमार चटर्जी यांच्या मते अखवयस म्हणजे यश्क्षु, सकर्श म्हणजे सिप्रू आणि तरुश म्हणजे तुर्वश, ह्या वैदिक जमाती होत,

वरील पुराव्यावरून एक गोष्ट सिद्ध होते ती ही की, इ.पू. दुसऱ्या सहस्रकात पश्चिम आशियात इण्डो-आर्यन भाषा बोलणारे लोक होते, आणि तेथील राज्यकारभारात त्यांना महत्त्वाचे स्थान होते. भारतीय परंपरेचा पुरावा या निष्कर्षाला पुष्टी देतो. पश्चिम आशियातही एक महत्त्वाचा पुरावा अलीकडे उपलब्ध झाला आहे. तेथे मोराची चित्रे रंगीत खापरांवर काढलेली आढळतात. सिंधू संस्कृतीच्या खापरांवर ती आहेतच. मोराची मातीची चित्रेही सिंधु स्थळी सापडली आहेत. शिवाय मोर आपल्याकडून त्यांच्याकडे निर्यात होत असे. अत्यंत कलापूर्ण चित्रे हडप्पाच्या 'एच' ह्या दफनभूमीच्या उत्खननात मिळाली. पश्चिम आशियन सर्वप्रथम नूझी (तुर्कस्तान) येथील मुद्रांवर मोराची चित्रे आहेत (इ.पू. १६००) त्यानंतर एलाम (इराण), मेगिडो (इजिप्त) येथे आणि इतर स्थळीही ती सापडतात. इ.पू. १८०० पासून पश्चिन आशियात इण्डो- आर्यन भाषा बोलणाऱ्या लोकांचेही आगमन झाले. यावरून उत्तर सिंधू काळात लोकांनी तिकडे स्थलांतर केले असावे असे स्पष्ट दिसते.

**भारतातील स्थलांतरे:**

इ.पू. २२०० - २००० ह्या काळात घडून आलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे सिंधू लोकांना भारताच्या निरनिराळ्या प्रदेशात स्थलांतर केले. विदेघ माधव सरस्वतीच्या खोऱ्यातून निघून सदानीरा (हल्लीची बिहारमधील गंडक) नदीपर्यंत गेला याचा उल्लेख शतपथ ब्राह्मणात (१.४.१: १०-१९) आहे. त्याने अग्नीची प्रार्थना केली की, देवाने गंगेच्या खोऱ्यातील जंगल जाळून आर्यांना शेतीसाठी जमीन उपलब्ध करून द्यावी. विदेश माथन आणि त्याचा पुरोहित गोतम राहुगण हे त्यांच्या लोकांबरोबर सदानीरा नदीपर्यंत गेले. बिहारमधील ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीवर त्यांचा प्रभाव स्पष्ट जाणवतो. सिंधुच्या भांड्यासारख्या घाटाची भांडी, गहू आणि बालींची लागवड, रोटी भाजण्यासाठी तंदूर, इतकेच नव्हे तर एक कोनमापकही तेथे सापडला, तो कालीबंगन येथील कोनमापकासारखा आहे. काही आर्य मंडळी आयूबरोबर पुढे गेली, असे बौधायन श्रौतसूत्रांवरून (१८.४४ : ३९७-९९) वाटते. बंगालमधील पांडुराजार डिपी या ताम्रपाषाणयुगीन वसाहतीच्या उत्खननात सिंधू भांड्यांच्या घाटासारखे यष्टिपात्रांचे (Dish-on-stand) अवशेष आणि एक इजिप्शियन मुद्राही सापडली. या प्रकारची भांडी गोलबाई भासण ह्या ओरिसातील प्राचीन स्थळी मिळाली, याचा अर्थ तिथपर्यंत सिंधू लोक/आर्य पोचले होते."

मैत्रायणी संहितेत काही मंडळी एकमेकात बोलताना एकजण म्हणतो की, आपण दक्षिणेत जाऊ, कारण तेथे अन्न मिळेल, काही मंडळी सरस्वतीच्या खोऱ्यातून दक्षिणेकडे म्हणजे मध्य भारतात किंवा हल्लीच्या माळव्यात - गेली असावीत. कारण तेथे कायथा ह्या उज्जैनजवळील एका ठिकाणी सिंधू संस्कृतीशी मिळतीजुळती खापरे आणि मणी इत्यादी मिळाले. तसेच आर्य विदर्भात गेल्याचाही उल्लेख जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणात आहे. विदर्भात अमरावतीजवळ तुळजापूरगडी येथे ताम्रपाषाणयुगीन वस्तीचा शोध लागला. परंतु सिंधू संस्कृतीचे लोक त्याआधी गुजरातेतून तापीच्या खोऱ्यातून खानदेशात आणि मध्य महाराष्ट्रात पोहोचले होते. नंदुरबार जिल्ह्यात १५-२० उत्तर सिंधुंची स्थळे उजेडात आली आहेत. तसेच मध्य महाराष्ट्रात पुण्यापासून १५० किलोमीटरवर दायमाबाद (जि. नगर) येथे सिंधू संस्कृतीची मोठी वसाहत होती आणि तिचेउत्खननही झाले आहे.

आर्य/सिंधू लोक भारतात जिथे जिथे पोचले, तेथे त्यांनी आपला छाप उठवला. सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की, आर्यांनी भारतात चाकावर घडविलेली रंगीत भांडी, गह-बार्लीची लागवड, तांब्याचे तंत्रज्ञान, घोडा, यांचा प्रसार केल्ला, इतकेच नव्हे, तर भाषा दिली, कारण भारतात ज्या प्रदेशात आज इण्डो-आर्यन भाषा बोलल्या जातात, नेमके तेथेच सिंधू लोक/आर्य पोहोचले होते. याहूनही महत्त्वाची गोष्ट ही की नेमक्या त्याच प्रदेशात नंतर बुद्ध-महावीराच्या काळात महाजनपदे उदयास आली. मनूच्या काळातील प्रलय आणि उदयनचे ऐतिहासिकत्व ह्या ऐतिहासिक घटना होल्या यात शंका नाही. इ.पू. २२००-६०० हा काळ आता इतिहासकाळ समजणे चूक ठरणार नाही.

शेवढी मुख्य प्रश्न अनुत्तरीत राहतो, तो म्हणजे आर्याचे मूळ वसतिस्थान कोणते? ह्याला आता एकच उत्तर आहे, ते म्हणजे साऱ्या जगभरातील लोक हे एका आफ्रिकन काळ्या मातेची लेकरे आहेत. ती ७५ हजार वर्षापूर्वी तेथून निघाली आणि समुद्र किनाऱ्याने चालत भारतात पोचली व येथून पुढे काश्मीरमार्गे पश्चिम आशियात व युरोपात, अमेरिकेत पोचली, जेथे जेथे त्यांनी वस्ती केली, तेथील विशिष्ट पर्यावरणामुळे त्यांच्या त्वचेचा रंग, डोळे, बांधा यात बदल झाला. आता कोणी आदिवासी नाही. हे सारे गुणसूत्रांच्या अभ्यासावरून सिद्ध झाले आहे.

**गुणसूत्र परीक्षा (DNA Test):**

गुणसूत्राचा शोध हा क्रांतिकारी समजला जातो. पुरातत्त्वासाठी त्याचा उपयोग करून घेता येतो. सोप्या भाषेत सांगायचे तर त्यात दोन रेणू (molecule) मानवाच्या शरीरात असतात. त्यापैकी Y क्रोमोसोम हा पित्याकडून येतो आणि mtDNA (Mitochondrial DNA) हा मातेकडून येतो. त्यांच्या तपासणीवरून पूर्वजांचा शोध घेता येतो. भारतातील लोकांवर आजवर नऊ अभ्यासक्रम झाले. त्याचे पुरातत्त्वासाठी

महत्त्वाचे निष्कर्ष म्हणजे सुमारे १५ ते २० लाख वर्षांपूर्वी आग्नेय आफ्रिकेतून मानव प्रथम बाहेर पडल्यानंतर भारतात आला आणि येथून नंतर काश्मीरमार्गे पश्चिम आशिया आणि युरोपात गेला. तसेच नंतर ७५००० वर्षांपूर्वी आफ्रिकेतून आपल्यासारखा दिसणारा बुद्धिमान मानव (Homo sapien sapiens) जगभर पसरला. तेव्हा कोणी आर्य नाही आणि कोणी आदिवासी नाही. भारतापुरते बोलायचे झाल्यास असे दिसून येते की, समाजातील उच्चवर्णीय लोक आणि वन्य जमाती यांच्या गुणसूत्रात फारसा फरक नाही. पंजाबी माणूस आणि दक्षिण भारतातील चेंचू लोक यांच्यात काहीही फरक नाही, तेव्हा आर्य-अनार्य हा वाद निष्फळ आहे. सगळ्या जगातील, अमेरिकेपासून ऑस्ट्रेलियापर्यंत, सर्व लोकांची माता एक काळी (आफ्रिकन) आई आहे. त्यांच्यात पडलेला हा फरक हा पर्यावरणामुळे पडलेला आहे.

## जनपदे आणि महाजनपदे

जनपद : जन म्हणजे समान संस्कृतीचे किंवा एका जमातीचे लोक. त्यांनी स्थापन केलेल्या वसाहतींना जनपद म्हणत किंवा जनवस्ती करून राहिलेल्या ठिकाणांना जनपद ही संज्ञा लावण्यात येत असे. वैदिक साहित्यात ग्राम, विश व जन या संज्ञा वेगवेगळ्या स्तरांवरील लोकांच्या समूहांसाठी वापरलेल्या आहेत. अनेक कुटुंबाचे ग्राम होई, अनेक ग्रामांचे मिळून विश होई व या सर्वांचे मिळून जन होई. प्रथम आर्यांचे जीवन भटके होते व त्यांचे जमातींनुसार संघ असत. त्यांतील पाच संज्ञास पंचजन म्हटले आहे. सुदासाने २१ जनांचा पराभव केल्याचा उल्लेख सापडतो. यासच पुढे जनपद म्हणू लागले. त्यांची सुरुवात केव्हा झाली, यासंबंधी लिखित पुरावा उपलब्ध नाही. तथापि छांदोग्य, बृहदारण्यक उपनिषदांत, ब्राह्मणग्रंथ, अष्टाध्यायी, महाभारत, कौटिल्याचे अर्थशास्त्र, बौद्धग्रंथ, मत्स्य, मार्कंडेय, वामन, ब्रह्म इ. पुराणे यातील उल्लेखांवरून असे दिसते की, जनपदे इ. स. पू. १००० पासून अस्तित्वात होती आणि इ. स. पू. चौथ्या शतकापर्यंत त्यांची भरभराट झाली व पुढे गुप्तकाळापर्यंत ती काही प्रमाणात अस्तित्वात असावीत. काही ठिकाणी जनपदाचे लोक व देश असे दोन्ही अर्थ दिले आहेत.

एखादा प्रदेश जिंकून तेथील मूळच्या रहिवाशांना अंकित करून किंवा मुळीच वस्ती नसलेल्या प्रदेशात नव्याने वसाहत करून जनपदांची स्थापना होई. प्रस्थापित करावयाच्या जनपदाचे कौटिल्याने जे वर्णन दिले आहे त्यावरून असे दिसते की, सामान्यतः एका जनपदास सु. आठशे खेडी व इतर अनेक लहानमोठी गावे असत. जनपदाची राजधानी बहुधा एका किल्ल्यात असे. जनपदाचे दोन प्रकार होते : एकावर राजाचा सत्ता चाले, तर दुसरी गणराज्ये होती. गणराज्यांत शासनाचे विविध प्रकार चालू असत. जनपद राजाधीन वा गणाधीन कसेही असले, तरी त्याचा कारभार सभा व परिषद यांच्या मार्गदर्शनानुसारच चाले. जनपदांचे मध्य, प्राच्य, उदीच्य, दक्षिणापथ, अपरांत, विंध्यपृष्ठ व पर्वत असे सात भौगोलीक विभाग केलेले असत.

प्राचीन राज्यशास्त्रात राज्याच्या सात अंगापैकी (राजा, अमात्य, जनपद, दुर्ग, कोष, दंड आणि मित्र) जनपद हे एक अंग आहे. येथे राज्याचे ग्रामीण भाग व तेथे असलेले लोक असा जनपदाचे अर्थ आहे. बौद्ध ग्रंथात सोळा महाजनपदांचा उल्लेख आहे. ती अशी : अंग, मगध, काशी, कोशल, विदेह, मल्ल, चेदी, वत्स, कुरू, पांचाल, मत्स्य, शूरसेन, अश्मक, अवंती, गंधार व कंबोज. त्यांपैकी काशी, कोशल, विदेह व मगध ही जनपदे विशेष प्रसिद्धीस आली. यांशिवाय इतर अनेक जनपदांचे उल्लेख पुराणांतून आढळतात. अमरकोशात देश, राष्ट्र, विषय, जनपद हे शब्द समान अर्थी योजले आहेत.

ही जनपदे म्हणजे केवळ भौगोलिक विभाग नव्हते तर प्रत्येक जनपदातील लोकांचे सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय जीवन स्वतंत्र असे आणि स्वतंत्रपणेच विकसित होत होते. प्रत्येक जनपदाची भूमी तिथल्या रहिवाशांची खरीखुरी धात्री अर्थात माता होती. त्यांची भाषाही एकच असे. ते समान देवतांची पूजा-अर्चा व उपासना करीत. त्यामुळे त्यांच्यात भ्रातृभाव वसत असे.

**प्राचीन भारतातील महाजनपदे (Mahajanapadas in ancient India)**

भारतीय उपखंडाच्या प्राचीन इतिहासातील राज्ये. यांमध्ये सोळा महाजनपदांना महत्त्वाचे स्थान आहे. वैदिक संहितात जनपद हा शब्द सापडत नाही. काही इतिहासकारांनी अनेक गावांच्या समूहाला जनपद ही संज्ञा वापरली आहे. इतिहासकारांनी या जनपदांची तुलना ग्रीस व रोममधील नगर राज्यांशी केली आहे. ज्या प्रकारे मॅसिडोनियाने ग्रीस व रोम जिंकून आपले विशाल राज्य स्थापले, तसेच भारतात मगधच्या राजांनी इतर महाजनपदे जिंकून आपल्या विशाल साम्राज्याचा विस्तार केल्याचे म्हटले आहे.

इ. स. पू. सहाव्या शतकाच्या सुरुवातीला भारतात अनेक छोटी-मोठी राज्ये अस्तित्वात होती. ‘महा’ म्हणजे मोठे आणि ‘जनपद’ म्हणजे जास्त लोकसंख्या असणारे क्षेत्र अशी ‘महाजनपद’ या शब्दाची व्याख्या करण्यात येते. याचा अर्थ जास्त लोकसंख्या असणारा प्रदेश असा होतो. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात एका ग्रामात (गावात) १०० ते ५०० घरे असल्याचे म्हटले आहे. तर एका जनपदात ८०० गावे असल्याचे म्हटले आहे. या ग्रामाचे क्षेत्रफळ एक ते दोन कोस (एक कोस म्हणजे सु. तीन किमी.) असे. प्रत्येक जनपदात केंद्रीय स्थानी एक दुर्ग असे, त्यालाच राजधानी म्हणून संबोधत असत. सुरुवातीला जी छोटी राज्ये अस्तित्वात होती, त्यांत संघर्ष होत असे. अशा अनेक छोट्या राज्यांची यादी सुरुवातीच्या बौद्ध ग्रंथांत मिळते. त्यातील निर्बल राज्ये नष्ट होत शक्तिशाली राज्यात विलीन होत गेली. शेवटी अधिक शक्तिशाली आणि विस्ताराने मोठ्या अशा राज्यांना ‘महाजनपद’ असे संबोधले जाऊ लागले. महाभारतात गांधार, मगध, पांचल, कुरू, अंग, चेदी वगैरे तत्कालीन अनेक छोट्या मोठ्या राज्यकर्त्यांनी युद्धात भाग घेतल्याचे दिसून येते.

पाणिनीच्या अष्टाध्यायीमध्ये संघ आणि जनपद यांचा उल्लेख आहे. या ग्रंथातून आपल्याला शुद्रक, मालव, अंबष्ठ, हस्तिनायन, मद्र, शिबी, आश्वायन व आश्वकायन ही गणराज्ये प्रबळ असल्याचे समजते. मार्कंडेय पुराणात मध्य प्रदेशात मत्स्य, कुशूल, कुल्य, कुंतल, काशी, कोसल, अर्वूद, पुलींद, समक, वृक आणि गोवर्धनपूर यांचे उल्लेख सापडतात. या ग्रंथानुसार अवंती हे जनपद अपरांतात होते. बौद्ध वाङ्मयात गौतम बुद्धांच्या जन्मापूर्वी अशी सोळा स्वतंत्र राज्ये अस्तित्वात असल्याचे उल्लेख मिळतात. अंगुत्तरनिकाय या बौद्ध ग्रंथात अंग, मगध, काशी, कोसल, मल्ल, वृज्जी, चेदि, वत्स, कुरू, पांचाल, मत्स्य, शूरसेन, अश्मक, अवंती, गांधार आणि कंबोज या स्वतंत्र राज्यांचा उल्लेख सापडतो. तर पाणिनीच्या ग्रंथात कंबोज, गांधार, ब्रह्मणक, कछ, मद्र, त्रिगर्त, कुरू, कोसल, काशी, मगध, श्रावस्ती, कालिंग आणि अश्मक या जनपदांचा उल्लेख मिळतो. भगवती सूत्र या जैन ग्रंथात अंग, वंग, मगध, मलय, मालव, अछ्, वच्छ्, कच्छ्, पांड्य, लाढ, वज्जि, मोलि, काशी, कोसल, अवाह, समुत्तर ही नावे येतात. या राज्यांची नावांची व्युत्पत्ती जरी समजत नसली तरी ही नावे तेथील लोकांवरून पडली असावीत. या ग्रंथात सोळा राज्यांचे उल्लेख सापडतात; परंतु बौद्ध ग्रंथातील आणि या ग्रंथातील काही राज्यांची नावे भिन्न आहेत. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, या ग्रंथांच्या रचनेचा काळ वेगवेगळा आहे. उदा., वृज्जी आणि मल्ल या राज्यांचा उल्लेख बौद्ध व जैन ग्रंथात येतो; परंतु तो पौराणिक ग्रंथात येत नाही.

या सोळा महाजनपदांमधे काही जनपदात राजतंत्र होते, तर काहींमध्ये गणतंत्र राज्यप्रणाली होती. राजतंत्र प्रकारात राजाच्या हाती सत्ता असे. अंग, काशी, चेदी येथे राजतंत्र होते, तर शाक्य, शुद्रक, मालव, वृज्जी या महाजनपदात गणतंत्र प्रणाली होती. गणतंत्र असणाऱ्या जनपदात दोन प्रकारे कारभार चाले. एकात सर्व नागरिक एकत्र येऊन आपला कारभार करत, तर दुसऱ्या प्रकारात उच्चकुलीन वर्ग कारभार करत असे. या महाजनपदात ‘काशी’ हे सर्वांत बलवान महाजनपद असल्याचे तत्कालीन बौद्ध ग्रंथात म्हटले आहे. याचे पुरावे अनेक जातकांत सापडतात. ‘गुत्तील जातकात’ वाराणसी हे अधिक महत्त्वाचे नगर असल्याचा उल्लेख आहे. बुद्ध आणि महावीर यांच्या कालखंडात कोसल, मगध, वत्स आणि अवंती ही महत्त्वाची जनपदे होती. बिंबिसाराने मगध सम्राज्याची स्थापना करून आपल्या शेजारील अंग राज्य जिकून घेतले, तर काशीचे राज्य कोसलमधे विलीन झाले.

या महाजनपदांमधे आहत नाणी (Punch-marked coins) या चलनाचा वापर केला जात असे. यावर अनेक चिन्हे ठोकून अंकित केलेली असत. अनेक उत्खननातून या जनपदांची नाणी उपलब्ध झालेली आहेत. या नाण्यांवर प्रामुख्याने मानवी आकृती, प्राणी, जलचर, झाडे, चंद्र, सूर्य, पर्वत, धार्मिक मंगलचिन्हे, आयुध चिन्हे उमटवलेली दिसतात. ही चिन्हे

नाण्याच्या विशिष्ट भागावर व ठरावीक ठिकाणी उमटवलेली दिसून येतात. सुरुवातीला नाण्याच्या एकाच बाजूवर चिन्हे उमटवलेली असायची; परंतु नंतरच्या काळात दोन्ही बाजूंवर उमटवलेली दिसतात. या चिन्हांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न प्रसिद्ध नाणे अभ्यासक दुर्गा प्रसाद, धर्मानंद कोसंबी, परमेश्वरीलाल गुप्त यांनी केला. महाजनपदांच्या नाण्यांवरील चिन्हे, त्यांचे वजन, तयार करण्याची पद्धत, धातूची शुद्धता यांत सूक्ष्म फरक असल्याचे मत अभ्यासकांनी नोंदवले आहे.

प्राचीन भारतीय ग्रंथ, ग्रीक-रोमन प्रवासवर्णने आणि बौद्ध ग्रंथात उल्लेखलेल्या महाजनपदांची ओळख एकोणिसाव्या शतकात केली गेली. याचे श्रेय भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाचे पहिले महासंचालक सर अलेक्झांडर कनिंगहॅम यांना जाते. महाजनपदांच्या भूमीत दिल्लीमधील पुराना किला, हस्तिनापूर, मथुरा, कांपील, अहिच्छत्र, अयोध्या, कौशांबी, अलाहाबादमधील शृंगवेरपूर, बनारसमधील राजघाट, श्रावस्ती, काली नदीच्या परिसरात अतरंजीखेरा यांसारख्या ठिकाणी उत्खनने झालेली असून अनेक प्राचीन अवशेष मिळाले आहेत. इ. स. पू. ३२६ मध्ये अलेक्झांडरच्या स्वारीच्या वेळी यातील अनेक गणराज्ये अस्तित्वात असल्याचे त्याच्या बरोबरच्या ग्रीक इतिहासकारांनी लिहून ठेवले आहे. मेगॅस्थिनीजने त्याच्यावेळी हिंदुस्थानातील एकंदर राज्यांची संख्या ११८ दिलेली आहे. ह्युएनत्संगने (युआन च्वांग) महाजनपदांच्या राजधान्यांना भेटी दिल्याचे त्याच्या प्रवासवर्णनात दिसते.

मगध : प्राचीन भारतातील इतिहासप्रसिद्ध प्रदेश. या प्रदेशाच्या भूसीमा वेळोवेळी बदलत गेल्या असल्या, तरी विद्यमान बिहार राज्यातील नालंदा, औरंगाबाद, हाजीपूर, बिहारशरीफ, गया, पाटणा, ससराम या जिल्ह्यांतील भूभाग या प्रदेशात सामान्यपणे अंतर्भूत होता असे म्हणता येईल.

मगध नावाच्या व्युत्पत्तीविषयी वि. का. राजवाडे यांनी 'मगान् दधाति इति मगधः' (मग लोकांना धारण करणारा देश) असे म्हटले असून 'मग' म्हणजे शाकद्वीपातील (मध्य आशिया) ब्राह्मण होत. ते ज्या देशात येऊन राहिले तो मगध देश.

मगधचा उल्लेख कधी भौगोलिक प्रदेश म्हणून, तर कधी साम्राज्य म्हणून, तर कधी एक महाजनपद म्हणून प्राचीन संस्कृत व पाली वाङ्मयात, विशेषतः वैदिक वाङ्मय, रामायण, महाभारत, बौद्ध साहित्य व पुराणे यांत येतो. तसेच मीग्यॅस्थिनीझ, फाहियान, ह्यूएनत्संग यांसारख्या प्रवाशांच्या प्रवासवर्णनांतून आढळतो. अंगुत्तर निकायातील निर्देशानुसार बुद्धाच्या वेळी जी सोळा महाजनपदे होती,त्यांपैकी मगध हे एक होय. ऋग्वेदात मगधाचा उल्लेख 'कीकट देश' या नावाने केला आहे पण अथर्ववेदात मगध असाच स्पष्ट उल्लेख आढळतो पण तो काहीसा अवहेलनात्मक आहे. त्यावरून वैदिक आर्यांच्या प्रभावाबाहेर हा प्रदेश असावा, असे वाटते. बौद्ध साहित्याच्या सर्वांगीण अभ्यासानंतर टॉमस विल्यम रीस डेव्हिड्झ (१८४३-१९२२) या प्रख्यात प्राच्यविद्या पंडितांनी मगधाच्या चतुःसीमा पुढीलप्रमाणे सांगितल्या आहेत : पूर्वेस अंग देश, पश्चिमेस शोण नदी, उत्तरेस गंगा आणि दक्षिणेस छोटा नागपूरचे पठार. जैन ग्रंथांतही मगधाचा पवित्र जनपद म्हणून उल्लेख आहे. जैन तत्त्वज्ञान व आचार धर्म यांचे पालन मगधात चांगल्या प्रकारे होत असल्याचा उल्लेख निशीथसूत्रात मिळतो. वैदिक वाङ्मयात पूर्व दिशेस व्रात्यांचे प्रियधाम म्हटले आहे. त्यांचा वेदप्रामाण्यास व पशुहिंसेला विरोध होता. जैन तीर्थकरांपैकी वीस तीर्थकरांचे निर्वाण मगधातच झाले. या भागात यती, बौद्ध इ. वैदिकेतर पंथ व धर्म अधिक प्रभावी होते. त्यामुळे मगध ही व्रात्यांची पुण्यभूमी आणि वैदिक ब्राह्मणांची पापभूमी अशी कल्पना रूढ झाली. 'मग' शब्दाचा अर्थही दोष अथवा पाप असाच शब्दकल्पद्रुमात आढळतो.

मगधचा प्राचीन इतिहास आख्यायिकांतून आणि पौराणिक कथांतून आढळून येतो. पुराणांनुसार जन्हू कुळातील गय या राजाने गया नावाचे राज्य स्थापन केले. त्यालाच पुढे मगध राज्य म्हणण्यात येऊ लागले. पौराणिक राजांमध्ये बृहद्रथ, जरासंध इ. महत्त्वाकांक्षी राजे झाले. श्रीकृष्णाच्या मुत्सद्दीपणामुळे पांडवांपैकी भीमाकडून मल्लयुद्धात जरासंधाचा वध करण्यात आला. विद्वानांच्या मते या घराण्यातील रिपुंजय हा बार्हद्रथ वंशातील अखेरचा राजा होता. भट्टिक नावाच्या एका सामंताने त्याच्याविरूद्ध बंड करून त्याला मारले आणि आपला मुलगा बिंबिसार (इ.स.पू. ५८२-५५४) याला मगधाच्या गादीवर बसविले, असे महावंस ग्रंथात म्हटले आहे. शिशुनाग वंशातील या पराक्रमी राजाने मगध राज्याची प्रतिष्ठा व सामर्थ्य यांत भर घातली. बिंबिसाराच्या कारकीर्दीविषयी भिन्न मतांतरे आहेत. त्यानेच मगध

राज्याची स्थापना केली आणि तो हर्यंक कुलातील होता, असे बुद्धचरितात म्हटले आहे. बिबिंसाराला अनेक पुत्र होते. त्यांपैकी अजातशत्रू (कार.इ.स. पु. ५५४-५२७) मगधाच्या गादीवर आला. पितृहत्या करून अजातशत्रूने राज्यारोहण केले. असा एक प्रवाह बौद्ध साहित्यात सांगितला आहे आणि त्या पापाची उपरती होऊन तो बुद्धानुयायी झाला. बुद्धाच्या अवशेषांवर त्याने स्तूप बांधला व बौद्ध भिक्षूंची पहिली संगिनी (परिषद) राजगृह (राजगीर) येथे भरविली. शिशुनाग क्षत्रिय हे व्रात्य होते व ते वैदिक कर्मकांडांपासून अलिप्त राहिले. त्यामुळे याच कुळातील पार्श्वनाथाने चातुर्याम धर्माची स्थापना केली. त्याला मगध, अंग व वाज्जिसंघ या जनपदांत बहुसंख्य अनुयायी लाभले. साहजिकच मगधचे प्राचीन वैदिक रूढींचे खंडण करणारे व नव्या आचार-विचारांचे प्रवर्तन करणारे प्रमुख केंद्र म्हणून महत्त्व वाढले. बौद्ध ग्रंथांत अजित केशकंबली, गोशाल मस्करिन, पूर्ण काश्यप इ. विचारवंतांचा उल्लेख येतो. हे सर्वजण वैदिक विचारांविरूद्ध होते आणि त्यांची कर्मभूमी मगधच होती. या काळातच मगधात भाषेच्या क्षेत्रात क्रांती झाली. बुद्ध, महावीर यांनी संस्कृतऐवजी पाली-मागधी या प्राकृत लोकभाषांचा स्वीकार केला.

अजातशत्रूला उदायिन या त्याच्या मुलाने ठार मारून मगधची गादी बळकाविली. त्याने पाटलिपुत्र (पाटणा) वसविले व राजधानी तेथे हलविली. काही विद्वानांच्या मते अजातशत्रूच्या सुनिधी व वस्सकार या दोन मत्र्यांनी वैशालीच्या वज्जींपासून संरक्षण व्हावे, म्हणून पाटलिपुत्र हे शहर वसविले. उदायिनचा अंत कारस्थानांतूनच झाला. त्यानंतर नंद वंशाची (इ.स.पू. ३६४—३२४) अधिसत्ता मगधावर आली. नंद राजे शूद्र कुळातील होते. त्या वंशातील महापद्म नंद याने अनेक प्रदेश पादाक्रांत करून मगधाचे साम्राज्यात रूपांतर केले. अलेक्झांडर द ग्रेट (इ.स.पू. ३५६—३२३) याने मगध साम्राज्याच्या विशाल सेनेविषयी आपल्या हेरांकडून माहिती ऐकली होती. म्हणून त्याने इ.स.पू. ३२६ च्या फेब्रुवारीत हिंदुस्थानातून परत जाण्याचा निर्णय घेतला. नंद वंशाच्या कारकीर्दीत मगधमध्ये नवीन वजनमापे सुरू करण्यात आली, असा उल्लेख अष्टाध्यायीवरील काशिका टीकेत आढळतो. नंद राजांचा जैन धर्माला आश्रय होता. नंद साम्राज्याची हद्द उत्तरेस बनारसपासून मोंघीर आणि दक्षिणेला सिंगभूमपर्यंत पसरली होती. इ.स.पु. ३२४ च्या सुमारास चाणक्याच्या साहाय्याने चंद्रगुप्त मौर्याने नंदराजाला पदच्यूत करून मगधाची गादी बळकाविली.

मौर्यवंशातील चंद्रगुप्त मौर्य .इ.स.पू. ३००) व सम्राट अशोक (.इ.स.पू. २६९—२३२) यांनी मगध साम्राज्याचा प्रचंड विस्तार केला. अशोकाने बौद्ध धर्माची तिसरी परिषद पाटलिपुत्र येथे भरविली अनेक विहार व स्तूप बांधले अशोकानंतर मौर्य वंशात दुबले राजे आले व ग्रीकांची मगधावर आक्रमणे झाली. मौर्यांचा सेनापती पुष्यमित्र शुंग (कार.इ.स.पू. १८७—१५१) याने या संधीचा फायदा घेऊन बृहद्रथाचा खून केला आणि शुंग घराण्याची सत्ता मगधावर आली. त्याने संकोच पावलेल्या मौर्य साम्राज्याची सत्ता पंजाबात जलंदर व शाकल (सियालकोट) पर्यंत वाढविली. त्याने वैदिक धर्माचे आणि संस्कृत विद्येचे पुनरूज्जीवन केले आणि अश्वमेध यज्ञ केला तथापि भारहूत आणि सांची येथील तत्कालीन स्तूपांवरून व तोरणांवरील शिल्पांकनांवरून शुंगांच्या काळी (इ.स.पू. १८७—७५) बौद्ध धर्म भरभराटीत असावा, असे दिसते. शुंगांनंतर येथे काही काळ कण्व राजांनी राज्य केले पण मगधाला पुन्हा एकदा वैभवाचे दिवस आले ते गुप्तवंशाच्या अमदानीतच. गुप्तकालात (इ.स. ३००—५५५) पहिला चंद्रगुप्त (कार.३२०—३३५), समुद्रगुप्त (कार. ३३५—३७६), दुसरा चंद्रगुप्त (कार.३७६—४१३). पहिला कुमारगुप्त (कार.४१३—४५५) असे एकापाठोपाठ पराक्रमी आणि कलाभिज्ञ राजे झाले. त्यांनी मगधचे राज्य वाढविले आणि पाटलिपुत्र ही त्यांची राजधानी प्रसिद्धीस आली.

गुप्त राजे वैदिक धर्माचे—भागवत पंथाचे—अनुयायी होते तरी त्यांचा बौद्ध व जैन धर्मांना विरोध नव्हता. त्यांच्या अनेक मंत्र्यांनी व अधिकाऱ्यांनी बौद्ध संघास देणग्या दिल्याचे उल्लेख मिळतात. सुप्रसिद्ध बौद्धतत्त्वज्ञ वसुबंधू याला समुद्रगुप्ताचा आश्रय होता. गुप्त साम्राज्याबद्दल फाहियान या चिनी प्रवाशानेही प्रशंसोदगार काढले आहेत. इ.स. पाचव्या-सहाव्या शतकांत गुप्त साम्राज्यावर हूणांनी आक्रमणे केली. पुढे उज्जैनच्या यशोधर्म्याने मिहिरकुल या हूण राजाचा पाडाव करून सत्ता आपल्या हाती घेतली (५३०). यानंतर गुप्त राजांचे नाव फारसे आढळत नाही. मगधचा पुढील इतिहास अनागोंदीने भरलेला आहे. इ. स. आठव्या शतकात पाल वंशाने हा प्रदेश जिंकला. पाल राजे बौद्ध धर्मी

होते. त्यांच्या चार शतकांच्या कारकीर्दीत बोधगया, नालंदा, आदंतपुरी आणि विक्रमशिला येथे बौद्ध विद्यापीठे भरभराटीस आली. ११९७ मध्ये मगध बख्तिआर खल्जीने पालांकडून घेतले. काही वर्षे दिल्लीच्या गुलाम घराण्याची सत्ता मगधावर होती. नंतर तुघलकांनी ताब्यात घेतलेला बिहार चौदाव्या शतकात जौनपूरच्या शर्की सुलतानांनी जिंकला. त्या वेळी येथे इस्लामचा प्रसार झाला. पुढे मोगल काळात (१५२६—१८५६) मगध त्यांच्या सुभेदारांच्या सत्तेखाली व पुढे ब्रिटिश अंमलाखाली आला.या प्रदेशात झालेल्या पुरातत्त्वीय सर्वेक्षणांत तसेच विविध उत्खननांत अनेक अवशेष उपलब्ध झाले.

त्यांपैकी बोधगयेचे महाबोधी मंदिर, गयेचे विष्णुपद मंदिर, पावापुरीचे संगमरवरी दगडातील जैन मंदिर, नालंदा विद्यापीठाचे अवशेष आणि कुर्कीहार येथील स्तूपअवशेष व तारा, अवलोकितेश्वर, लोकनाथ, वागीश्वर, विष्णू, शिवपार्वती, सूर्य आणि बलराम यांच्या मूर्ती लक्षणीय आहेत. कबदल येथील बुद्धाची पाषाण मूर्ती भव्य व लक्षणीय आहे. राजगीर येथे शांतिस्तूप, गरम पाण्याचे झरे, मणियार मठ आणि वेणुवन इ. प्रेक्षणीय स्थळे आहेत. यांशिवाय गया जिल्ह्यात बराबर पर्वतरांगात अशोककालीन गुहा असून औरंगाबाद जिल्ह्यातील केऑन, उमगा, देव या स्थळी अनुक्रमे शैव, वैष्णव मूर्ती असून देव येथील पंधराव्या शतकात बांधलेले सूर्यमंदिर प्रसिद्ध आहे. येथील शिल्पावशेष पाटणा व गया येथील पुरातत्त्वीय वस्तुसंग्रहालयांत ठेवण्यात आले आहेत. पाटण्याचे के. पी. जयस्वाल वस्तुसंग्रहालय यासाठी प्रसिद्ध आहे. बोधगयेला जपान, तिबेट, चीन, आदी देशांना विसाव्या शतकात बांधलेले स्तूप असून एक पुरातत्त्वीय संग्रहालय आहे तसेच दिल्लीच्या मुस्लिम अंमलाखाली बांधलेल्या इंडो-इराणी वास्तूंचे नमुने ससराम, मोंघीर व शेरगढ येथे आढळतात. मगध ही गौतम बुद्ध, वर्धमान महावीर. चैतन्य महाप्रभू यांसारख्या थोर धर्मसंस्थापकांची कर्मभूमी असून रामकृष्ण परमहंस यांसारख्या आधुनिक तपस्व्याची ती जन्मभूमी होय.

**अंग**

अंग : बिहार राज्यातील बौद्धकालीन सोळा महाजनपदांपैकी एक विख्यात देश.नामव्युत्पत्तीबाबत मतांतरे आहेत, तथापि लोकसमूहावरून देशास हे नाव मिळाले असावे. प्राचीन संस्कृत, पाली व प्राकृत साहित्यामध्ये या देशाविषयी अनेक निर्देश आहेत. प्रवंग, कामाश्रम, अंगरट्ट व चंपादेश अशी याची नामांतरे आढळतात. बिहारमधील आधुनिक भागलपूर व मोंघीर जिल्हे आणि संथाळ परगण्याचा काही भाग मिळून प्राचीन अंग देश बनला असावा. या देशाची राजधानी चंपा (हल्लीचे भागलपूर) होती. रामायणकाली रोमपाद (ऋष्यशृंग वैभांडक या विख्यात ऋषीचा सासरा) याचे राज्य येथे होते. महाभारतकाली दुर्योधनादी कौरवांच्या प्रेरणेवरून कर्णाला अंग देशाचे राज्य बहाल करण्यात आले होते. मगध साम्राज्याचा उदय होण्याच्या अगोदरचा काळ अंग देशाच्या विस्ताराचा आणि समृद्धीचा असून त्या वेळी ब्रह्मदत्त राजाचे राज्य या देशावर होते. हर्षवर्धनकृत ‘प्रियदर्शिका’ नाटकामध्ये मगध देशावर राज्य करणाऱ्या दधिवाहन नावाच्या राजाचा उल्लेख आढळतो. जैन धर्मातील पहिली स्त्री धर्मोपदेशिका चंदनबाला ही याच दधिवाहन राजाची कन्या. याच्याच कारकीर्दीत (इ.स.पू. ६ वे शतक) मगध देशाचा राजा बिंबिसार याने हा देश आपल्या साम्राज्यात समाविष्ट केला. यानंतर हा पुन्हा स्वतंत्र झाला नाही, तथापि हे देशनाम उत्तरकालीन इतिहासामध्ये दीर्घकाळपर्यंत रेंगाळत राहिले.

**काशी**

भारताच्या उत्तर प्रदेश राज्यातील जगप्रसिद्ध तीर्थक्षेत्र, भारतातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक व त्याच नावाच्या जिल्ह्याचे आणि विभागाचे मुख्यालय. लोकसंख्या ७,०८,६४७ (१९८१). प्राचीन बौद्ध, जैन व हिंदू साहित्यात त्याची काशी वाराणसी, बनारस, अविमुक्त, आनंदवन, महाश्मशान, व्याप्ती अशी नामांतरे आढळतात. शिवाय काशेयपूर, अमरावती, केतुमती, पुष्पवती, रंगनगर, तीर्थराजी इ. नावांचाही उल्लेख आढळतो. बनारस हे नाव अनेक वर्षे वापरात होते, परंतु २४ मे १९५६ पासून शासनाने वाराणसी या नावाचा अधिकृतपणे वापर सुरू केला. गंगा नदीच्या अर्धचंद्राकृती पात्राच्या उत्तरेस डाव्या काठावर ते अलाहाबादच्या पूर्वेस सु. १३० किमी. वर वसले आहे. ईशान्य व नैर्ऋत्य सरहद्दींवरील वारणा (वारणावती किंवा वरुणा) व असी या दोन नद्यांनी वेढल्यामुळे वाराणसी या नावाने प्रख्यात झालेल्या या नगरी

सभोवतालचा प्रदेश 'काशी' या नावाने प्रसिद्ध होता. पुराणकाळात तिचे काशी हेच नाव रूढ झाले. काशी या नावाची व्यु त्पुत्ती काश् प्रकाशणे या धातूवरून किंवा काश्यजन यांवरून आली असावी. मध्ययुगातील ताम्रपटांतून ही दोन्ही नावे प्रचारात असल्याचे दिसते. मुसलमानी अंमलात (बारावे व सतरावे शतक) वाराणसीचे बनारस हे फार्सी अपभ्रष्ट रूप प्रचारात आले. काही तज्ञांच्या मते हे वारणेचे प्राकृत रूप असावे.

रामायण, महाभारत, स्कंद, लिंग, मत्स्य, पद्म, अग्नि इ. पुराणे, बौद्ध जातके, बृहत्संहिता, मआसिर-आलम-इ-गीरी इ. ग्रंथांत, फाहियान, ह्यूएनत्संग, इत्सिंग इ. चिनी प्रवाशांचे तसेच पाश्चात्त्य प्रवाशांचे वृत्तांत इत्यादींतून वारासणीविषयी माहिती मिळते. बौद्धपूर्वकाळात गंगा-यमुना दुआबातील पाच जनपदांपैकी काशी (वाराणसी) एक असून बौद्ध अंगुत्तर निकायमते तत्कालीन भारतातील सोळा महाजनपदांमध्ये व सात प्रमुख देशांमध्ये तिची गणना होत होती. उज्ज्वल प्राचीन इतिहासाबरोबरच वाराणसीविषयी अनेक पौराणिक कथा व आख्यायिका आहेत. येथील राजांची कोसल, मगध व अंग देशांचे राजे ह्यांच्याबरोबर वारंवार युद्धे होत. अखेर कोसलच्या कंस राजाने वाराणसी जिंकून आपल्या राज्यात समाविष्ट केली. महाभारतानुसार काशीराज दिवोदास हा या नगरीचा संस्थापक असून त्याने इंद्राच्या आज्ञेवरून गंगेकाठी हे नगर वसविले. हरिवंशात ही कथा थोडी वेगळी आहे. तीत काशकुलोत्पन्न धन्वंतरी दिवोदास पणतूने भद्रश्रेण्य राजास ठार मारून तेथे नवीन वसाहत स्थापिली. काही अभ्यासकांच्या मते वाराणसीच्या आर्य वसाहतीकरणाचा आणि शिवोपासना स्वीकृतीचा रूपकात्मक निर्देश आख्यायिकांत मिळतो. आधुनिक अभ्यासक वाराणसीची स्थापना शिवपूजक अनार्यांनी केली असे मानतात. महाभारतकाळात हा प्रदेश जरासंधाच्या अंमलाखाली होता. भारतीय युद्धानंतर कुरू राजाने तो वत्स राज्यात समाविष्ट केला. बौद्धकालात हा प्रदेश मगध, कोसल, वत्स आणि उज्जयिनी या प्रमुख राज्यांपैकी एकामध्ये आलटूनपालटून समाविष्ट असे. पुढे शिशुनाग, मौर्य, शुंग आणि कण्व वंशांच्या सत्ताकाळात हा प्रदेश त्यांच्या-त्यांच्या साम्राज्यात होता. गौतम बुद्धाच्या धर्मचक्रप्रवर्तनामुळे या नगरीच्या उत्तरेकडील सारनाथाला माहात्म लाभले. शुंगांच्या कारकीर्दीत संस्कृत भाषा आणि यज्ञादी कर्मकांडांना महत्त्व प्राप्त होऊन वाराणसी हे त्यांचे प्रमुख केंद्र बनले. पुष्यमित्र शुंगाने बौद्ध मठांचा विध्वंस करून काशीचे माहात्म्य वाढविले. पुढे क्षत्रपांनी येथे राज्य केले. त्यानंतर कुशाण घराण्यातील कनिष्क या प्रदेशाचा अधिपती झाला. त्याने बौद्ध धर्माचा प्रचार-प्रसार केला. नाग वंशातील राजांनी बौद्ध धर्माचे वर्चस्व कमी करून दशाश्वमेध घाटावर अनेक यज्ञ केले. भारशिव नाग राजांनंतर वाराणसीचा गुप्त साम्राज्यात (इ. स. ३२१-५५५) समावेश झाला. स्कंदगुप्ताने हूणांचा पराजय करून या नगरीचे पावित्र्य अबाधित ठेवले. वाराणसीजवळील एका शिलालेखात त्याचा उल्लेख आढळतो. गुप्तांनंतर कनौजच्या हर्षवर्धनाने (कार. ६०६-४६) वाराणसीवर आधिपत्य मिळविले. हर्षोत्तरकाळात शंकराचार्य आणि कुमारिल भट्ट ह्यांनी येथे धर्मविजय केले. शंकराचार्य आणि मंडनमिश्र यांमधील प्रसिद्ध वादही याच ठिराणी झाला. अकराव्या शतकात कनौजच्या गाहडवालवंशीय राजांनी वाराणसी येथे उपराजधानी स्थापन केली. या वंशातील जयचंद राजाचा मुहम्मद घोरीने पराजय करून येथील मंदिरांची प्रचंड लूट केली. मुहम्मदाच्या जागी दिल्लीच्या तख्तावर आलेला कुत्बुद्दीन ऐबक (कार. १२०६-१०) आणि त्यानंतरचा अलाउद्दीन खल्जी यांनी येथील सु. १,००० मंदिरे नष्ट केली. पुढे जौनपुरच्या शर्की वंशाने १३९४ ते १४७७ पर्यंत यावर राज्य केले. पुढे मोगल बादशाह बाबराने हे जिंकून घेतले. तेव्हापासून शाहआलमच्या कारकीर्दीपर्यंत ते मोगल बादशाहांच्या आधिपत्याखाली राहिले. हुमायूनच्या (कार. १५३०-४० व १५५५-५६) वेळी कबीराने हिंदू आणि इस्लाम धर्मांच्या समन्वयवादाचे प्रतिपादन येथेच केले. अकबर बादशाहाच्या काळात (कार. १५५८-१६०५) गोस्वामी तुलसीदासाने रामचरितमानस हा सुविख्यात ग्रंथ येथेच लिहिला. उद्ध्वस्त विश्वेश्वर मंदिर अकबराच्या कारकीर्दीत १५८५ मध्ये नव्याने बांधण्यात अले, औरंगजेबाने (कार. १६५८-१७०७) ते जमीनदोस्त करून (१६६९) त्या जागी मशीद बांधली आणि हिंदूवर जझिया कर लादला. तेव्हा भक्तांनी तेथील शिवलिंग नजीकच्या ज्ञानवापीमध्ये हलविले. त्याकाळी मंदिराच्या जागेला विश्वेश्वर प्रतिमा मानून भक्तजन त्यास नमस्कार, पिंडदान व प्रदक्षिणा करीत असत. औरंगजेबाने वाराणसीचे नाव मुहंमदाबाद असे ठेवले होते.

**कोसल**

कोसल : भारतातील प्राचीन जनपद. इक्ष्वाकू, कोशल, अनुगंगा, शोकल, अयोध्या, श्रावस्ती, कुणालविषय इ. याची प्राचीन नामांतरे आहेत. अयोध्या नगराभोवतालचा शरयू तीरावरील सुसंपन्न ग्रामयुक्त व धनधान्यसमृद्ध देश असे याचे वर्णन वाल्मीकि रामायणात आढळते. ऋग्वेद व अथर्ववेद यांतून येथील इक्ष्वाकू व मांधातृ राजांचा उल्लेख आढळत असला, तरी रामायणकालीच या देशाचे महत्व वाढले. शरयू नदीमुळे कोसलचे उत्तर व दक्षिण असे दोन विभाग पडले होते. पुढे रामाने हे दोन भाग लव व कुश यांना वाटून दिले. लवाने उत्तर कोसलची राजधानी श्रावस्ती तेथे नेली, तर कुशाने दक्षिण कोसलची राजधानी कुशावती येथे हलविली. महाभारतकाली युधिष्ठिराच्या राजसूय यज्ञप्रसंगी भीमाने कोसलच्या दीर्घप्रज्ञ सम्राटास पराभूत केले होते. बौद्धकाली कोसलची राजधानी श्रावस्ती येथेच होती व काशी-कोसल साम्राज्यावर प्रसेनजित राजाचे राज्य होते. गौतम बुद्धाने श्रावस्ती येथे बराच काळ वास्तव्य केले होते. प्रसेनजितानंतर कोसलचे अनेक तुकडे पडले. नंतरच्या काळात हा 'अयोध्या-अवध' व 'साकेत' या नावांनी ओळखला जात असे.

**वत्स**

वंस (वत्स) : भारतातील एक प्राचीन जनपद. बौद्धकालीन उत्तर भारतातील प्रसिद्ध सोळा महाजनपदांपैकी (इ. स. पू. सहावे शतक) हे एक महत्त्वाचे मानले जात होते. याच्या नावाच्या व्युत्पत्तीविषयी अनेक मते प्रचलित आहेत. या भागात वंश लोकांची वस्ती होती, म्हणून याचे 'वंस' हे नाव रूढ झाले असे म्हटले जाते, तर काही तज्ञांच्या मते काशीचा राजा दिवोदास याचा नातू वत्स याने आपल्या राज्याचा विस्तार या प्रदेशात केल्याने त्याला 'वात्सभूमी' हे नाव पडले. बौद्ध वाङ्मयात याचा प्रामुख्याने 'वंस' अथवा 'वंसदेश' असा, तर रामायण,महायभारतादी ग्रंथांत याचा 'वत्स'अथवा 'वत्सदेश' असा उल्लेख आढळतो. वनवासकाळात राम वत्सदेशातून गेल्याचे, तर भीम व कर्ण यांनी हा देश जिंकून घेतल्याचे उल्लेख अनुक्रमे रामायण व महाभारतात (सभापर्वात व वनपर्वात) आहेत. जैन साहित्यात भगवती-सूत्रात यालाच 'वच्छ' असे संबोधिले आहे.

प्रयागच्या पश्चिमेस गंगा व यमुना नद्यांदरम्यान याचा विस्तार होता. उत्तरेस कोसल देश, दक्षिणेस चेदि, पश्चिमेस व वायव्येस अनुक्रमे शूरसेन व पंचाल तसेच पूर्वेस मगध, काशी या जनपदांनी वंसदेश वेढलेला होता.

कौशाम्बी (कोसाम) ही बंसची राजधानी होती. तलम सुती वस्त्रांच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध असलेला हा देश रत्ने व धनधान्यांनी समृद्ध होता, असा अंगुत्तरनिकायमध्ये उल्लेख आढळतो. बुद्धकाळात कुरुवंशीय उदयन (वत्सराज) हा या देशाचा राजा होता. बाजूच्या बलाढ्य राज्यांशी वैवाहिक संबंध जोडून त्याने त्यांपासून संरक्षण मिळविले होते. अवंती नरेश चण्ड प्रद्योत (चण्ड पज्ज्योत) याच्याशी संघर्ष होऊनही त्याने त्याच्या वासवदत्ता (वासुलदत्ता) मुलीशी लग्न केले. यांच्या प्रणयकथेवर अनेक संस्कृत नाटके लिहिली गेली आहेत. शूरसेन जनपदावर अवंतीचा प्रभाव होता, त्यामुळे पर्यायाने त्या जनपदापासूनही उदयन राजाला संरक्षण मिळाले होते. पुढे उदयनाने अंग व मगध देशांतील राजकन्यांशीही विवाह केल्याचा स्वप्नवासवदत्तामध्ये उल्लेख आहे. त्यामुळे वंसदेशाचे स्वातंत्र्य काही काळ अबाधित राहिले होते. अवंती तसेच दक्षिण पंचाल यांच्या काही भांगांचाही समावेश वंसदेशात करण्यातआला होता, असा उल्लेख कथासरित्सागर ह्या ग्रंथात मिळतो. पुढे वंसदेश मगध साम्राज्यात विलीन करण्यात आला.

**आवंती**

अवंती मध्य भारतातील प्राचीन देश. आधुनिक माळवा, निमाड व त्यालगतचा मध्य प्रदेशाचा भाग म्हणजे हा देश होय. 'आकरावंती', 'मालय' (मालव), 'अवंतिका', 'आकारवेणावंतिका' अशीही याची नामांतरे आढळतात. हा देश नर्मदा नदीच्या दोन्ही बाजूंस असून त्याच्या उत्तरेस राजपुताना व दक्षिणेस तापी नदी होती. उत्तरेकडील भागाची राजधानी उज्जयिनी, तर दक्षिणेकडील भागाची राजधानी माहिष्मती होती. इतिहासाच्या विभिन्न काळी अवंतीच्या सीमांमध्ये अनेक फेरफार झाले उदा., उत्तरेकडील भोपाळ प्रदेशाचा भाग फुटून त्याची राजधानी विदिशा झाली. हैहय कुलोत्पन्न राजे अवंतीमध्ये राज्य करीत. भारतीय युद्धात अवंती देशाची सेना कौरवपक्षात सामील असल्याचा उल्लेख मिळतो. गौतम बुद्धाच्या वेळी येथे उदयन राजा राज्य करीत होता. इ.स.पू. चौथ्या शतकात हा देश मगध साम्राज्याचा

भाग झाला. गुप्त सम्राट विक्रमादित्याने शकांची हकालपट्टी करून येथे नवीन साम्राज्य स्थापिले. नवव्या शतकातील परमार, त्यानंतरचे चाहमान व नंतरचे मुसलमान यांच्या कारकिर्दीत अवंतीचे वैभव कमी कमी होत गेले.

**पांचाल**

पांचाल. उत्तर भारतातील एक प्राचीन देश. याचे जुने नाव क्रिवी असल्याचा शतपथ ब्राह्मणात उल्लेख सापडतो. हिमालयाच्या पायथ्यापासून चंबळ नदीपर्यंतचा, दिल्लीच्या उत्तरेकडील व पश्चिमेकडील प्रदेश यात होता पुढे गंगेच्या उत्तरेचा तो उत्तर पंचाल आणि दक्षिणेचा तो दक्षिण पंचाल असे दोन भाग करून, त्यांच्या राजधान्या अनुक्रमे अहिच्छत्र व नंतर बुद्धकाली कनौज आणि कांपिल्य व नंतर माकंदी अशा करण्यात आल्या. भारतीय युद्धकाळात द्रुपद हा या देशाचा राजा होता. द्रोणाचार्यांनी अर्जुनाच्या मदतीने द्रुपदाचा पराभव करून उत्तर पंचाल आपल्या ताब्यात घेतला, असा महाभारतात उल्लेख सापडतो. पांडवपत्नी द्रौपदी (पांचाली) ही द्रुपद राजाचीच मुलगी. पंचालाच्या जोडीने कधीकधी कुरु-पांचाल या प्रदेशाचा उल्लेख येतो. या दोन प्रदेशांतील यज्ञसंस्था, भाषा, आचार इ. आदर्शवत् मानले जात. विद्यमान रोहिलखंडाचा पुष्कळसा भाग यात समाविष्ट होतो.

**शुरसेन**

शूरसेन : प्राचीन भारतातील सोळा महाजनपदांपैकी एक. हरिवंशपुराण, बृहत्संहिता इ. ग्रंथांमधील उल्लेखांनुसार उत्तर भारतातील विद्यमान मथुरा व त्याभोवतालचा प्रदेश म्हणजे शूरसेन किंवा सूरसेन होय. ग्रीक इतिहासकारांनी याचा उल्लेख सौरसेनोई असा केल्याचे आढळते. मथुरा (महुरा) ही त्याची राजधानी व महत्त्वाचे व्यापारकेंद्र होते. कौटिलीय अर्थशास्त्रात सुती वस्त्रांच्या व्यापाराचे केंद्र म्हणून याचा उल्लेख आढळतो. काशीहून पश्चिमी देशांना जाणाऱ्या व्यापारी मार्गावरील हे महत्त्वाचे केंद्र होते. मौर्यपूर्व काळापासून वेदविद्या, गुरुकुल पद्धती व सांस्कृतिक अभ्यास यांसाठी हे जनपद खूपच पुढारलेले असल्याचे उल्लेख शतपथ ब्राह्मण, छांदोग्य उपनिषद, बृहदारण्यक इ. ग्रंथांमध्ये मिळतात.

इ. स. पू. आठव्या ते सहाव्या शतकांत याच्या पश्चिमेस मत्स्य, ईशान्येस कुरु, पूर्वेस पांचाल व दक्षिणेस मगध, चेदी ही महाजनपदे होती. यमुना, चर्मण्वती या नद्या व त्यांच्या उपनद्यांनी हा प्रदेश सुपीक व समृद्ध बनला होता. पुराणांतील उल्लेखांनुसार श्रीकृष्णाच्या आजोबाचे (वसुदेवाच्या वडिलांचे) नाव शूर अथवा `शूरसेन' होते व तो या प्रदेशाचा राजा होता. त्यानेच या राज्याला शूरसेन हे नाव दिले असावे. महाभारत युद्धपूर्वकाळात हा प्रदेश यदुकुळाच्या ताब्यात होता. या भागातील लोकही `शूरसेन' या नावाने ओळखले जात. भारतीय युद्धानंतर नंद राजाच्या कारकीर्दीपर्यंत यावर सु. तेवीस शूरसेनांची सत्ता होऊन गेल्याचे उल्लेख पुराणांत मिळतात. या प्रदेशातील प्राकृत भाषा `शौरसेनी' नावाने प्रसिद्ध आहे.

**चेदी**

चेदि: मध्य प्रदेशातील बुंदेलखंडाचा पूर्व भाग व त्याच्या आसपासच्या प्रदेशाचे प्राचीन नाव. ऋग्वेद, महाभारत, बौद्ध साहित्य इत्यादिकांत याचा उल्लेख आढळतो. श्रीकृष्णाचा आतेभाऊ शिशुपाल हा चेदी देशाचाच राजा होता. अयोध्येच्या सगर राजाच्या मृत्यूनंतर विदर्भातील राजे प्रबळ होऊन त्यांनी उत्तरेकडे राज्यविस्तार करावयास सुरुवात केली. त्या वंशातील चेदी राजाने यमुनेच्या दक्षिण तीरावर राज्य स्थापले म्हणून यास चेदी नाव मिळाले. सोळा महाजनपदांपैकी एक म्हणून याचा उल्लेख बौद्ध साहित्यात आढळतो. बौद्ध साहित्यात वत्स, काशी आणि चेदी ही एकमेकांच्या शेजारील राष्ट्रे होती, असा उल्लेख असून चेदी प्रदेश वत्सांच्या दक्षिणेस व काशीच्या नैर्ऋत्येस होता. मध्ययुगात नर्मदा नदीकाठापर्यंत चेदी राज्य पसरलेले असून मेखलीसुत म्हणून ते ओळखले जाई. याचा विस्तार यमुनेच्या दक्षिणेस, नर्मदेच्या उत्तरेस आणि शोण नदीच्या पश्चिमेस चंदेरी किल्ल्यांपर्यंत होता. हेमकोशात त्रिपुरीलाच चेदीनगरी म्हटले असून तिचे स्थान नर्मदा नदीजवळच जबलपूरपाशी असलेल्या चेदीनगरीपाशी दाखविले जाते. काहींच्या मते चेदी इंद्रप्रस्थाच्या (दिल्लीच्या) आग्नेयीस असून त्याची राजधानी शुक्तिमती होती.

**आश्मक**

अश्मक : (१) पाकिस्तानच्या वायव्य सरहद्द प्रातांतील गौरी (आधुनिक पंजखोर) व सूवास्तू (आधुनिक स्वात) नद्यांच्या खोऱ्यातील एक प्राचीन देश. याच्या उत्तरेस स्वात, पश्चिमेस पंजखोर व दक्षिणेस काबूल नदी होती. या देशाची अश्वक, आश्वकायन, अस्सकेनोस, अस्सकेनोई व अस्सक अशी नामांतरे असून अश्मक म्हणजे दगडांच्या किंवा अश्वक म्हणजे घोड्यांचा देश अशी त्याची नामव्युत्पत्ती सांगतात. या देशावर सिंकदरने स्वारी केली होती. नऊ दिवसांच्या सतत वेढ्यानंतर मस्सग गाव त्याने जिंकून घेतले. या देशाची राजधानी मस्सग अर्थात मशकावती (आधुनिक मत्थनै) येथे होती.

(२) भारतातील मध्यदेशांतर्गत एक प्राचीन देश. भारतीय युद्धात कौरवपक्षात अश्मक राजा सामील असल्याचा उल्लेख आढळतो. पाणिनीच्या "आवन्त्याश्मकः" अशा निर्देशावरून पूर्वी हा देश अवंतीसमीप असावा असे दिसते. कालांतराने मात्र खानदेशापासून गोदावरी नदीपर्यंतचे आधुनिक नासिक, अहमदनगर जिल्हे, तसेच खानदेश, वऱ्हाड आणि मराठवाड्याचा काही भाग मिळून झालेल्या देशास 'अश्मक' नाव प्राप्त झाले. गौतमी बलश्रीच्या नासिक-शिलालेखात याला 'असक' तर बौद्ध वाङ्मयात याला 'अस्सक' म्हटले आहे. सातवाहन व त्यानंतर वाकाटकांचे येथे आधिपत्य होते. पैठण ही त्याची राजधानी होती. अजिंठा- -गुंफालेखात अश्मकराजांचा उल्लेख मिळतो.

**मत्स**

हे जनपद हे आजच्या भरतपुर आणि अलवार जिल्ह्यात स्थापन करण्यात आलेले जनपद होते. या जनपदाची राजधानी विराटनगर होती. महाभारतानुसार या ठिकाणी शहाज नावाच्या राजाने मत्स आणि चेदी राज्यावर एकाच वेळी राज्य केले असे उल्लेख मिळतात.

**वज्जी**

प्राचीन भारतातील एक प्रसिद्ध नगर व गणराज्य. ते सध्याच्या बिहार राज्यात, हाजीपूरच्या उत्तरेस सु. २९किमी. वर गंडक नदीच्या डाव्या तीरावर वैशाली जिल्ह्यात आहे. बसाढ म्हणजेच प्राचीन वैशाली असे मानतात. रामायण, मनुसंहिता, पुराणे आणि चिनी प्रवाशांचे वृतांत यांतून वैशालीचा उल्लेख आढळतो. मात्र सलग, साधार इतिहास बुद्धकाळापासून उपलब्ध होतो. रामायणातील (बालखंड ४७/२२—२४) उल्लेखानुसार इक्ष्वाकु कुळातील एका राजाला अलंबुषा नावाच्या अप्सरेपासून झालेला मुलगा विशाल. त्याने ही नगरी वसविली म्हणून तिचे नाव वैशाली पडले. विद्यमान बसाढनजीक प्राचीन वास्तूंचे काही अवशेष आढळतात. राम मिथिलेला सीतास्वयंवरासाठी जाताना वाटेत वैशाली नगरी लागली होती. असा उल्लेख मिळतो. बुद्धपूर्व काळात वैशालीवर लिच्छवी राजवंशाची सत्ता होती. वैशाली ही लिच्छवी गणराज्याची राजधानी, तसेच वृज्जी (वज्जी) संघाचे मुख्य स्थान होती. या संघाचे तत्कालीन मगध राज्याशी (इ. स. पू. सहावे शतक) शत्रुत्त्व होते. वैशालीच्या सैन्याने मगधावर आक्रमण केले, पण मगधाधिपती बिंबिसार याने त्याचा पराभव केला आणि तेथील राजाच्या चेल्लना नामक लिच्छवी राजकन्येशी विविध केला. तिची बहीण त्रिशला ही वर्धमान माहावीराची माता होय. बौद्ध जातकांतून लिच्छवीचा उल्लेख गणाधिपती म्हणून केलेला असून ईशान्य भारतातील एक वैभवशाली गणराज्य म्हणून वैशालीचा उल्लेख आहे. अकथांतून वैशालीच्या गणराज्याची घटना (संविधान) दिलेली असून राजा, उपराजा आणि सेनापती या तीन अधिकाऱ्यांच्या तीत उल्लेख आहे. या प्राचीन नगरात एक भव्य सभागृह होते. त्यात नागरिकांच्या सभा होत. जातकातील उल्लेखांवरून वैशाली गणराज्याचे सु. ७,७०७ मूळ सदस्य होते आणि वैशालीची लोकसंख्या सु. १,६८,००० (महावस्तू व त्रिशंकुनीय जातक) होती. गौतम बुद्ध व भगवान महावीर यांना वैशालीविषयी आत्यंतिक जिव्हाळा होता. बुद्धाने ते आदर्श राज्य मानले होते. त्याने काही धर्मप्रवचने वैशालीत केली होती. वैशालीची नगरवधू आम्रपाली बुद्धदर्शनाने प्रभावित होऊन भिक्षुणी बनली, असा उल्लेख मिळतो. महावीराचा जन्म वैशालीच्या कुंडग्राम या उपनगरात झाला. भवानी सूत्रावरील अभयदेवसूरी लिखित टीकेत महावीराला

वैशालिक व त्रिशलेला विशाला म्हटले आहे. वर्धमान महावीराचे बालपण तसेच दिनदीक्षेनंतरची बारा वर्षे येथेच व्यतीत झाली. या महत्त्वाच्या घटनांमुळे जैनधर्मीय वैशालीला तीर्थक्षेत्र मानीत.

मौर्यकाळात गणराज्ये मानशेष झाली. तेंव्हा लिच्छवी राजवंश वैशालीत पुन्हा कार्यरत झाला. गुप्तकाळाच्या अखेरीपर्यंत वैशाली लिच्छवींच्या आधिपत्याखाली होते. पहिल्या चंद्रगुप्ताने लिच्छवी राजकन्या कुमारदेवी हिच्याशी विवाह करून लिच्छवी राजवंशाशी संबंध दृढतर केले. पुढे लिच्छवी राजवंशाने नेपाळमध्ये सत्ता हस्तगत केली आणि वैशाली नगर उजाड झाले.

चिनी प्रवासी फाहियान आणि ह्यूएनत्संग यांच्या प्रवासवृत्तांतांत वैशालीविषयी माहिती मिळते. ह्यूएनत्संगाच्या मते गौतम बुद्धाच्या महापरिनिर्वाणानंतर सु. ११० वर्षांनी येथे दुसरी बौद्ध धर्मपरिषद (संगीती) भरली होती. लिच्छवी गणांनीही येथे एक स्तूप बांधल्याचे ह्यूएनत्संग सांगतो. याशिवाय आनंद व सारिपुत्र मोग्गलायन यांच्या स्मरणार्थही स्तूप बांधले होते व एक स्तंभ उभारला होता. त्यावर सिंहमूर्ती होती. तो लेखरहित अशोकस्तंभ असावा, असे तज्ञांचे मत आहे.

बसाढ (वैशाली) येथील दोन प्रमुख टेकडांत काही उत्खनने झाली असून त्यांत प्रामुख्याने काळी-तांबडी मृतपात्रे आढळली. ह्यांवरून बुद्धपूर्व काळात येथे वस्ती असावी. वरच्या थरात सापडलेली चकचकीत काळी मृत्पात्रे बुद्धकालीन आहेत. बाल्श या संशोधकास या अवशेषांत एक गणेशमूर्ती मिळाली. मात्र अद्यापि या ठिकाणी विस्तृत उत्खनन झालेले नाही.

**मल्ल**

या जनपदाला मल्ल किंवा मालवअसे म्हटले जाते (१) मध्यभारताच्या पश्चिम भागातील एक प्राचीन देश. विद्यमान माळवा प्रदेशाचे प्राचीन नाव. अनेक प्राचीन ग्रंथांतून व पौराणिक कथांतून या देशाविषयीचे उल्लेख आढळतात. इ. स. सातव्या किंवा आठव्या शतकापूर्वी हा प्रदेश  अवंती या नावाने ओळखले जात होता व त्याची राजधानी अवंती (उज्जैन) होती, असे बौद्ध वाङ्मयावरून दिसून येते. भोजराजाच्या काळात (कार. १०००—१०५५) याची राजधानी ‘धारानगरी ’ होती. जुनागढ येथील रूद्रदामनच्या शिलालेखावरून व गौतमीपुत्र सातकर्णीच्या नासिक येथील प्रशस्तीवरून या प्रदेशाला ‘आकरावंती’ असेही नाव असल्याचे दिसून येते. इतर काही संदर्भात गोदावरी नदीच्या उत्तरेस पसरलेल्या या प्रदेशाचे दोन भाग असल्याचे उल्लेख आढळतात. त्यांतील पूर्व मालव हा प्रदेश ‘आकरा’ किंवा ‘दशार्ण’ या नावाने ओळखला जात होता व त्याची राजधानी विदिशा होती. कामसूत्रांतील उल्लेखावरून अवंती व मालव हे दोन्ही प्रदेश वेगवेगळे असून या प्रदेशाचा पूर्वेकडील भाग म्हणजे मालव व पश्चिमेकडील भाग म्हणजे अवंती म्हणजेच उज्जैनचा प्रदेश होय. बाणाच्या कादंबरीमध्येही यास दुजोरा मिळतो.

(२) ग्रीक इतिहासकारांच्या आणि भारतीय पुराणवस्तूसंशोधन खात्याचा संचालक व पुरातत्त्वज्ञ कनिंगहॅम याच्या मतांनुसार सध्याचा मुलतानचा (पाकिस्तान) प्रदेश म्हणजेच मालव अथवा  मल्ल देश होय. या प्रदेशातील लोकांना मालव, अथवा मल्ल किंवा मल्ली नावे रूढ असून त्यांच्या नावावरूनच प्रदेशास हे नाव प्राप्त झाले असावे.

**गांधार**

या देशात पेशावर आणि रावळपिंडी जिल्ह्यांचा अंतर्भाव होत असे. याची राजधानी तक्षशिला व्यापार आणि विद्या यांबद्दल सुप्रसिद्ध होती. खिस्तपूर्व सहाव्या शतकाच्या मध्यास येखे पुष्करसारिन् नामक राजा राज्य करीत होता. त्याचे मगधराजा बिंबिसार याच्याशी सख्य पण अवंतिराजा प्रद्योत याच्याशी शत्रुत्व होते. त्याने प्रद्योताचा पराभव केला होता.

**कंबोज**

कंबोज : यात वायव्य प्रांतातील हजारा जिल्ह्याचा समावेश होत होता. याचे नाव गंधार देशाशी संलग्न झालेले आढळते. याची मर्यादा काफिरीस्तानपर्यंत होती. उत्तर वैदिक काळात हे वेदविद्येचे केंद्र होते पण पुढे निरुक्तकार यास्काच्या कलात येथे आर्येतरांचे प्रबल्य झालेले दिसते. त्यांची भाषा आर्याच्या भाषेहून भिन्न झाली होती. मौर्यकाळात येथे संघराज्य स्थापन झाले होते.

**मौर्यकालीन राज्य**

मौर्यकाल: इ. स. पू. चौथ्या शतकाच्या अखेरीस भारतातील प्राचीन मगध देशात मौर्य वंश उद्यास आला. या वंशातील राजांनी इ. स. पू. ३२१ ते १८५ दरम्यान भारतखंडाच्या बहुतेक भागावर राज्य केले आणि प्रथमच एकछत्री अंमल प्रस्थापित केला. या काळाला मौर्यकाल ही सर्वसाधारण संज्ञा देतात. या काळात जमात राज्ये किंवा महाजनपदे आणि लहान लहान राज्ये यांच्या जागी एक मोठे साम्राज्य उत्पन्न झाले. यापूर्वीचे नंद घराण्याचे राज्य फक्त उत्तर भारतापुरते, त्यातल्या त्यात गंगा-यमुनांच्या दुवेदीत व त्याच्या आसपासच्या प्रदेशापुरते मर्यादीत होते. त्याचा विस्तार करून ते बव्हंशी भारतभर पसरविण्याचे काम मौर्य वंशातील राजांनी विशेषतः चंद्रगुप्ताने केले. पुढे या साम्राज्याला आणि शासनयंत्रणेला काही उच्च जीवन मूल्ये व नैतिक अधिष्ठान त्याच्या नातवाने—सम्राट अशोक—याने दिले. यामुळे मौर्य साम्राज्याला एकूण भारतीय जीवनात एक विशिष्ट स्थान प्राप्त झाले आहे.

ऐतिहासिक साधने : मौर्यकालासंबंधीची माहीती मुख्यत्वे तत्कालीन वाङ्मय, परकीय प्रवाशांचे वृत्तांत, पुरातत्त्वीय अवशेष—विशेषतः शिला व प्रस्तर लेख यांवरून मिळते. पुराणांत अनेक राजे, राजवंश आणि त्यांचे पराक्रम यांचे उल्लेख व वर्णने जागोजाग पाहावयास मिळतात परंतु ही वर्णने बहुतेक ठिकाणी अतिशयोक्तीपूर्ण, संदिग्ध आणि बऱ्याच वेळा विसंगतच नव्हे, तर परस्परविरोधी आहेत. त्यामुळे त्यांचा अन्वयार्थ लावणे जिकीरीचे होते.

तथापि मौर्यांच्याविषयी माहीती देणारी शिलालेखांसारखी साधने विश्वसनीयतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहेत. सम्राट अशोकाने कोरविलेल्या या कोरीव लेखांपैकी अनेक लेख उपलब्ध झाले असून त्यांचे वाचनही झाले आहे. आजपर्यंत दृष्टोत्पत्तीस आलेले बहुतेक लेख प्राकृतातील आहेत. काही ब्राह्मी लिपीत तर काही खरोष्ठी वॲरेमाइक लिपीतही आहेत. या शिलालेखांचे अभ्यासकांनी प्रस्तर लेख, प्रशस्ती लेख व लघुलेख असे तीन स्वतंत्र भाग पाडलेले आहेत. हे लेख काहीसे उपदेशपर असून अशोकप्रणीत सदाचरणाच्या मार्गाचे दर्शन त्यातून घडते. त्यांत राजाज्ञा, उपदेशपर धर्माज्ञा, चोल, चेर, पांड्य अशा काही राज्यांचे तसेच सुधारणांचा उल्लेख आहे. या अनुषंगाने काही शासनविषयक गोष्टींचा तसेच राजकीय स्थितीचा उल्लेख त्यातून मिळतो. अशोकाचा नातू दशरथ याने बिहारमधील नागार्जुन टेकड्यातील गुंफा-समूहांत कोरविलेला लेख म्हणजे एक दानपत्रच असून त्यात आजीवक पंथीयांच्या निवासासाठी या गुंफा खोदविल्याचा स्पष्ट उल्लेख आहे.

लिखित साधनांत मीगॅस्थिनीझचे इंडिका आणि कौटिलीय अर्थशास्त्र यांना असाधारण महत्त्व आहे. चंद्रगुप्ताच्या दरबारी सील्यूकस निकेटर या ग्रीक राजाने मीगॅस्थिनीझ नावाचा वकील पाठविला होता. त्याने इंडिका नावाचा ग्रंथ लिहिला होता. तो आता नष्ट झाला आहे पण नंतरच्या ग्रीक लेखकांनी या ग्रंथातील काही भाग आपल्या ग्रंथात उद्‌धृत केला आहे. विशेषतः स्ट्रेबो याने ख्रिस्ती शकाच्या आरंभाच्या सुमारास लिहिलेल्या भूगोलविषयक ग्रंथात त्याने मीगॅस्थिनीझच्या इंडिकामधील चंद्रगुप्त, पाटलिपुत्र, मौर्य साम्राज्य अशा विषयांवरील माहिती उद्‌धृत केलेली आहे. ही माहिती बहुतेक ठिकाणी तपशीलवार आणि सूक्ष्म आहे. स्वाभाविकच ती ग्राह्य मानण्याकडे अभ्यसकांचा कल असतो. त्या माहितीत सत्यांश किती आहे, हे तत्कालीन इतर पुराव्यांच्या आधारे पडताळून पाहणे इष्ट ठरते. याशिवाय प्लूटार्क आणि जस्टिन यांच्या लिखाणातूनही काही माहिती मिळते, ती बरीचशी अप्रत्यक्षरीत्या मिळते.

चंद्रगुप्ताचा गुरू चाणक्य म्हणजेच अर्थशास्त्र या राजनीतिशास्त्रावरील ग्रंथाचा लेखक कौटिल्य असे अनेक अभ्यासकांचे मत आहे. अर्थशास्त्रात राज्य या संस्थेची उत्पत्ती, तिचा विकास, सत्ता व अधिकार यांचे तात्त्विक स्वरूप, नागरिक या कल्पनेचे स्पष्टीकरण अशा विविध स्वरूपाचे तात्त्विक आणि सैद्धांतिक विवेचन आढळते. त्यामुळे

स्वाभाविकपणेच अर्थशास्त्रामध्ये मौर्यांच्या शासनव्यवस्थेचे प्रतिबिंब उमटलेले आहे असे समजण्यात येते. मीगॅस्थिनीझची वर्णने आणि कौटिलीय अर्थशास्त्रातील वर्णने यांमध्ये पुष्कळ वेळा आश्चर्यकारक साम्य आढळते.

चंद्रगुप्त मौर्याने आपल्या आयुष्याच्या उत्तरकालामध्ये जैन मताचा स्वीकार केला व तो राजसंन्यास घेऊन कर्नाटकमध्ये निघून गेला, अशी आख्यायिका आहे. स्वभाविकच जैन वाङ्‌मयात त्याच्या चरित्राचे काही दिसतात. बौद्धांच्या दिव्यावदान, महावंस, महापरिनिर्वाण सूत्र या ग्रंथांतून मुख्यतः चंद्रगुप्त आणि अशोक यांच्याविषयी माहिती मिळते. विष्णुपुराण, वायुपुराण, युगपुराण, गार्गी संहिता, हर्षचरित अशा काही ग्रंथात प्रसंगोपात्त त्यांचे उल्लेख येतात. विशाखदत्ताच्या मुद्राराक्षस या नाटकाचा उल्लेख उत्तरकालीन साधनग्रंथांत प्रामुख्याने करण्यात येतो. चंद्रगुप्तानंतर सहा—सात शतकांनी हे नाटक लिहिलेले आहे.या नाटकामध्ये नंद राजाचे उच्चाटन करण्याचे व मौर्याचे राज्य स्थापन करण्याचे श्रेय चंद्रगुप्तापेक्षा चाणक्यालाच अधिक दिलेले दिसते. परंपरेचे पालन त्यातून स्पष्ट होते.

मौर्यकालीन कलाशिल्पांचे अनेक अवशेष अद्यापि अवशिष्ट आहेत. त्यांवरून तत्कालीन धार्मिक समजुती व कलापरंपरा यांचा बोध होतो पण त्याबरोबरच मौर्यकालीन संस्कृतीवर इराणी परंपरेचा किती प्रभाव पडला होता, हेही प्रतीत होते.

राजकीय इतिहास :

मौर्य हे कुलनाम जैन, बौद्ध, हिंदू अशा सर्व धार्मिक वाङ्‌मयाला ज्ञात आहे. जस्टिनसाखे परकीय लेखकही या वंशाला याच नावाने ओळखत. मात्र हे कुल कोठले व मौर्य हे नाव त्याला कसे प्राप्त झाले, यांविषयी अनेक मतमतांतरे व प्रवाद प्रचलित आहेत. जस्टिनसारख्या काही लेखकांच्या पुस्तकात चंद्रगुप्त हा हीन कुलात जन्मला, असे एक मोघम विधान आढळते. जैन ग्रंथात चंद्रगुप्ताचा जन्म मोर पाळणाऱ्या जमातीत झाला, म्हणून त्याला मौर्य नाव पडले असे म्हटले आहे. मौर्यकाळानंतरच्या पाचसहा शतकांनी लिहिलेल्या संस्कृत ग्रंथात व नाटकात शेवटचा नंद सम्राट धनानंदाचा चंद्रगुप्त हा दासीपुत्र असून त्या दासीचे नाव मुरा होते.म्हणून या घराण्याचे नाव मौर्य पडले असे म्हटले आहे. मुरा ही धनानंदाची राणी होती व तिला एका नापित प्रियकरापासून चंद्रगुप्त हा मुलगा झाला, असाही प्रवाद आहे. बौद्ध वाङ्‌मयात चंद्रगुप्त व बिंदुसार हे क्षात्रकुलोत्पन्नच आहेत, असे उल्लेख येतात. उत्तर प्रदेशाच्या पिप्पलिवन या भागात मोरिय नावाची एक क्षत्रिय जमात राज्य करीत होती. या मोरिय जमातीत चंद्रगुप्ताचा जन्म झाला, म्हणून त्याच्या घराण्याला मौर्य म्हणू लागले असावेत. चंद्रगुप्ताच्या व्यक्तिमत्त्वाने चाणक्य प्रभावित झाला आणि त्याने चंद्रगुप्तास सर्व विद्यांत पारंगत करून नंदांच्या उच्छेदास सिद्ध केले, अशी सर्वसाधारण ऐतिहासिक धारणा आहे. अलेक्झांडरच्या भारतातील स्वारीनंतर दोनतीन वर्षांच्या कालावधीतच चंद्रगुप्ताचा उदय होऊन त्याने मगध राज्याचा ताबा मिळविला. अलेक्झांडरच्या स्वारीचा काळ इ. स. पू. ३२४—२१ असा मानला, तर चंद्रगुप्ताचा राज्यारोहण काल इ. स. पू. ३२४—२१ असा समजता येतो. त्यानंतर या वंशात सात राजे झाले. शेवटचा राजा बृहद्रथ याला मारून त्याचा सेनापती पुष्यमित्र शुंग याने गादी बळकावली. हा प्रसंग इ. स. पू. १८५—८४ च्या सुमारास घडला. म्हणजे आठ मौर्य राजांची मिळून एक राजवट १३७ वर्षांची होती. त्यांची नावे पुढीलप्रमाणे:

यांपैकी चंद्रगुप्ताचा राज्यकाल पुराणांनी दिला आहे. बिंदुसाराचा राज्यकाल पुरणांच्या मताने पंचवीस वर्षांचा, तर बौद्ध वाङ्‌ययानेअठ्ठावीस वर्षांचा सांगितला आहे. अशोकाच्या कारकीर्दीतबाबत सर्व मौर्य राजवंशाचा कालक्रम निश्चित करण्यासाठी उपयुक्त पडणारी सर्व साधने अप्रत्यक्ष आहेत तसेच ती परस्परविरोधी आहेत. बौद्ध परंपरेप्रमाणे अशोकाने राज्यारोहण केले, त्यावेळी गौतमाच्या निर्वाणास २१८ वर्षे झाली होती. निर्वाण केव्हा झाले, याविषयी एक सिंहली व दुसरी चिनी अशा दोन परंपरा आहेत. सिंहली परंपरेप्रमाणे हा काळ इ. स. पू. ५३७ असा येतो, तर चिनी परंपरेप्रमाणे इ. स. पू. ४८७ येतो. चिनी परंपरा अधिक विश्वसनीय मानण्याकडे विद्वानांचा कल आहे. याशिवाय समकालीन ग्रीक राज्यांचे उल्लेख, विशेषतः अलेक्झांडरची स्वारी व तदनुषंगिक माहिती किरीनचा राजा मगस,

सिरियीचा थिऑस हे अशोकाचे समकालीन शेवटी बृहद्रथाच्या वेळी ग्रीकांनी केलेली स्वारी व तिचा पतंजलीच्या महाभाष्यात येणारा वर्तमानकाळी उल्लेख यांचा कालनिश्चितीस उपयोग होतो.

चंद्रगुप्त (इ. स. पू.. ३२४—३००) हा मौर्य वंशाचा संस्थापक असून सुरुवातीस त्याने तक्षशिलेच्या बाजूला शस्त्रोपजिवी लोकांचे सैन्य उभारून धनानंदाचा पाडाव केला. पुढे गादीवर येताच त्याने सील्यूकस निकेटरच्या आक्रमणास पायबंद घालून त्याचा पराभव केला. व भारतातील ग्रीक सत्ता संपुष्टात आणली आणि पंजाब, सिंध हे भूप्रदेश आपल्या राज्यात समाविष्ट केले. त्याने जवळजवळ अखिल भारत आपल्या एकछत्री अंमलाखाली आणला. सील्यूकसने मीगॅस्थिनीझ यास आपला वकील म्हणून चंद्रगुप्ताच्या दरबारात ठेवले. सील्यूकसच्या लढाईनंतर चंद्रगुप्ताने फारशी आक्रमणे केलेली दिसत नाहीत. आयुष्याच्या उत्तरकाळात जैनमताचा स्वीकार करून त्याने राजसंन्यास घेतला आणि उर्वरीत आयुष्य दक्षिणेत कर्नाटकात व्यतीत केले, अशी कथा प्रसृत आहे. चंद्रगुप्तानंतर त्याचा मुलगा बिंदुसार (इ. स. पू. कार. ३००—२७३) गादीवर आला. त्याला अमित्रघात व सिंहसेन अशीही नावे होती. त्याच्या कारकिर्दीविषयी विशेष माहीती ज्ञात नाही. त्याने पित्याचेच राज्य राखले आणि तक्षशिला प्रांताचे बंड मोडण्यासाठी राजपुत्र अशोक याची नियुक्ती केली.

अशोक (इ. स. पू. २७३—२३६) हा या वंशातील सर्वश्रेष्ठ राजा. राज्यारोहणानंतर त्याने कलिंग प्रदेश जिंकला आणि पुढे युद्धसंन्यास घेऊन बौद्ध धर्माचा स्वीकार व प्रसार केला. अशोकाने धर्मप्रसारार्थ खास अधिकारी नेमले आणि कोरीव लेखांद्वारे धर्माज्ञा कोरविल्या. त्याच्या प्रदीर्घ कारकीर्दीत अनेक कल्याणकारी सुधारणा करण्यात आल्या. त्याचा अंमल दक्षिणेतील काही राज्ये वगळता सर्व भारतावर होता.

यानंतरच्या एकही राजाचे चरित्र ज्ञात नाही. बृहद्रथ हा अशोकाचा नातू/पणतू. त्याचा वध त्याचाच सेनापती पुष्यमित्र शुंग याने केला. यावरून त्यावेळी राजकुल दुर्बल झाले होते हेच स्पष्ट होते.

**साम्राज्य विस्तार :**

नंदांच्या वेळी मगधचे राज्य मुख्यत्वे गंगा-यमुनांच्या खोऱ्यात बिहार व उत्तर प्रदेश असे मर्यादित होते. कालांतराने त्याचा पश्चिमेकडे विस्तार झाला. चंद्रगुप्ताने नंदांचा उच्छेद केल्यावर अफगाणिस्तान, सिंध वगैरे पश्चिमेकडील प्रदेश आपल्या अंमलाखाली आणले. बिंदुसाराने ते फक्त जोपासले. मौर्य साम्राज्याचा सर्वांत अधिक विस्तार अशोकाचा कारकीर्दीत झाला. त्याने कलिंगवर स्वारी करून ते जिंकले. या साम्राज्याच्या सीमा अशोकाच्या कोरीव लेखांद्वारे निश्चित होतात. ज्या ज्या ठिकाणी अशोकाने आपले लेख कोरविले, ती स्थळे त्याच्या साम्राज्यात व आधिपत्याखाली असणार हे उघडच आहे. उत्तर भारतात, गंगा-यमुनांच्या खोऱ्यात, वायव्येला अफगाणिस्तानात जलालाबाद, कंदाहार आणि पाकिस्तानच्या पेशावर व हजारा जिल्ह्यातील शहबाझगढी, तक्षशिला व मानसेहरा येथेही हे लेख मिळाले आहेत. पश्चिमेला सौराष्ट्रात गिरनारच्या पायथ्याशी व ठाणे जिल्ह्यात सोपारा येथे दक्षिणेला चितळदुर्ग आणि कोप्पळ जिल्ह्यात, आंध्र प्रदेशात कुर्नूल जिल्ह्यात आणि पूर्वेकडे ओरिसाच्या पुरी व गंजाम जिल्ह्यांत अशोकाचे लेख मिळालेले आहेत. थोडक्यात वायव्येकडील अफगाणिस्तानापासून पूर्व-पश्चिम आसिंधुसिंधू आणि दक्षिणेला कृष्णा-तुंगभद्रा नद्यांपर्यंत मौर्य साम्राज्य विस्तारलेले होते. या लेखांमध्ये अशोकाने आपले सीमावर्ती लोक व देश यांचा उल्लेख केला असून वायव्येला यवन राजा अंतियक (अँटायओकस) आणि दक्षिणेकडील चोल, पांड्य व केरलपुत्र (चेर) यांचा सीमावर्ती म्हणून निर्देश केलेला आहे.

**शासनव्यवस्था :**

मीगॅस्थिनीझचे लेखन, अशोकाचे लेख आणि काही प्रमाणात कौटिलीय अर्थशास्त्र यांतून मौर्य शासनाची माहिती मिळते. राजा किंवा सम्राट हा शासन यंत्रणेच्या अग्रभागी होता. तो वंशपरंपरेच्या अधिकाराने या पदावर येत असल्याने त्याची सत्ता तत्त्वतः तरी अनियंत्रित होती. नवीन कायदेकानू करणे, त्यांची अंमलबजावणी करणे आणि

न्यायदान या सगळ्यांचे अधिकार राजाकडे होते. चंदगुप्तासंबंधी मीगॅस्थिनीझ सांगतो, की 'सम्राट हा सतत राज्यव्यवहारात मग्न असतो, मालीश वा स्नान करीत असतानाही तो आपल्या दूतांनी आणलेली माहिती ऐकतो, विश्रांती घेताना क्वचितच सापडतो.' या कामात त्याला सहाय्य करण्यासाठी मंत्रिपरिषद असे. परिषदेतील मंत्री राजानेच नेमलेले असत आणि त्याला नकोसे वाटल्यास त्यांना काढून टाकण्यात येई. हे मंत्री राज्यव्यवहाराचा उत्तम अनुभव गाठीशी असलेले, राजाच्या विश्वासातले असून त्यांच्याकडे एकेका स्वतंत्र खात्याचा कारभार सोपविलेला असे. मीगॅस्थिनीझ मंत्रिपरिषदेच्या सर्वसाधारण कार्यव्यापाचीही कल्पना देतो. प्रादेशिक, प्रांतांचे प्रमुख अधिकारी, उपशासनाधिकारी, राज्याचे कोषाध्यक्ष , सेनापती, दंडाधिकारी, न्यायाधीश, शेतकीसारख्या खात्यांचे प्रमुख असे (सगळे महत्त्वाचे) अधिकारी यांची नियुक्ती मंत्रिपरिषद करीत असे. राजा व मंत्रिपरिषद यांच्यामध्ये उपराज व अग्रामात्य अशी दोन पदे काही वेळा दिसतात. अशोकाने आपला भाऊ वा मुलगा तिस्स यालाच उपराज नेमले होते.

साम्राज्याचे जे प्रांत होते त्या प्रांतांच्या प्रमुखपदी राजप्रतिनिधी किंवा प्रांताधिप नेमलेले असत. अशोकाने तक्षशिला, उज्जैन, तोषाली व सुवर्णगिरी या प्रांतांवर राजपुत्रांची राजप्रतिनिधी म्हणून नेमणूक केली होती. त्यांपैकी तक्षशिलेचा 'कुणाल' याचे नाव ज्ञात आहे. प्रादेशिक, राष्ट्रिक राजूक, यूत, महामात्र अशी अनेक पदे साधारण प्रांताधिकाऱ्यांच्या दर्जाची असावीत. त्यांच्या दर्जात व कार्यक्षेत्रात नेमका काय फरक होता हे समजत नाही. ज्यांची कार्यव्याप्ती निश्चितपणे समजते असे दोनच अधिकारी ज्ञात आहेत, ते म्हणजे अशोकाने नेमलेले धर्म-महामात्र व स्त्री-अध्यक्ष-महामात्र. धर्म-महामात्रांचे काम बौद्ध धर्माचा प्रचार करणे असे नव्हते, तर प्रत्येक धर्मपंथांचे आचारविचार निर्वेधपणे चालावेत हे होते. यासाठी प्रत्येक पंथाला महामात्र नेमला होता. प्रांताच्या मुख्य शासकाला सल्ला देण्यासाठी, कारभारात साहाय्य करण्यासाठी मंत्रिपरिषदेसारखीच इतर मंडळे असत. दर तीन किंवा पाच वर्षांनी, महत्त्वाच्या सर्व अधिकाऱ्यांनी आपापल्या क्षेत्रात तपासणीसाठी दौरे काढावेत, अशी पद्धत अशोकाने सुरू केली. परराष्ट्रांशी, म्हणजे राजांशी, संपर्क ठेवण्यासाठी जे वकील नेमले जात, त्यांना दूत अशी संज्ञा होती.

राज्यातील घडामोडींची, प्रजेची, राजाला अद्ययावत माहिती असली पाहिजे, यावर मौर्य शासनाचा कटाक्ष होता. ही माहिती गोळा करून राजापर्यंत पोहोचविण्याचे काम करणारी स्वतंत्र यंत्रणा होती. ही गुप्तहेरांची संघटना नव्हती, तर नित्याची आकडेवारी जमा करून राजाला पुरविण्याचे काम तिच्याकडे होते. गुप्तहेरांचे स्वतंत्र खाते होते. मीगॅस्थिनीझ व कौटिल्य दोघांनीही या संघटनांचे महत्त्व प्रतिपादिले आहे.

मध्यवर्ती शासनाची रचना कितीही विचारपूर्वक केलेली असली आणि रस्ते व वाहतूकव्यवस्था कितीही उत्तम असली, तरी भौगोलिक अंतर नाहीसे करणे अशक्य होते. म्हणून स्थानिक प्रशासनाचे महत्त्व कधीही कमी झाले नाही. खेड्यात आणि ग्रामातून पूर्वापार चालत आलेली पंचायतीसारखी शासनपद्धत कायम होती. मीगॅस्थिमीझने नगरशासनाचे तपशीलवार वर्णन दिले आहे. त्यावरून शासनाच्या कार्याची आणि कार्यव्याप्तीची कल्पना येते. त्यात म्हटले आहे, नगराचा कारभार पाहण्यासाठी एक नगरपरिषद असे. या परिषदेच्या सहा उपसमित्या असत व प्रत्येकीत पाच सभासद होते. पहिल्या समितीकडे औद्योगिक-शिल्पविषयक कामे असत. दुसऱ्या समितीकडे परदेशी नागरिकांच्या देखभालीचे काम होते. त्यांना निवासस्थाने उपलब्ध करून देणे व त्यांच्या एकूण वर्तणुकीवर देखरेख ठेवणे ही या समितीची मुख्य कामे होती. परदेशी नागरिकांच्या दिमतीला जे नोकरचाकर दिलेले असत त्यांच्याकडून परकीयांवर लक्ष ठेवले जाई. याशिवाय त्यांना आपापाल्या देशी सुखरूप पोहोचविणे, आजारी पडले तर औषधपाणी व शुश्रूषा करणे, मृत्यू पावले तर त्यांची उत्तरक्रिया करणे आणि त्यांची मालमत्ता त्यांच्या वारसाकडे पोहोचविणे, ही या समितीचीच जबाबदारी होती. तिसऱ्या समितीकडे जनगणनेची नोंद, विशेषतः जन्म-मृत्यू यांची नोंद ठेवण्याचे काम होते. यामध्ये कर आकारणीचे काम सुलभ व्हावे असा हेतू होता. तद्वतच, समाजाच्या विविध स्तरांत जन्म-मृत्यूचे प्रमाण काय आहे, याची शासनाला सतत जाणीव ठेवणे हाही होता. चवथ्या समितीकडे व्यापार उदिमाची व्यवस्था होती. विशेषतः वजनमापे तपासणे आणि मालाच्या दर्जावर लक्ष ठेवणे, ही या समितीची प्रमुख कामे होती. एकापेक्षा अधिक वस्तूंचा व्यापार करावयाचा असला, तर त्यासाठी वेगळा कर भरावा लागे. पाचव्या समितीकडे उत्पादन हे खाते होते. नव्या मालाच्या

विक्रीची व्यवस्था करणे, हे या समितीचे मुख्य काम. सहाव्या समितीकडे विक्रीकर वसूली हे काम होते. किंमतीच्या एक-दशांश इतका भाग विक्रीकर म्हणून द्यावा लागत असे व कर चुकविणाऱ्यास जबर शिक्षा असे.

याशिवाय सर्वांना मिळून सार्वजनिक हिताची अनेक कामे करावी लागत. सार्वजनिक बांधकामे, मंदिरे-मठ यांची देखभाल, बंदरे, रस्ते व बाजारपेठांची व्यवस्था, किंमतीवर नियंत्रण, भूमापन, जलपूर्ती, कालवे, जंगले, जंगलसंपत्ती, खाणी इ. गोष्टींची व्यवस्था नगरपरिषदेला पहावी लागत असे.

सैन्याची व्यवस्था अशाच सहा समित्यांकडे सोपविलेली होती. घोडदळ, पायदळ, गजदळ, रथांचे दळ, नौदल आणि पुरवठा या प्रत्येकासाठी एकएक समिती होती. युद्धाचे वेळी सेनादलांचे नेतृत्व राजाच करीत असे. या समित्या त्याच्याच मार्गदर्शनाखाली काम करीत असत. कौटिलीय अर्थशास्त्रात वर्णन केलेली सेनादलाची संघटना याच प्रकारची होती, हे ध्यानात ठेवण्यासारखे आहे.

**आर्थिक स्थिती :** लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हा होता. गंगा-यमुना खोरे अतिशय सुपीक आणि त्यामुळे धान्याची आणि धनाची सुबत्ता होती. शेतकीच्या जोडीला पूर्वीपासून चालत आलेला गोपालनाचा व्यवसाय सर्वत्र प्रचलित होताच. संपत्तीचे आणखी एक निसर्गदत्त साधन म्हणजे जंगले आणि खाणी. जंगलातून विविध प्रकारचे इमारती- लाकूड, डिंक, लाख असे पदार्थ मिळत. खाणीतून निरनिराळे धातू तसेच हिऱ्यामाणकांसारखे मौल्यवान खडे मिळत. या व्यवसायांच्या जोडीला, काही प्रमाणावर त्यांना आवश्यक व त्यांच्यावरच अवलबूंन असे अनेक व्यवसाय होते. या सगळ्यांना मिळून ‘शिल्प’ ही संज्ञा होती. ह्या शिल्पकारांमध्ये सुतार, लोहार, (धातुकार), चर्मकार, कुंभार, पाथरवट, चितारी-रंगारी, सोनार, हस्तिदंतावर कोरीवकाम करणारे अशांचा समावेश असे. याशिवाय मच्छीमारी, फासेपारधी यांचे व्यवसाय ‘हीन-शिल्प’ या वर्गात येत. प्राचीन जातक वाङ्मयावरून असे दिसते की बऱ्याच वेळी एकाएका व्यावसायिकांची स्वतंत्र खेडी व गावे असत. त्यांचेच प्रतिबिंब पुढच्या काळातल्या नगरांच्या आखणीतही उमटले आणि मग रंगारी गल्ली (वीथी), लोहार गल्ली अशा भागांचे उल्लेख येतात. या व्यावसायिकांच्या संघटना-श्रेणी होत्या. त्यांचा उपयोग कारागिरांना शिक्षण देण्याकरताच नव्हता, तर धंद्याला आवश्यक ते भांडवल, साहित्य हे उधार-उसनवारीने पुरविण्याचे काम या व्यावसायिक संघटना करीत. सामान्यपणे व्यवसायावर संघटना असत. स्वाभाविकच बाजारपेठा तयार झाल्या आणि उत्पादक व उपयोजक यांना जोडणारा दुवा म्हणजे व्यापारी तोही चांगला सरसावला. व्यापाऱ्यांच्याही श्रेणी तयार झाल्या. उधार-उसनवारी, कर्जे इ. व्यापारात अंगभूत असणाऱ्या गोष्टींची व्यवस्था या श्रेणी करीत असत. उत्पादन दूरवर जावयाचे झाले म्हणजे प्रत्यक्ष वाहतुकीची व्यवस्था आलीच. वाहतूक हाच व्यवसाय करणारे, बैलांचे मोठाले तांडे बाळगणारे लोक एकत्र आले, त्यांच्या संघटना तयार झाल्या. या श्रेणीमध्ये सार्थवाह आणि स्थलनियामक हे मार्गदर्शक महत्त्व पावले. वाहतूक म्हटल्यावर व्यापारी मार्ग आलेच. असे अनेक प्राचीन व्यापारी मार्ग आता ज्ञात झाले आहेत. राजगिरपासून पश्चिमेकडे श्रावस्ती, साकेत, बनारस असे करीत करीत एक मार्ग तक्षशिलेपर्यंत आणि तेथून पुढे थेट इराणपर्यंत जात असे. मथुरेपासून दक्षिणेला एक रस्ता असावा असे पुरातत्त्ववेत्त्यांचे मत आहे. तो अवंती-म्हणजे उज्जैनवरून-गुजरातच्या किनाऱ्यावरील भडोच, सोपारावरून कल्याण, जुन्नरमार्गे दक्षिणेला जाई. दुसरा फाटा उज्जैनवरून माळव्यातून खाली उतरून पितळखोरे, अजिंठा मार्गाने दक्षिणेकडे जाई. मौर्यकालीन साहित्यात कोणत्या मालाची ने-आण होत असे, याचे स्पष्ट उल्लेख मिळत नाहीत. भूमार्गाशिवाय जातककथांमध्ये सागरीवाहतुकीचे अनेक उल्लेख आणि वर्णने येतात. यांपैकी बहुतेक वाहतूक पूर्वेकडील देशांकडे-सुवर्णभूमी-सध्याचा इंडोचायना आणि दक्षिणेकडे सिंहलद्वीपाकडे होत असे. उच्चप्रतीचे तलम कापड, मलमल, रेशमी कापड, अत्तरे व सुगंधी द्रव्ये (धूपासारख्या वस्तू), मसाले, मोती, रत्ने, माणके यांची निर्यात होत असे. तर आयात मालात प्रत्यक्ष सुवर्णरूपाने, उत्पादन, वाहतूक, व्यापार यांचा व्याप व देवघेवीची गुंतागुंत ध्यानात घेतली म्हणजे या व्यवसायात गुंतलेला समाज सर्व देशभर पसरलेला असला तरी परस्परावलंबी होता हे सहज ध्यानात येते.

**कला :** मौर्यकाळात लाकूड, माती, हस्तिदंत, पाषाण इ. माध्यमांचा उपयोग वास्तुकला आणि शिल्पकला यांकरिता करीत असत तथापि या अवशेषांत प्रामुख्याने पाषाणशिल्पांचेच प्रमाण जास्त असून काही मृण्मूर्ती उपलब्ध झाल्या

आहेत. त्या काळची वास्तुकला ही प्रामुख्याने लाकडाची असल्यामुळे पाटलिपुत्र येथील राजवाड्यांचे अवशेष फारसे उपलब्ध झाले नाहीत. मात्र स्तूपांतून मौर्यकालीन शैली ज्ञात होते. तिथे लाकूडकामाच्या खुणा वा खोबण्या दिसतात. त्यात अशोकाचे स्तंभ व त्यांवरील कलाकुसर वैशिष्ट्यपूर्ण असून काही यक्ष-यक्षींच्या प्रतिमा आणि मातृदेवतांच्या मृण्मूर्तीही आढळतात. या कालातील कलाशिल्पांचे अवशेष हे उपलब्ध कला अवशेषांतील सर्वांत प्राचीन अवशेष समजण्यात येतात. याचे प्रमुख कारण म्हणजे हे अवशेष, विशेषतः मूर्तिकाम, दगडांचे आहे. म्हणून ते टिकून राहिले आहे. मौर्य शिल्पावर काचेसारखी चमक आणलेली आहे. नंतरच्या काळात ही विद्या कोठे कोठे टिकून राहिली पण मौर्यांच्या सर्वच मूर्तिकामावर अशी झिलाई आहे. पाटलिपुत्र या राजधानीतील (सध्याचे पाटणा, बिहार) उत्खननात काही अवशेष मिळाले. त्यात कलात्मकतेपेक्षा भव्यतेची अधिक साक्ष पटते. अशोकाच्या काळात बौद्ध धर्मीयांना पवित्र असलेल्या स्थळी स्तूप आणि ध्वजस्तंभ उभारण्यात आले. यांतील स्तूप बव्हंशी नाहीसे झाले आहेत आणि सांचीसारख्या काही ठिकाणी नंतरच्या जीर्णोद्धारामुळे त्यांचे मूळ स्वरूप लोप पावले आहे. ध्वजस्तंभ एका पाषाणात घडविलेले गोल स्तंभ असून त्यांची उंची पुष्कळदा बारा मीटर इतकी होती. या स्तंभांची शीर्षे अलंकारयुक्त असत. या स्तंभांच्या माथ्यावर हत्ती, बैल, घोडा आणि सिंह यांच्या मूर्ती बसविलेल्या होत्या. या मूर्ती यथातथ्य आहेतच पण त्यांपैकी अनेक प्राणी उदा. वृषभ (रामपूर्वा, बिहार) अत्यंत जिवंत वाटतात. सारनाथच्या स्तंभावर एकमेकाकडे पाठ करून खेटून उभे असलेले चार सिंह आहेत. त्यांच्या डोक्यावरील धर्मचक्र आता पुसट झाले आहे. परंतु या सिंहाच्या मूर्ती अतिशय वेधक ठरतात. सिंहाच्या नैसर्गिक रूपाला थोडासा कृत्रिमतेचा, ताठरपणाचा, रेखीवपणाचा स्पर्श करून या वनराजाच्या प्रतीकातून राजवैभव व सामर्थ्य यांचे उत्कृष्ट दर्शन शिल्पकाराने घडविले आहे. सिंहांच्या पायाशी असलेल्या तबकडीवरच हत्ती, घोडे इ.प्राणी उलट अगदी सहज हालचाल करताना दिसतात. अशोकाचा नातू दशरथ याने नागार्जुन टेकड्यांत खोदविलेल्या गुंफांमध्ये दोन विशेष आढळतात. काहीमध्ये गवताच्या झोपडीचा आभास उत्पन्न होईल असे कोरीव काम आहे, तर लोमशऋषी गुंफेचे मुखदर्शन हे तत्कालीन इमारतीच्या प्रवेशिकेची हुबेहूब प्रतिकृती आहे. मौर्य कालातील बहुतेक सर्व शिल्पकाम बौद्ध आणि आजीवक, म्हणजे अवैदिक धर्मपंथांचे आहे, हा आणखी एक विशेष होय.

या कलाकृतींवर परकीयांची, विशेषतः इराणी छटा आहे आणि त्यांच्या कलेचेच काही अंशी अनुकरणही या कलेत आढळते परंतु या कलेचा आशय आणि अभिव्यक्ती मात्र पूर्णतः भारतीय आहे. भारतावरील अलेक्झांडरचे आक्रमण ही एक महत्त्वाची घटना असून ग्रीकांनी तिचा इतिहास लिहून ठेवला आहे. यापूर्वी शंभर-सव्वाशे वर्षे आधी इराणच्या ॲकिमेनिडी सम्राटांनी भारतावर अतिक्रमण करून सिंधू नदीच्या पश्चिमेचा काही भाग आपल्या साम्राज्याला जोडला होता. त्यामुळे इराणी शासक, प्रशासक व इराणी संस्कृती यांचा भारतीय राजसत्तेला व समाजाला परिचय झालेला असावा. अलेक्झांडरच्या वेळी इराणी साम्राज्य संपुष्टात आल्यावर त्यांच्या दरबारातील कलाकार, मुत्सद्दी, तज्ञ हे उद्योगाच्या शोधात भारतात आले असावेत. मगधची नंद राजसत्ता प्रबळ होतीच, पुढे मौर्यांच्या नेतृत्वाने ती आणखी बलिष्ठ आणि वर्धिष्णू झाली. स्वाभाविकच मौर्य दरबारी अनेक परकीय, विशेषतः इराणी तंत्रज्ञ, कारागीर, मुत्सद्दी आले असले पाहिजेत. मौर्य शासन व कला यांची थोडी सूक्ष्म तपासणी केली, तर अनेक गोष्टी उजेडात येतात. या अनामिक परकीयांच्या अस्तित्वाची आणि प्रभावाची जाणीव होऊ लागते. मौर्यांची शासनव्यवस्था, विशेषतः प्रांतांचे शासन व त्यांचे शासक यांसारख्या गोष्टीचे इराणी व्यवस्थेशी फार साम्य आहे, असे तज्ञ सांगतात. मोठे मोठे राजमार्ग किंवा व्यापारी मार्ग बांधणे व प्रवास सोपा व सुलभ करणे या गोष्टी मौर्यांच्या आधी इराणमध्ये रूढ झाल्या होत्या. कलावशेषांच्या बाबतीत तर ही गोष्ट अधिकच प्रकर्षाने जाणवते. राज्यात सर्वत्र मोठाले शिलालेख अशोकाने कोरविले, या आधी शंभर वर्षे तरी असे लेख आपल्या साम्राज्यात ॲकिमेनिडी सम्राटांनी कोरविले होते. पाटलिपुत्रच्या राजसभेचे केवळ विधानच नव्हे तर तेथे सापडलेली स्तंभशीर्षे तसेच ध्वजस्तंभावरील सिंह आणि इतर तपशील यांचे इराणी शिल्पावशेषांशी इतके साम्य आहे, की तो केवळ एक योगायोग समणजे अशक्य आहे. मात्र या कलाकृतींचा आशय बौद्ध धर्मीय, विशुद्ध भारतीयच होता.

**साम्राज्याचा अस्त** : बृहद्रथाचा वध आणि पुष्यमित्र शुंगाचे राज्यारोहण ही मौर्य राजकुलाचा व मौर्य साम्राज्याचा अस्त झाल्याची दृश्य निशाणी आहे पण हा अस्त आकस्मिकपणे झालेला नव्हता. साम्राज्याच्या विघटनाला यापूर्वीच प्रारंभ झालेला होता. वायव्य सीमेवरील तक्षशिलेसारखे प्रदेश मौर्यांच्या साम्राज्यात नाखुषीनेच नांदत होते. त्या भागात वेळोवेळी झालेल्या बंडांवरून हे स्पष्ट झाले होते. पूर्वी हे प्रदेश अलेक्झांडरने पादाक्रांत केलेले असल्याने ते आपले आहेत, अशी पश्चिम आशियातील ग्रीकांची समजूत होती व ते पुन्हा ताब्यात आणण्यासाठी त्यांचे यत्नही चालू असत. सीमावर्ती लोकांच्या बंडाला त्यांचे उत्तेजन व सहाय्य मिळत असे. याशिवाय अगदी दक्षिण टोकाचे तसेच महान रक्तपातानंतर साम्राज्यात आलेले पूर्वेकडील कलिंगासारखे भाग स्वस्थ बसले असतील, हे संभवनीय वाटत नाही. मात्र अशा अशांततेची प्रत्यक्ष नोंद नाही हे खरे. अशोकानंतर केवळ पस्तीसच वर्षांत ग्रीक सैन्ये साकेत नगरीपर्यंत मुसंडी मारून साम्राज्याचा ठाव पाहू शकतात, यावरूनच मौर्यसत्ता किती क्षीण झाली होती, याचा अंदाज येतो. खुद्द अशोकाच्या काळातसुद्धा या साम्राज्याचा पाया कितपत बळकट होता, अशी शंका येते.

बहुतेक सर्व प्राचीन व मध्ययुगीन साम्राज्यांसारखे मौर्यांचे साम्राज्य हे व्यक्तीसापेक्षच होते. चंद्रगुप्त व अशोक यांनी उभारलेली शासनयंत्रणा जवळजवळ निर्दोष होती. मात्र ती सचेतन आणि कार्यक्षम ठेवण्यास, कर्तबगार आणि महत्त्वाकांक्षी अशा माणसांचे नेतृत्व अत्यावश्यक होते, हे तितकेच खरे आहे. तिला व्यक्तिनिरपेक्ष संघटनेचे शाश्वत रूप मिळालेले नव्हते. भारतीय उपखंडातील स्वाभाविक परिस्थिती व तद्‌जन्य आर्थिक जीवन हे प्रादेशिक राज्ये आणि एकसंघ साम्राज्ये या दोघांनाही सारखेच उपकारक आहे. तथापि काटा साधारणपणे स्वायत्त प्रादेशिक राज्यांच्या बाजूने अधिक झुकलेला दिसतो. त्याचा तोल साम्राज्याच्या बाजूने ढळावयाचा असेल, तर व्यापारात फार मोठी वृद्धी आणि एखादा समर्थ व महत्त्वाकांक्षी नेत्याचा उदय या दोन गोष्टींची गरज लागते. साम्राज्यांचे विघटन होणे आणि त्याजागी प्रादेशिक राज्ये येणे म्हणजे काहीसे कृत्रिमापासून स्वाभाविकांपर्यंत जाणेच होते. त्यासाठी विशेष कारणपरंपरा शोधण्याची जरूरी नाही. मौर्य साम्राज्याच्या अस्ताचा प्रश्न इतका साधा व सरळ राहिलेला नाही. याला कारण सम्राट अशोक, त्याचा धर्म आणि त्याचे धोरण.

अशोकाने बौद्ध धर्म स्वीकारला होता आणि पुष्यमित्र शुंग हा ब्राह्मण होता अशोकाने अहिंसेचा पुरस्कार केला आणि कलिंगाच्या युद्धानंतर त्याने साम्राज्यवृद्धीसाठी युद्ध केले नाही, या गोष्टींमुळे साम्राज्याच्या विघटनाला त्यालाच बऱ्याच इतिहासकारांनी जबाबदार धरले आहे. बौद्ध धर्माच्या पुरस्काराला जोरात प्रारंभ झाला आणि त्यामुळे वैदिक धर्माला गौण स्थान मिळाले, हे नक्कीच. हे वैदिक धर्मीय बौद्ध धर्माचा प्रसार थांबविण्यासाठी पुष्यमित्राच्या रूपाने पुढे झाले किंवा पुष्यमित्र ही वैदिकांची बौद्धांविरुद्धची प्रतिक्रिया होती, असे म्हणणे अनैतिहासिक आहे. अशोकाच्या धोरणाची प्रतिक्रिया पस्तीस वर्षांनी व्यक्त व्हावी हे थोडे आश्चर्याचेच वाटते. अशोकानंतर मौर्य राजे बौद्ध धर्माचेच अनुयायी होते, हेही निश्चित सांगता येत नाही. मुख्य म्हणजे पुष्यमित्राने बौद्ध धर्मीयांविरुद्ध काही उपाययोजना केल्याचेही दिसत नाही. तसेच कलिंगानंतर अशोकाने आक्रमक युद्धे केली नाहीत हे खरे पण त्याने आपले सैन्य बरखास्त केलेले नाही. दंडयोजना जरूर तेथे केली. कोठे अशांतता उद्‌भवली किंवा बंडे उभी राहिली तर त्यांचे दमन शस्त्रबळानेच केले. एवढे मोठे साम्राज्य शांततेच्या आणि अहिंसेच्या उपदेशामुळे टिकून राहिले, असे समजणे अशक्य आहे. युद्धसंन्यास व अहिंसा या दोन गोष्टी भिन्न आहेत. व्यक्तिगत जीवनातील अनावश्यक असेल ती हिंसा टाळावी असा अशोकाचा यत्न होता. त्याने स्वतः दिलेले उदाहरण पुरेसे बोलके आहे. 'स्वयंपाकासाठी हरिणे व मोर मारून शिजवीत, त्यांचे प्रमाण प्रथम कमी केले आणि नंतर ते थांबविले पण कोठेही शस्त्रदल बरखास्त केल्याची घोषणा नाही. अहिंसेच्या शिकवणुकीमुळे क्षात्रतेज कमी झाले' इ. निष्कर्ष अवास्तव आहेत. अशोक हा सम्राट होता, शासक होता, त्याने धर्मोपदेशकाची भूमिका स्वीकारली, तरी ती राज्यत्याग करून नव्हे. थोडक्यात सांगावयाचे, तर मौर्य साम्राज्याच्या विघटनाचे अपश्रेय अशोकाच्या पदरी बांधता येत नाही. हे विघटन सृष्टिक्रमाने, जवळपास अपरिहार्यपणे घडले.

पश्चिम आशियातील ग्रीक सम्राटांची आक्रमणे हा सुरुवातीला तरी फार मोठा धोका नव्हता. मौर्य सम्राट दुर्बल होऊ लागल्यावर हा धोका वाढत गेला व शेवटी वर सांगितल्याप्रमाणे ग्रीक स्वारी हेच निमित्त मौर्य सत्ता लयाला गेली.

**मौर्य कला (Mauryan Art)**

भारतीय कलेच्या इतिहासातील एक महत्त्वाचा कालखंड. इ. स. पू. चौथ्या शतकाच्या अखेरीस भारतातील प्राचीन मगध देशात मौर्य वंश उदयास आला. या वंशातील राजांनी इ. स. पू. ३२१ ते १८५ दरम्यान भारत खंडाच्या बहुतेक भागावर राज्य केले आणि प्रथमच एकछत्री अंमल प्रस्थापित केला. या काळाला मौर्य काल ही सर्वसाधारण संज्ञा देतात. या काळाशी संबंधित जे कलेचे प्रकार निर्मिले गेले, त्या कलाविष्कारांना प्रातिनिधिक स्वरूपात ‘मौर्य कला’ असे संबोधले जाते. या संबोधनाला राजकीय संदर्भासोबतच भौगोलिक पार्श्वभूमीसुद्धा आहे. या काळात कलेचे जे विविध प्रकार विकसित झाले, ते मोठ्या प्रमाणात गंगा-यमुनेच्या दोआबात पाहायला मिळतात. त्यासोबतच या कलेचा या प्रदेशाला लगत असलेल्या प्रदेशावरील आनुषंगिक प्रभाव समकालीन काळात आणि त्यानंतरच्या काळात अवशिष्ट स्वरूपात दृग्गोचर होतो. भारतीय कलेतिहासात हा कालखंड महत्त्वाचा टप्पा मानला जातो. या काळातील कलाविष्कारांचा व कलात्मक उंचीचा संबंध द्वितीय नागरीकरणाशी (Second Urbanization) जोडला जातो. किंबहुना या दोन्ही गोष्टी परस्परसंबंधातूनच विकसित होत होत्या, असे विश्लेषण काही विद्वान करतात. या कलेची वैशिष्ट्ये सूक्ष्म निरीक्षणांती कलातज्ज्ञांनी निर्धारित केली आहेत. ही निर्धारित केलेली वैशिष्ट्ये ज्या कलावस्तूमध्ये याअगोदर आढळली किंवा आढळतात, त्या कलावस्तूंना मौर्यकालीन वा मौर्य काळाचा प्रभाव असलेल्या कलावस्तू असे वर्गित केले जाते.

मौर्य कला ढोबळमानाने मौर्यपूर्व काळ, विकसित मौर्य काळ आणि उत्तर मौर्य काळ अशा तीन कालखंडांत विभागली आहे. हा कालक्रम कलेच्या स्वरूपासोबतच तत्कालीन इतर पुराव्यांवर बेतलेला आहे. विशेषत: अभिलेख आणि साहित्यिक उल्लेख. तसेच या काळातील दुसरे महत्त्वाचे लक्षण म्हणजे या काळातील काही कलाप्रकार प्रत्यक्ष राजकीय पाठबळाने विकसित झाले. भारतीय कला-इतिहासात प्रत्यक्ष राजकीय सहभागाचा पुरावा मौर्य काळापासूनच पाहायला मिळतो. त्यामुळे राजकीय पाठबळाच्या माध्यमातून निर्मित झालेल्या कलावस्तू आणि इतर कलाप्रकार असे मौर्यकालीन कलेचे ढोबळ वर्गीकरण करता येते.

या काळातील कलेचे मुख्यत: स्थापत्य, मृण्मय आणि शिल्पकला असे प्रकार आढळतात. मौर्यकालीन कलावस्तू सापडलेल्या महत्त्वाच्या स्थळांमध्ये बुलंदी बाग, कुम्रहार, पाटना, राजगृह, वैशाली, कौशांबी, श्रावस्ती, सारनाथ, सांची, बोधगया, धौली, जौगढ, शिशुपालगढ, विदिशा इ. स्थानांचा उल्लेख करता येईल. यांव्यतिरिक्त बाराबर व नागार्जुनी ही दोन स्थळे. लेणीस्थापत्य, लौरीया अरराज, लौरीया नंदनगढ, सारनाथ, सांची, गोटीहवा, प्रयागराज (अलाहाबाद), वैशाली, रामपूर्वा, संकीसा, लुंबिनी, दिल्ली इ. ठिकाणी मौर्यकालीन स्तंभ (अशोकस्तंभ) आजही पाहायला मिळतात. यांतील काही स्तंभांवर मौर्य सम्राट अशोकाचे लेख आहेत, ज्यांना ‘स्तंभ लेख’ म्हणून ओळखले जाते. सोबतच या स्तंभांच्या शीर्षस्थानी विविध प्राण्यांचे शिल्पांकन आढळते. अशाच प्रकारच्या शिल्पांकनातील सारनाथ येथे उत्खननात मिळालेले चार सिंहांचे शिल्प आणि त्यावरील चक्र भारतीय राज्यघटनेने भारताच्या सार्वभौमत्वाचे प्रतीक म्हणून स्वीकारले आहे.

मौर्य काळामध्ये स्तंभ आणि त्यावरील शीर्ष प्राणिशिल्पांसाठी चूनार (उत्तरप्रदेश) येथील खाणींमधून विशिष्ट रंगछटेचा वालुकाश्म दगड मोठ्या प्रमाणात वापरला जात होता. स्तंभ आणि त्यांवरील प्राणिशिल्पांकन एकाच ठिकाणी तयार करून हे शिल्पखंड गंगानदीच्या प्रवाहाच्या साहाय्याने एका ठिकाणांहून दुसऱ्या ठिकाणी वाहून नेले जात असे.

या काळातील शिल्पांवर एक विशिष्ट प्रकारची चकाकी आढळते. ही चकाकी प्रथमदृष्टीत धातुसदृश भासते. अशा प्रकारची चकाकी प्रामुख्याने मौर्य काळातील कलावस्तूंवर मोठ्या प्रमाणात आढळते. त्यामुळे दगडाला चकाकी देण्याचे तंत्र त्या काळी मोठ्या प्रमाणात विकसित झाले होते आणि त्यावर त्या काळातील कलाकारांचे प्रभुत्व होते, असे नमूद करता येते. या शिल्पकलेच्या सामान्य दृष्टीने दिसणाऱ्या वैशिष्ट्यांत शिल्पांची प्रमाणबद्धता, विशेषत: प्राण्यांच्या शिल्पांकनात, नजरेस भरते. ही प्रमाणबद्धता त्या त्या प्राण्यांचे वास्तव चित्र उभे करण्यास कारणीभूत आहे. त्यांतून

दृष्टीस पडणारे भाव त्या त्या प्राण्यांच्या स्वभाववैशिष्ट्याला धरून असलेले दिसतात. उदा., सिंह, हत्ती, घोडा, बैल या प्राण्यांचे शिल्पांकन करताना शिल्पकाराने त्या प्राण्याच्या मूलभूत स्वभावाला गृहीत धरून आपल्या कलाविष्काराचा प्रारंभबिंदू ठरविला आहे. या प्राण्यांच्या शिल्पांकनात मौर्यकालीन कलेच्या उन्नयनाची स्वतंत्र प्रक्रिया अभ्यासकांनी निदर्शनात आणून दिली आहे. उदा., वैशाली येथील स्तंभशीर्षावरील सिंहप्रतिमा आणि सारनाथ येथील सिंहप्रतिमा यांची तुलना केली असता हा फरक आपल्याला अगदी स्पष्टपणे जाणवतो. हा तुलनात्मक फरक मौर्यकालीन शिल्पकलेच्या स्वतंत्र विकासाची प्रक्रिया नजरेसमोर उभी करतो.

प्राण्यांच्या शिल्पांसोबतच तत्कालीन मानवी शिल्पांकनातसुद्धा हे तत्त्व उतरलेले दिसते. उदा., दीदारगंज येथील चवरी ढाळत असलेली स्त्रीप्रतिमा (दीदारगंज येथील यक्षी), लोहानीपूर येथील खंडित शिल्प (तीर्थंकर), तसेच अन्य ठिकाणी मिळालेले खंडित शिल्पावशेष हे सर्व शिल्पांकन कलात्मक मूल्यांशी प्रामाणिक असलेले दिसते.

मौर्यकाळात बौद्ध स्थापत्यकलेने महत्त्वाचा आयाम घेतलेला आढळतो. विशेषतः ज्या ठिकाणी सम्राट अशोकाने आपले स्तंभ उभारले, त्या ठिकाणी बौद्ध स्तूप आढळतात. यावरून या काळात ‘स्तूप’ स्थापत्यप्रकाराची प्रमुख लक्षणे आणि त्याची वैशिष्ट्ये विकसित झाली होती, असे उपलब्ध स्तूपांच्या आधारे सांगता येते. यांमध्ये सारनाथ (उत्तरप्रदेश), वैशाली (बिहार), बैराट (राजस्थान), कुशिनारा (बिहार), सांची (मध्य प्रदेश) इत्यादी स्तूपांचा उल्लेख करता येईल. यांतील काही स्तूप उत्खननात मिळाले, तर काही स्तूपांमध्ये मौर्य काळानंतर केलेली दुरुस्ती आणि त्यावर अधिकची भर घातलेली आढळते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे सांची येथील महास्तूप, जो सम्राट अशोकाने निर्माण केला आणि अशोकानंतर शुंग आणि सातवाहन राजवंशांच्या काळात त्याची दुरुस्ती आणि विस्तार केला.

स्थापत्य आणि शिल्पकलेसोबतच या काळातील मृण्मय कलाही उल्लेखनीय होती. मौर्यपूर्व काळात अगदीच प्रारंभिक अवस्थेत असलेली ही कला मौर्य काळाच्या भरभराटीत एका वेगळ्याच उंचीवर पोहोचलेली दिसते. हा मृण्मय कलेचा विकास दोन अंगांनी पाहावयास मिळतो : एक, तंत्राच्या अंगाने आणि दुसरा, शिल्पांकनाच्या दृष्टीने. या काळातील मृण्मय शिल्पे प्रामुख्याने हाताने तयार केली जात असत. परंतु बुलंदी बाग येथील काही मृण्मय शिल्पांच्या अभ्यासावरून या मृण्मय शिल्पांच्या मुखाचा भाग हा साच्याद्वारा बनविल्याचे निदर्शनास येते. यावरून या कालखंडात साच्याचे आंशिक रूपात प्रयोजन प्रारंभित झाले असावे, असे विधान करता येईल. ही मृण्मय शिल्पे उत्कृष्ट मातीपासून तयार केली असून चांगल्या प्रकारे भाजलेली आढळतात आणि या शिल्पांवर कमीत कमी अलंकरण आढळते. या शिल्पांमध्ये मानव, प्राणी, पक्षी आणि मनोरंजन किंवा गृहसजावटीसाठीच्या कलात्मक वस्तू आढळतात. या मृण्मय कलेत, विशेषतः मानवी अंकनात कमालीची परिपूर्णता आढळते. लहान मुली किंवा लहान मुले यांच्या चेहऱ्यावरील बालसुलभ हास्य, खेळत असताना असलेले भाव, स्वत:च जर स्वत:ला गिरकी घेत असेल तर त्या वेळी असलेली शरीराची ठेवण, लकब, वस्त्रांची ठेवण इ. सर्व बाबींचे अचूक अंकन या कलेत आढळते.

मौर्य कलेच्या उद्‌भव आणि विकासाच्या संदर्भात दोन सिद्धांत अभ्यासकांमध्ये प्रचलित आहेत. त्यांतील पहिला गट असे स्पष्ट करतो की, मौर्य कला पर्शियन व ग्रीक कलेच्या प्रभावातून विकास पावली आहे; तर दुसरा गट असे म्हणतो की, मौर्यकला आणि त्या काळातील विविध कलाविष्कार भारतीय परंपरेतूनच विकास पावले आहेत. या परस्परविरोधी दोन्ही मतांचे सिद्धांत या काळातील कलेचे विश्लेषण आणि त्यांचा अर्थ समजून घेण्यासाठी महत्त्वाचे आहेत. अलीकडे मात्र परस्परप्रभाव, सांस्कृतिक आदानप्रदान आणि त्यातून विकसित झालेली त्या त्या प्रदेशाची वैशिष्ट्ये कलानिर्मितीच्या मुळाशी असावीत, असे सिद्धांतन केले जाते. भारतीय शिल्पकलेत भारतीयत्वाचे निदर्शक म्हणू असे जे विशेष आपल्याला आढळते, त्याचे मूळ मौर्य कलेत दिसते.

प्राचीन भारतातील एक प्रसिद्ध राजवंश. चंद्रगुप्त मौर्य याने नंद घराण्याला पराभूत करून मौर्य साम्राज्याची स्थापना केली. इ. स. पू. ३२१ ते इ. स. पू. १८५ या कालखंडात मौर्य घराण्याचे राज्य भारतीय उपखंडाच्या बहुतांश भागावर पसरलेले होते. हा कालखंड भारतीय उपखंडाच्या कलेतिहासाच्या दृष्टीने फार महत्त्वाचा मानला जातो. या

काळातील उपलब्ध कलेच्या प्रकारांमध्ये मृण्मय कलेचे अन्यन्यसाधारण महत्त्व आहे. भारतीय उपखंडात अनेक ठिकाणी झालेल्या पुरातात्त्विक उत्खननात या काळातील पक्व मृण्मय प्रतिमा प्राप्त झाल्याच्या नोंदी आहेत.

इंग्रजी भाषेत प्रचलित असलेला 'टेराकोटा' हा शब्द 'Terracotta' या लॅटिन शब्दावरून घेतला असून त्याचा अर्थ 'भाजलेली माती' (पक्व मृदा) असा होतो. माती हे सहज उपलब्ध होणारे साधन असल्यामुळे मातीच्या प्रतिमा मोठ्या प्रमाणात अगदी आद्य ऐतिहासिक (Protohistoric) काळापासून विपुल प्रमाणात मिळालेल्या आहेत. विशेषतः गंगा-यमुनेच्या खोऱ्यात विपुल प्रमाणात उपलब्ध असलेली उत्कृष्ट गाळाची माती ही या कलेसाठी वरदान ठरलेली दिसते.

मौर्य कालखंडातील 'मृण्मय कला' कलेतिहासाच्या अभ्यासकांनी ढोबळपणे तीन कालखंडात विभागली आहे : मौर्य पूर्व काळ, मौर्य काळ व मौर्योत्तर काळ. या काळविभाजनामागे काही महत्त्वाच्या गृहीतकांचा विचार केला गेलेला दिसतो. यातील अत्यंत महत्त्वाचे गृहीतक म्हणजे या मृण्मय प्रतिमांच्या प्राप्तीच्या उत्खननातील पुरातात्त्विक सांस्कृतिक स्तर, सोबतच मृण्मय प्रतिमांचे आकारप्रकार, भाजणी, विषय, तंत्र, ठेवण इत्यादी.

उत्कृष्ट रीत्या भाजलेल्या मातीपासून तयार केलेल्या या प्रतिमा या काळाच्या पूर्वी सापडलेल्या प्रतिमांपेक्षा विषयवस्तू आणि प्रतिमांकनाच्या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण आहेत. सोबतच या प्रतिमांतील मानवी अंकनाचे काही ठळक लक्षणे नमूद करता येतात. शारीरिक ठेवण, चेहऱ्यावरील भाव, वस्त्रालंकार इत्यादी. मौर्य काळातील सुस्थितीतील मृण्मय प्रतिमा प्राचीन पाटलीपुत्रचा भाग असलेल्या स्थळांवर मिळालेल्या आहेत. त्यांत बुलंदीबाग, कुम्रहार व बक्सर या ठिकाणांचा समावेश होतो. या बरोबरच उत्तर प्रदेशमधील सारनाथ, राजघाट, अहिच्छत्र, श्रावस्ती, मथुरा आणि कौशांबी इत्यादी महत्त्वाच्या पुरातात्त्विक स्थळांवरून सुद्धा मौर्य कालीन मृण्मय प्रतिमा मिळाल्याची नोंद प्रकाशित अहवालांत आढळते. इतर ठिकाणांमध्ये वर्तमान उत्तर प्रदेशामधील हस्तिनापूर, आलमगीरपूर, अंतरंजीखेडा, भिटा, प्रल्हादपूर, सराई मोहन, सोहगूर या स्थळांचा सुद्धा समावेश करता येतो.

बुलंदीबाग आणि बक्सर या ठिकाणी मिळालेल्या मृण्मय प्रतिमांच्या निधीवरून (Hoard) असा कयास लावला जातो की, मौर्य कालखंडात 'पाटलीपुत्र' (सध्याचे पाटणा, बिहार) हे शहर मातीपासून तयार केल्या जाणाऱ्या वस्तू व प्रतिमांचे केंद्र होते. या काळातील मातीपासून बनवलेल्या प्रतिमा ह्या आकाराने मोठ्या आहेत. मृण्मय प्रतिमा तयार करण्याच्या बदलत्या तंत्राच्या संदर्भात हा काळ महत्त्वाचा आहे. उदा., या काळातील मानवी प्रतिमांच्या शरीराचा काही भाग हा साच्यात बनवून नंतर इतर अवयव हाताने तयार करून जोडला जात असे. तदनंतर तयार केलेली प्रतिमा भट्टीत भाजली जात असावी, असे तज्ज्ञांचे निरीक्षण आहे.

अभ्यासकांनी या मृण्मय प्रतिमांची शैलीच्या आधारे दोन गटात विभागणी केलेली आहे. यांतील पहिल्या गटातील मृण्मय प्रतिमांवर मुख्यत: सामान्य जनजीवन आणि दरबारातील राजेशाही थाट यांचा प्रभाव दिसून येतो. या सोबतच या प्रतिमा पूर्णतः हाताने घडवलेल्या आढळतात. प्रतिमांचे हात, पाय व इतर अवयव हे हाताने बनवलेले असून त्यांना हातांच्या बोटाने आकार दिलेला आढळतो. या प्रतिमांचे कान, नाक, ओठ, केस, बेंबी इत्यादी शरीरलक्षणे वेगळी बनवून नंतर प्रतिमेला जोडलेले दिसून येतात. या गटातील प्रतिमा ढोबळ आणि साध्या धाटणीच्या आहेत. त्यामुळे या मृण्मय प्रतिमा सामान्य माणसांच्या किंवा दरबारात असलेल्या सेवकांच्या असाव्यात.

विकसित तंत्र, कल्पना, शैली आणि नव्या घडणीच्या मृण्मय प्रतिमा दुसऱ्या गटात मोडतात. या गटातील मृण्मय प्रतिमांचे चेहरे साच्यात बनवून उर्वरित प्रतिमेचे अवयव हे हाताने बनवले जात असे. अशा प्रकारच्या प्रतिमा ह्या उत्तर प्रदेशमधील मथुरा, अहिच्छत्र, राजघाट, कौशांबी येथे मोठ्या प्रमाणात मिळालेल्या आहेत. परकीय प्रभाव असलेल्या प्रतिमा सुद्धा या गटात अंतर्भूत होतात. हा प्रभाव प्रतिमांची शारीरिक ठेवण, चेहऱ्यावरचे भाव, केशरचना, दागिने इत्यादी बाबींच्या आधारे नजरेस पडतो. मथुरा येथे सापडलेली पर्शियन प्रभाव दर्शवणारी मृण्मय प्रतिमा

परदेशातून आयात केलेली असावी, असा अंदाज बांधला जातो. या गटातील प्रतिमांवर राजेशाही थाटाचा प्रभाव अधिक प्रमाणात दिसून येतो.

मौर्यकालीन प्रतिमांमध्ये कारागिरांनी प्रतिमेच्या सजावटीवर अधिक भर दिलेला दिसून येतो. तसेच मूर्तींची घडण ही अधिक उत्तम रीत्या व कलात्मक पद्धतीने विकसित झालेली दिसून येते. स्त्री प्रतिमांची केशरचना आणि दागिने दाखवण्यासाठी मूर्तिकाराने फुलांचा तसेच मोठ्या प्रमाणात इतर नैसर्गिक वस्तूंचा उपयोग केलेला दिसतो. अशा प्रतिमा मथुरा, अहिच्छत्र आणि कौशांबी येथील उत्खननात आढळून आलेल्या आहेत. विशिष्ट धर्म कल्पनांचा विकास व प्रसाराच्या आकलनासाठी मृण्मय प्रतिमांच्या अभ्यासाचे महत्त्व अभ्यासकांनी अधोरेखित केलेले आहे. मौर्यपूर्व काळ व मौर्यकालीन प्रचलीत धार्मिक मान्यता, विश्वास, देवता इत्यादींच्या अभ्यासाठी मृण्मय प्रतिमा मुख्य साधन आहे. या काळात अनेक ठिकाणी विपुल प्रमाणात स्त्री प्रतिमा मिळालेल्या आहेत. या स्त्री प्रतिमांची काही समान लक्षणे आढळतात. उदा., अनावृत्त अप्रमाणबद्ध प्रतिमा, काहीशी रुंद कंबर, उठावदार स्तन, अनावृत्त जननेंद्रिय, पोटाजवळचा काहीसा पुढे आलेला मांसलभाग इत्यादी. अशी लक्षणे असलेल्या स्त्री प्रतिमा या काळात सर्वदूर आढळून आलेल्या आहेत. यांतील काही प्रतिमा मौर्यपूर्वकालीन सांस्कृतिक स्तरातून, तर काही प्रतिमा मौर्यकालीन स्तरात आढळलेल्या आहेत. अशा प्रकारच्या स्त्री प्रतिमा मातृदेवतेच्या असाव्यात. या प्रतिमांचा तत्कालीन सुफलनविधींशी संबंध असावा, असा तर्क काही अभ्यासकांनी केलेला आहे. या प्रतिमा तत्कालीन लोकधर्म आणि संबंधित मान्यतांना अधोरेखित करतात. यात काही स्त्री प्रतिमा लहान मुलासोबतही असलेल्या दिसतात.

उत्तर प्रदेश येथील काही ठिकाणी व इतर काही स्थळी उपलब्ध मृण्मय प्रतिमांत मृदेपासून वराह, सर्प, प्राणी व पक्षांचा चेहरा असलेल्या स्त्री प्रतिमांची नोंद आढळते. या प्रतिमा तत्कालीन मातृदेवतांच्या लक्षणाकडे अंगुलीनिर्देश करतात. तसेच लहान मुलांसोबत आणि रिबिनी वापरून केलेल्या डोक्यावर पट्टा घातलेल्या (Rosettes) प्रतिमा सापडलेल्या आहेत. वराहाच्या चेहरा असणाऱ्या मातृदेवतांच्या काही प्रतिमा मथुरा येथील उत्खननात आढळून आल्या. ह्या प्रतिमेचे शरीर म्हणजे प्रजापती व डोके म्हणजे पृथ्वी होय, असे अभ्यासक सांगतात. शतपथ ब्राह्मण आणि पुराणांमध्येही प्रजापतीने पृथ्वी उचलून घेतल्याची कथा प्रचलित आहे. त्याचेच प्रतीक म्हणून ह्या मूर्तीची घडण केलेली असावी, असा अंदाज लावलेला दिसतो.

मथुरा आणि अहिच्छत्र या ठिकाणी झालेल्या उत्खननात पक्ष्याच्या चेहरा असलेल्या मातृदेवतेच्या मातीच्या प्रतिमा आढळून आल्या. मथुरा येथे सापडलेली प्रतिमा ही बऱ्यापैकी सुस्थितीत असून प्रतिमेचा उजवा हात अर्धा तुटलेल्या अवस्थेत आहे. मुखाचा भाग गरुडाच्या चोचीप्रमाणे भासतो. चेहरा हा गरुडाप्रमाणे असल्यामुळे ही मूर्ती 'विनता' म्हणजेच गरुडाच्या आईची असावी. मात्र अहिच्छत्र येथे प्रतिमेचा केवळ चेहऱ्याकडचा भागच सापडला आहे. राजघाट, पाटणा, बुलंदीबाग आणि प्रल्हादपूर येथील उत्खननात सापाची वैशिष्ट्ये असलेल्या काही मानवी प्रतिमा आढळून आल्या. वरील चारही ठिकाणी सापडलेल्या प्रतिमा ह्या एकमेकांपेक्षा वेगळ्या आहेत. बुलंदीबाग येथून उपलब्ध प्रतिमेला मानवी डोके असून शरीराला वेलीसारखे दिसणारे वेटोळे आहेत. पाटणा येथील प्रतिमेचे शरीर हे सापाचे असून या प्रतिमेला मानवी डोके नाही. प्रल्हादपूर येथील प्रतिमा ही साधी असून त्याच्या डोक्याकडील भाग हा वरच्या बाजूस निमुळता आहे.

या अर्धसर्प/अर्धमानवी प्रतिमा तयार करण्याचा हेतू हा तत्कालीन प्राणिपूजनाची मान्यता व विश्वास दर्शवितात. विशेषतः या प्राणिपूजनात 'सर्पपूजन' फार प्राचीन असावे, असे या प्रतिमांवरून लक्षात येते. मौर्यकाळातील धार्मिक महत्त्व असलेल्या काही प्रतीकात्मक वस्तू मथुरा येथे सापडल्या. या वस्तू अतिशय ढोबळ बनवलेल्या असून त्या अगदीच थोड्या प्रमाणात उपलब्ध आहेत. मानवी चेहरा आणि पशूचे शरीर अशी एक मौर्यकालीन मृण्मय प्रतिमा हस्तिनापूर येथे मिळाली आहे. या प्रतिमेचे शरीर हे सिंहाचे असावे. डाव्या हातात फूल आणि उजव्या हातात वाडगा पकडलेली आणि दागिने घातलेली एक स्त्री प्रतिमा हस्तिनापूर येथून मौर्य कालीन स्तरामधून मिळाल्याची नोंद आढळते. ही प्रतिमा अंशतः साच्यात बनवलेली असून ती एका स्त्री भक्ताची असावी, असा अंदाज अभ्यासक करतात.

मौर्य कालखंडातील धार्मिकदृष्ट्या महत्त्व नसणाऱ्या काही मृण्मय प्रतिमा व वस्तू या उत्तर प्रदेश आणि बिहार येथील काही स्थळांवर मिळाल्याच्या नोंदी आढळतात. मथुरा या ठिकाणाहून पर्शियन प्रभाव असलेल्या फक्त मुखाचा तेवढा भाग उपलब्ध आहे. या प्रतिमेच्या चेहरेपट्टीवर पर्शियन प्रभाव दृग्गोचर होतो. तसेच याच ठिकाणाहून पर्शियन प्रभाव असलेली अजून एक पुरुषाची उभी प्रतिमा आढळून आलेली आहे. या प्रतिमेची देहबोली आणि वेषभूषेवरून ती कोण्या मुख्य किंवा महत्त्वाच्या व्यक्तीची प्रतिमा असावी, असे दिसून येते. इ. स. पू. चौथ्या आणि तिसऱ्या शतकात भारताचा इराणी लोकांशी संबंध असल्यामुळे, येथील कलाकुसरींवर पर्शियन प्रभाव आढळून येतो.

त्याबरोबरच याच काळात गांधार प्रदेशात अलेक्झांडरच्या आक्रमणानंतर ग्रीक लोकांचा संपर्क मोठ्या प्रमाणात वाढला. या संचार व संपर्काचा परिणाम तत्कालीन कलाकुसरीच्या वस्तू व इतर कला प्रकारांवर पडलेला दिसून येतो. राजा अशोकाच्या काळात गांधार प्रदेश मौर्य साम्राज्याचा महत्त्वाचा भाग होता. मौर्यकालीन मृण्मय प्रतिमांत जो तंत्र व घडणावळीच्या संदर्भात आमुलाग्र बदल घडून आलेला दिसतो त्या मागे 'ग्रीककलेचा' प्रभाव असावा, असे काही विद्वान युक्तिवाद करतात. विशेषतः बुलंदीबाग येथे मिळालेल्या मृण्मय प्रतिमांच्या निधीत उपलब्ध झालेल्या प्रतिमांवर ग्रीक कलेचा मोठा प्रभाव दिसतो. हा प्रभाव चेहरा, वस्त्र, शरीराची ठेवण, प्रतिमांत दर्शविलेल्या विविध कृती यांवरून अधोरेखित करता येते. या निधीमध्ये मिळालेल्या प्रतिमा आजपर्यंत भारतात उपलब्ध झालेल्या मृण्मय प्रतिमांत सर्वोत्कृष्ट कलेचा नमुना म्हणून गणल्या जातात.

मौर्यकाळातील मृण्मयप्रतिमा व वस्तू हे तत्कालीन इतिहासाच्या आकलनाचा एक स्रोत म्हणून बघितल्यास या अभ्यासातून पुढील मुख्य मुद्दे निदर्शनास येतात : या काळात मृण्मय वस्तू व प्रतिमा बनवण्याच्या तंत्रात बराच बदल झाला, त्या सोबतच मानवी प्रतिमांची रचना, आकार, नवीन विषयांची भर, उपयोगिता आणि स्वरूप यांत आमूलाग्र बदल घडून आले. या काळातील कलेवर मौर्य साम्राज्याचा विस्तीर्ण भूप्रदेश आणि तेथे वस्तीस असलेल्या विविध जनसमुदाय, त्यांच्या परंपरा व परस्परसंबंध यांचा प्रभाव आढळतो. मौर्य काळ आणि मौर्योत्तर काळात मृण्मय कलेने जी कलात्मक उंची गाठलेली दिसते, याचे मूळ या काळातील आर्थिक, सामाजिक व विस्तारित जनसंपर्क या बाबींशी जोडता येतो.

**अर्थशास्त्र:-**

प्राचीन भारतातील राजकीय ग्रंथांमध्ये अर्थशास्त्राला महत्त्वाचे स्थान आहे. अर्थशास्त्र नावाच्या ग्रंथाच्या निर्मितीचे श्रेय **कौटिल्य** किंवा **चाणक्याला** दिले जाते. असे मानले जाते की कौटिल्य हा ब्राह्मण, तक्षशिलेचा ब्राह्मण आणि चंद्रगुप्त मौर्यच्या राज्याचा पंतप्रधान होता. पुराणांमध्ये, चाणक्याचे दुसरे नाव विष्णू गुप्त आहे आणि त्याला द्विजर्षभ (सर्वोत्तम ब्राह्मण) म्हटले गेले आहे. कौटिल्याचे मूळ नाव **विष्णुगुप्त** असे मानले जाते. तर 'कुटिल' हे त्याचे गोत्र होते. अर्थशास्त्र नावाचा ग्रंथ 15 विभाग आणि 1803 उपविभागांमध्ये विभाजित आहे. यात अंदाजे 600 श्लोक आहेत. हे पुस्तक संस्कृत भाषेत उपपद्म शैलीत लिहिलेले आहे. असे मानले जाते की अर्थशास्त्र त्याच्या सध्याच्या स्वरूपात इसवी सनाच्या तिसऱ्या शतकात विकसित झाले असेल. त्यामुळे त्यात नंतरचे काही भाग समाविष्ठ करण्यात आले असतील, पण लेखनशैली आणि त्यात नमूद केलेले तपशील हे केवळ मौर्य कालखंडाचा ग्रंथ बनवतात.

अर्थशास्त्रातील प्रशासकीय व्यवस्थेशी संबंधित तथ्ये इतर स्रोतांद्वारे देखील पुष्टी केली जातात. भारतातील अर्थशास्त्राची पांडूलिपी शोधण्याचे कार्य आर. शर्मा शास्त्री यांनी 1904 मध्ये केले आणि त्याचे भाषांतर केले.

अर्थशास्त्राची सर्वात खास गोष्ट म्हणजे मौर्यकालीन असूनही त्यात कोणत्याही मौर्य शासकाचा उल्लेख नाही किंवा पाटलीपुत्र किंवा मौर्य काळाशी संबंधित कोणत्याही तारखेचा उल्लेख नाही. मात्र, या ग्रंथात हे स्पष्टपणे नमूद केले आहे की अर्थशास्त्राची रचना नंद राज्यकर्त्यांच्या ताब्यात असलेल्या भागात निवास करीत असलेल्या लेखकाने केली आहे.

अर्थशास्त्र 15 अधिकारणांमध्ये विभागले गेले आहे, त्यापैकी पहिल्या अधिकारात राजसत्तेशी किंवा राजत्वाशी संबंधित बाबींचे वर्णन आहे. द्वितीय अधिकरणात नागरी प्रशासनातीशी संबंधित विस्तृत विवेचन करण्यात आले आहे.

तिसऱ्या आणि चौथ्या अधिकरणात दिवाणी, फौजदारी आणि वैयक्तिक कायदे उल्लेख करण्यात आला आहे.

पाचव्या अधिकरणात सम्राट, त्याचे सेवक आणि परिचारक यांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या नमूद केल्या आहेत. सहाव्या अधिकरणात राज्यातील अत्यावश्यक 7 अवयवांची म्हणजे सप्तांग सिध्दांताची चर्चा करण्यात आली आहे.

अर्थशास्त्राच्या अंतिम 9 अधिकरणात परराष्ट्र धोरण, लष्करी कारवाया, युद्धात विजय मिळविण्याचे उपाय , शत्रू देशात लोकप्रियता मिळवण्यासाठीचे उपाय, युद्धातील तह आणि करार अशा विविध विषयांवर स्पष्टीकरण उपलब्ध आहे.

अर्थशास्त्रात चक्रवर्ती शासकाची संकल्पना प्रथमच नमूद केलेली आहे. चक्रवर्ती प्रदेश हिमालयापासून महासागर आणि संपूर्ण जंबुदिमपर्यंत 9 हजार योजनांमध्ये पसरलेला आहे असे अर्थशास्त्रात लिहिले आहे. चक्रवर्ती राजे विजय आणि समृद्धीसाठी आणि न्याय्य राज्यासाठी कार्य करीत असतात असे म्हटले आहेत. मौर्य काळात चक्रवर्ती शासकांनी अश्वमेध किंवा वाजपेय यज्ञ केल्याचा कोणताही पुरावा मिळत नाही.

अर्थशास्त्राच्या संप्रवृत्यय या अध्यायात नवीन राज्ये जिंकण्याचे धोरण निश्चित केले आहे. अर्थशास्त्रात चक्रवर्ती शासकाने विजयांच्या तीन श्रेणींचे वर्णन केले आहे —

(१) धार्मिक विजय : यामध्ये पराभूत शासकाकडून दंड आणि भेटवस्तू गोळा करून त्याची पुनर्स्थापना करणे अशी प्रक्रिया होती.

(२) लोभ-विजय : शत्रू राज्याची बहुतेक भूमी संपादन करणे किंवा अमाप संपत्ती संपादन करणे.

(3) असुर विजय: पराभूत राज्याचे संपूर्ण विघटन.

संघवृत्तम नावाच्या अध्यायात कौटिल्याने लिच्छवी, वृज्जी, मल्लक, कुकर, पांचाल, कंबोज आणि सुराष्ट्र या राज्यांचा उल्लेख केला आहे.

अर्थशास्त्रानुसार राजाने लोकांशी सल्लामसलत करूनच कारभार चालवावा. अर्थशास्त्रात, मंत्र्यांची योग्यता तपासण्यासाठी आणि परीक्षण करण्यासाठी चार निकष निश्चित केले आहेत - (i) भय (ii) गुणवत्ता (iii) संपत्ती (iv) कायदा.

कौटिल्यने नागरी सेवेवर खूप भर दिला आहे. या शिवाय कौटिल्य यांनी प्रशासनाच्या 18 विभागांची चर्चा करतो या शिवाय कौटिल्य यांनी अधिकाऱ्यांच्या पगाराचाही उल्लेख केला आहे.

कौटिल्य राजाला आग, वादळ, महामारी, दुष्काळ, उंदीर, साप आणि राक्षस यांपासून आपल्या प्रजेचे रक्षण करण्याचा आदेश देतो. राजाने वैयक्तिकरित्या विविध धर्म, देव आणि ब्राह्मण यांच्या अनुयायांकडे लक्ष द्यावे, असे अर्थशास्त्रात लिहिले आहे. राजाने पवित्र स्थाने, अल्पवयीन, वृद्ध, दु:खी, असहाय्य आणि स्त्रियांची सेवा करावी.

अर्थशास्त्रानुसार राजाने गुन्हा कबूल करण्यासाठी बळाचा वापर केला पाहिजे. ज्यांचा गुन्हा सिद्ध झाला आहे त्यांना तडीपार केलेच पाहिजे. अर्थशास्त्रात दंडाचे 18 प्रकार आणि चाबकाचे फटके मारण्याचे 7 प्रकार सांगितले आहेत. महिलांना ठरवून दिलेल्या निम्मी शिक्षा दिली जाईल, असे सांगण्यात आले आहे. राजाने एखाद्या निरपराध व्यक्तीला शिक्षा केल्यास तीनपट दंड वरुणला अर्पण करून पाण्यात टाकावे. अर्थशास्त्रानुसार, राजाने स्त्रियांचे

कोणत्याही प्रकारे नुकसान करू नये, इतरांची मालमत्ता चोरू नये आणि असत्य, गर्व आणि इतर तत्सम कार्यांपासून दूर राहावे.

अर्थशास्त्रात असे लिहिले आहे की, अराजकतेला कंटाळून जनतेने सूर्यपुत्र मनू याला आपला राजा म्हणून स्वीकारले होते आणि त्याच्या उत्पादनाचा एक षष्ठांश आणि त्याच्या व्यवसायाचा एक दशांश हिस्सा आणि त्याचप्रमाणे काही प्रमाणात सोने राजाला दिले होते. त्यामुळे साधूनेही आपल्या उत्पन्नातून एक षष्ठांश राजाला देणे आवश्यक आहे. अर्थशास्त्रात आणखी एका ठिकाणी राजा प्रजेकडून कर वसूल करतो कारण तो प्रजेची आज्ञा पाळतो म्हणून तो त्याचा अधिकार आहे असे लिहिले आहे. अर्थशास्त्रात असे लिहिले आहे की श्रीमंत लोकांनी राजाला अधिक धन द्यावे. यासाठी राजाने त्या व्यक्तीला बक्षीस दिले पाहिजे.

अर्थशास्त्रात समाजव्यवस्थेचा उल्लेख करताना छैय्या वर्ण पद्धतीचा उल्लेख केला आहे. यामध्ये ब्राह्मणांना जास्तीत जास्त आदर देण्यात आला असून शहराचा उत्तरेकडील भाग देव आणि ब्राह्मणांसाठी राखीव ठेवण्याची तरतूद करण्यात आली आहे. ब्राह्मणाला शिक्षा करणे निषिद्ध आहे. या सर्व गुन्ह्यांसाठी ब्राह्मणावर गुन्हा दाखल केला जाईल, अशी तरतूद करण्यात आली आहे.

अर्थशास्त्रात, ब्राह्मणवादात उत्तरधर्माला तुच्छतेने पाहिले जाते. येथे गैर-धार्मिक अनुयायांचे वर्णन स्मशानभूमीसारखे आलेले आहे. अर्थशास्त्रामध्ये एका समाजाचे वर्णन केले आहे ज्यामध्ये नियोग प्रथा, विधवा पुनर्विवाह आणि दास प्रथा प्रचलित होती. अर्थशास्त्राची दासता या अध्यायात शूद्रांना आर्य म्हटले आहे.

अर्थशास्त्रात तिथे उत्पादित होणाऱ्या मालाची वेगवेगळ्या ठिकाणी चर्चा केली आहे. उदा., उत्तम दर्जाच्या हात्तीसाठी कलिंग आणि अंग महाजनपद, रेशमी कापडासाठी काशी, घोडयांकरीता कंबोज, वजनमापे तयार करण्यासाठी लागणारे दगड आणि घोंगडी मिळवण्यासाठी नेपाळचा उल्लेख केला आहे.

एकंदरीत, अर्थशास्त्र ही मौर्य काळातील निर्मिती आहे हे ज्ञात असले तरी त्याचा विकास उत्तरकाळात झालेला दिसतो.

**(१०) सप्तांग**

अर्थशास्त्रात, राज्याचे शाश्वत विकासासाठी आवश्यक असे वर्णन केले जाते. या संकल्पनेनुसार कौटिल्याने राज्याला सात भागांचा बनलेला मानला आहे. ही सात अंगे पुढीलप्रमाणे होती (१) राजा (२) अमात्य (३) जनपद (४) दुर्ग (५) कोष (६) बळ (७) मित्र. यापैकी कौटिल्य राजाला सर्वोच्च स्थान देतो.

अर्थशास्त्राव्यतिरिक्त राज्याची सप्तांग विचारधारा इतर काही ग्रंथांमध्येही मांडण्यात आली आहे. पण त्याचे वर्णन कौटिल्यापेक्षा थोडे वेगळे आहे. उदाहरणार्थ- विष्णु धर्मेत्तर पुराण (इ.स. 5 वे शतक) यांनी राज्यातील सात अंगांपैकी स्वामी आणि अमात्य यांच्या जागी 'साम' आणि 'दाम' या दोन नवीन अंगांचा उल्लेख केला आहे.

- आचार्य भारद्धाज कौटिल्यने मांडलेल्या सात अंगांची चर्चा करतात, परंतु त्यांनी या सात अंगांपैकी मंत्र्याचे स्थान सर्वश्रेष्ठ असल्याचे वर्णन केले आहे.
- आचार्य विशालाक्ष वरील सात अंगांपैकी देश किंवा भूमीला श्रेष्ठ मानतो.
- पाराशर, पिथून आणि कौनदंत या आचार्यासारखे लोक दुर्ग किंवा कोष यांना सर्वात महत्वाचे मानतात.